ब्रह्मसमाचार.

पुरवणी

Berar Samachar.

वर्ष ४५] आकोला—सोमवार तारीख ५ मोहे जून सन १९११ इ० [अंक २४

तारीख २९।५।११ या अंकावरून पुढें चालूं

मेघळाट ताल्लुक्यांत ज्या लोकांनीं "किंग एडवर्ड मेमोरीयल फंडा-करितां" वर्गणी दिली त्यांचीं नावें १९११

अ. नं.	वर्गणीदाराचें नांव	राहण्याचें ठिकाण	रक्कम रु०	शेरा.
९९	फतीया कोरकू	घाराकोट	९	
१००	केशवसा कलाल	चुळजाट	१९	
९१	खुटा कलाल	"	२९	
९२	धिरा कलाल	"	१०१	
९३	हरशनासिंग	दिवा	२९	
९४	जानकीसुचील	सुनी	१०	
९५	मथुराप्रसाद	"	१०	
९६	भूमका कारकू	गांगरखेडा	१०	
९७	शिवदीन माताहीन	"	१०	
९८	गोविंदसा	गंभीरी	१९	
९९	मेहई कोरकू	गवळणढोहो	४०	
७०	शेखरोशन	गोवरकहू	१०	
७१	नागो	गोंडवारी	१०१	
७२	भगतावर कलाल	गवलखेडा	२०	
७३	उमा पाटील	"	१०	
७४	गिरगाकोलू	"	१०	
७५	सुरजमल कलाल	"	१९	
७६	तुमला कोरकू	"	१०	
७७	चंद्रभान	"	१०	
७८	भगवान	"	९	
७९	गंगाराम राघजी	"	१०	
८०	गणु बापूजी	"	१०	
८१	जानु दत्ताजी	"	१०	
८२	जानुजी	"	२९	
८३	जानु बाबाजी	"	१०	
८४	झामा सहार	"	१०	
८५	काशीराव कुणबी	"	१०	
८६	मारुती जानुजी	"	१०	
८७	नागो चिंतामण	"	९	
८८	परशराम रावभान	"	१०	
८९	परशराम	"	२०	
९०	फतीया बाबूजी	"	१०	
९१	रामचरण	"	१०	
९२	रावभान	"	२०	
	शिवराम मकाजी	"	१०	
९४	सोनाजी नंदाजी	"	२०	
९५	सूर्यभान नानाजी	"	१९	
९६	उदेभान शाहूजी	"	१०	
९७	उदेभान नागोजी	"	९	
९८	भगवानदीन	हरदोली	१००	
९९	बळीराम पाटील	हरदामल	९	
१००	दादु कोरकू	झिलपी	१९	
१०१	रजपालासिंग	"	७९	
१०२	रघुवीर	झिरी	१०	
१०३	गोकळ कोरकू	कडाव	२९	
१०४	बाटू कोरकू	"	१०१	
१०५	मनांग कोरकू	काळपी	१०	
१०६	ब्रिजलाल	कळमखार	२९	
१०७	हेमराज	"	२९	
१०८	गगनशेट	"	९१	

अ. नं.	वर्गणीदाराचें नांव	राहण्याचें ठिकाण	रक्कम
१०९	नारायण कालूसा	कळमखार	३०
११०	ओंकारसा	"	९१
१११	बाबूसिंग	काडकूम	९
११२	डोंगरू कोरकू	"	९
११३	चुन्नीलाल कलाल	"	३०
११४	गंगदुसा कलाल	"	२०
११५	काळेखान	"	१२०
११६	चंदू	कासदढोहो	१०
११७	पांडु दर्यानी	"	१०
११८	फतीया धुडा कोरकू	कानेरी	९
११९	माडी कोरकू	"	२९
१२०	माहासिंग कोरकू	काळापानी	९
१२१	चुन्नीलाल	खारी	२९
१२२	ओरसी कोरकू	"	१९
१२३	गंगाराम	"	२९
१२४	चिणी कलाल	खापरखेडा	१९
१२५	पाटील कोहाना	कोहाना	१०
१२६	दादू पाटील	कोरडा	२०
१२७	गोविंदा	"	९
१२८	गुंठू कोरकू	"	१०
१२९	राजा भारतसिंग	कोट	२००
१३०	गाका	कुसुमकोट	१०
१३१	मि० हबीबुल्ला	"	१०१
१३२	हबीबुल्ला	"	१९
१३३	काइरमाई	"	१०
१३४	लछारीलाल	"	९१
१३५	महाबल भाई	"	१०
१३६	मलु कोरकू	"	९
१३७	मोतीराम	"	२९
१३८	मलर अक्की	"	९१
१३९	रामजी	"	३०
१४०	शेख अयास	"	९
१४१	शेख बक्कमू	"	९
१४२	शेख रमनान	"	१०१
१४३	शेख नमाल	"	९
१४४	शेख रमनान	"	९
१४५	सोमाराम	"	२९
१४६	सबध अक्की	"	१०
१४७	तोताराम	"	१०
१४८	तुराब अक्की	"	११
१४९	उमरावसिंग	कुसुमगगा	१००
१५०	मनांग कोरकू	मडकी	१०
१५१	गोविंद दर्यानी	मलहारा	१३
१५२	बाबू झाडू कोरकू	मनभंग	१०
१५३	चंदू कोरकू	मांसरखापरी	९
१५४	बळीराम जानुजी	मसोना	९
१५५	गुलजी नवजी	"	९
१५६	गणपत श्रावण	"	२०
१५७	शेखचांद शेखकालू	"	१०
१५८	धावल कोरकू	मोगरदा	१०
१५९	पंचम	नागझीरा	१०
१६०	अंगत्या कोरकू	नरोटी	२९
१६१	केदारबक्ष	"	९०
१६२	झानु पाटील	नवलगांव	२९

वऱ्हाडसमाचार

जेष्ठ शुद्ध ९ शके १८३३ दुर्मतीनाम संवतसरे.

आमच्या प्रांताची औद्योगिक पाहणी.

लेखांक. २

गेल्या खेपेस सरकारनें हातीं घेतलेल्या औद्योगिक पाहणीचें महत्व आणि प्रसिद्ध केलेल्या रिपोर्टातील व्यंगें आह्मीं दाखविलीं. हीं व्यंगें जमेस धरलीं तरी सदर रिपोर्ट अत्यंत महत्त्वाचा व उपयुक्त असून त्यांत केलेल्या सूचनांकडेस सरकारचें लक्ष गेल्यास त्यापासून देशाचें अनेक प्रकारें हित होणार आहे. रिपोर्टांत दाखल केलेल्या पांचचार ठळक धंद्यांमध्यें विणकऱ्यांचा धंदा अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें त्याच्यासंबंधानें रिपोर्टांत काय झटलें आहे तें आपण प्रथम पाहूं. हा धंदा इंग्रजी अंमल सुरू होण्याचे अगोदर पासून या प्रांतांत असून कोष्टी, साळी, महार, मोमीन, कोरी, व बलाही अशा नें काम करणारांच्या निरनिराळ्या जाती आहेत. हिंदुस्थानांतल्या जातिव्यवस्थेमुळें प्रत्येक जातीनें एकेक काम आपले कडे ठेवून तें ती जात शतकानुशतकें करीत आल्यामुळें त्या कामातली कुशलता आनुवंशिक संस्कारामुळें साहजिकच प्राप्त झाली आहे. पण इंग्रजी अमदानींत लोकांची पालटलेली राहणी, बदललेली रुचि, यंत्रानें चालविलेल्या गिरण्यांशीं स्पर्धा, आगगाडीचा विस्तार वगैरे अनेक कारणांमुळें हा विणकऱ्यांचा धंदा सध्या अगदीं डबघाईला आला आहे. इतका कीं लवकरच त्याला धीर देण्याचा कांहीं उपाय न केल्यास तो सपशेल बुडेल अशी भीती आहे. विणकऱ्यांजवळ आतां कांहीं त्राण न उरल्यामुळें सूत विकत घेण्याला मुद्दां त्यानः जबर व्याजानें सावकारापासून कर्ज काढावें लागतें; मालाला तावडतोब गिऱ्हाइक असतें असें नाहीं; सोयीसोयीनें माल विकूं असा धीरही त्यांना नसतो. कारण त्यांचें पोट हातावर चाललें असतें. तेव्हां रुपयामागें आणा दोन आणे कमी घेऊन एखाद्या मारवाड्याला माल विकणें त्यांना भाग पडतें. अशा रीतीनें जबर व्याज आणि मालविक्रींत नुकसानी अशा दुहेरी माऱ्याखालीं ते अगदीं बेजार होतात. ही स्थिति सामान्य विणकऱ्यांची झाली. मग बऱ्हाणपुर सारख्या ठिकाणीं जरतारी माल तयार करणाऱ्या विणकऱ्यांची मालाला फारसा खप नसल्यामुळें काय स्थिति होत असेल याची कल्पनाच केली पाहिजे. या लोकांची स्थिति सुधारण्यास एक उपाय आहे. तो हा कीं यांनीं काढलेला माल इंग्लंड, अमेरिका वगैरे धनिक राष्ट्रांतून खपविला पाहिजे. पण तेथें अडचण ही येऊन पडते कीं इकडलीं पागोटीं व पैठण्या यांना पाश्चात्य देशांत कोण विचारणार? युरोपियन लोकांना ज्या तऱ्हेचा माल हवा तसा इकडे निघूं लागेल तरच हें शक्य आहे. पण आमच्या विणकऱ्यांचें अज्ञान लक्षांत घेतां त्यांना ही गोष्ट कळणार नाहीं हें उघड दिसतें. तेव्हां मध्यें कोणी तरी हुशार, पाश्चात्य समाजांत वागलेला, आणि व्यापारी दृष्टीचा मनुष्य असला पाहिजे आणि त्यानें हें काम केलें पाहिजे हें उघड आहे. विणकऱ्यांची स्थिति सुधारण्यास दुसरा एक उपाय आहे. विणकऱ्यांना सूत विकत घेण्यालासुद्धां सावकाराचें घर पाहावें लागतें असें वर सांगितलेंच आहे. या लोकांना सवलतीनें कर्जाऊ रकमा देण्यासाठीं परस्पर सहायकरी मंडळ्या गांवोगांव स्थापन होतील तर त्यांच्यावरलें हेंही संकट दूर होऊन त्यांचा धंदा चांगला चालूं लागेल, व त्यांच्या हस्तकौशल्याला वाव सांपडून देशांतल्या एका पुरातन काळापासून चालत आलेल्या धंद्याचें पुनरुज्जीवन होईल. असल्या उपायाचें अवलंबन वेळींच न केल्यामुळें बंगाल्यांत ढाक्का येथील सुप्रसिद्ध मलमलीचा उद्योग कसा बसला हें सर्वांना ठाऊकच आहे. या दोन उपायांशिवाय आणखी एक उपाय केला पाहिजे. तो उपाय ह्मणजे यांत्रिक सुधारणा हा होय. ती कोणत्या दिशेनें करावयास पाहिजे याविषयींची सविस्तर माहिती प्रस्तुतसारख्या लेखमालेंत देणें अशक्य आहे. पण या बाबतींत ज्यांना जिज्ञासा असेल त्यांनीं सदर रिपोर्ट अवश्य पाहावा अशी आमची शिफारस आहे. बारीक सुताच्या मालासंबंधानें गिरण्यांची जेथें स्पर्धा चालते तेथें वरील उपायांचें अवलंबन केल्याखेरीज गत्यंतरच नाहीं. सुदैवानें आमच्यांतले निकृष्टप्रतीचे लोक ह्मणजे शेतकरी, सुतार, लोहार, मजूर वगैरे आणि त्याच्या बायका जी वस्त्रं वापरतात तीं अगदीं जाडींभरडीं असतात; व तीं आमच्या हातमागावरच बहुतेक होतात. तथापि यांनाही गिरणीचा बाऊ नेहमीं वाटत असल्यामुळें हातमागावरील कापडाचा व्हावा तसा खप होत नाहीं रेशमी कापड काढणारांची ही स्थिति कमी ज्यास्त मानानें वर सांगितल्यासारखीच आहे. या सर्व विणकऱ्यांना ऊर्जितं काळ येईल असें करण्यास सरकारनें पुढें व्हावयास पाहिजे आहे ही गोष्ट रिपोर्ट करणाऱ्या अधिकाऱ्यास ही मान्य आहे व शेतकी खात्यानें ज्याप्रमाणें शेतकी सुधारणेचें काम हातीं घेतलें आहे त्याप्रमाणें उद्योगखातें काढून त्या खात्याकडून सरकारनें हें उद्योगसुधारणेचें काम करविलें पाहिजे अशी स्पष्ट सूचना ही रिपोर्टांत केली आहे. जागोजाग उद्योगखात्याचीं स्टेशनें स्थापावीं; तेथील आफिसरांनीं स्थानिक उद्योगांची माहिती मिळवून त्यांत सुधारणा करून पाहण्याचे प्रयोग करावे; ते लोकांना दाखवून त्यांचे कडून सुधारणा करवावी. मात्र स्वतः अनुभवून पूर्ण खात्री झाल्याशिवाय कोणत्याही मागाची किंवा यंत्राची शिफारस करण्यांत येऊं नये; नाहीं तर त्या खात्यावरचा लोकांचा विश्वास उडेल आणि स्तुत्य उद्देशानें हातीं घेतलेलें काम थोड्याशा अदूरदृष्टीच्या कृत्यामुळें बिघडून ऑफस होईल. परस्पर साह्यकरणाऱ्या ब्यांका अवश्य स्थापन केल्या पाहिजेत, आणि त्या स्थापन करण्यास उत्तम सोयीचीं स्थळें ह्मणजे बऱ्हाणपूर, उमरेड, भंडारा, चांदा, बालाघाट, हीं रिपोर्टांत दिलीं आहेत. दुर्दैवानें आमच्या वऱ्हाड प्रांतांतलें एकही ठिकाण रिपोर्ट करणारास दिसलें नाहीं. असो विणकऱ्यांची स्थिति सुधारण्याचा आणखी एक उपाय ह्मणजे त्यांच्या मुलांसाठीं एक ट्रेनिंगस्कूल स्थापणें हा होय. या शाळेंत विणण्याची सुधारलेली पद्धत शिकविण्यांत यावी, थोडें बहुत शिकून मग या शाळेंत येणाऱ्या विणकऱ्यांच्या मुलांना दहापांच रुपयांच्या स्कालरशिपचें आमिष लावल्यास पुष्कळ विणकरी आपलीं मुलें या शाळेंत पाठविण्यास तयार होतील. या शाळेंत सुशिक्षित शिक्षक तर हवेतच. पण त्यांच्या मदतीस अशिक्षित पण विणण्याच्या जुन्या पद्धतींत पूर्ण वाकबगार असे विणकरीही पगार देऊन सरकारनें ठेवावे. ह्मणजे ही जोडी अजब काम करून दाखवील, व ती जी सुधारणा सुचवील तिच्यावर इतर विणकऱ्यांचा विश्वास बसेल.

या सर्व सूचना व्यावहारिक व उपयुक्त असल्यामुळें सरकार त्यांचा योग्य विचार करील अशी आह्मांस पूर्ण आशा आहे.

वर्तमानपत्राचा अभाव.

—०—

यंदाच्या मद्रास प्रांतिक सभेच्या बैठकींत एका विशेष गोष्टीचा उल्लेख झाला. तिच्याकडे लोकांचें लक्ष अद्याप लागावें तसें लागलें नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. **ना० गोखले यांच्या** शिक्षणाविषयक बिलाची चर्चा करतांना सदर सभेच्या अध्यक्षांनीं जिच्यामुळें शिक्षणप्रसाराला मोठी अडचण होत **आहे अशी** सध्याची एक मोठी उणीव सांगितली. ती उणीव ह्मणजे सध्याच्या तरुणपिढीच्या मनांत बिंबलेले दुराग्रह व एककल्ली भलभलते विचार काढून टाकून त्यांना सद्विचारांचें व सद्वर्तनाचें वळण लावणारें, नानाविध विषयांची माहिती गोळा करून देणारें व त्यांच्या पुढें देशप्रीति, राजनिष्ठा, धर्मवासना, आणि सदाचार, वडिलांविषयीं आदर, इतर धर्म आणि समाज यांच्याविषयीं प्रेम, कर्तव्यनिष्ठा, आणि खरी नागरिकता यांचे उच्च आदर्श मांडणारें असें वर्तमानपत्र देशी भाषेंत सध्या नाहीं ही होय. सध्याच्या वर्तमानपत्रांची मीमांसा केली तर असें दिसेल कीं त्यांतलीं कांहीं दुर्विकारांना उत्तेजित करणारीं आहेत; कांहीं राजकीय, सामाजिक व इतर गोष्टींत शोध न करतां भ्रामक विधानें करण्यांत पटाईट आहेत; कांहींच स्वतःची प्रतिष्ठा वाढविणें व अर्थ साधणें हाच एक हेतु असतो. पण हे सगळे अधोगतीचे मार्ग आहेत. देशाला उन्नतास्थितीला नेणारें व तरुणांपुढें उच्च आदर्श मांडणारें पत्र विरळा दृष्टीस पडतें. असें एखादें पत्र प्रत्येक प्रांतांत एखादें देखील असूं नये काय? ही उणीव देशांतल्या विचारी माणसांना पदोपदीं भासत आहे अशी आमची समजूत आहे; पण असें एखादें पत्र काढल्यास त्याचा प्रभाव समाजावर कितीसा पडेल याचा बरोबर अंदाज न झाल्यामुळें या दिशेनें अजून कोठें प्रयत्न झालेला दिसत नाहीं. मुंबईस सर फेरोजशहा मेथा वगैरे मंडळी अशा प्रकारचें इंग्रजी दैनिक काढण्याच्या खटपटींत होती. पण आतां त्या प्रयत्नाचें नांवही कोठें ऐकूं येत नाहीं. या मंडळीची उडी फार मोठी होती, आणि अंगांत तर तेवढें अवसान नाहीं. यापेक्षां अवसानाप्रमाणें माफक प्रमाणावर एखादें साप्ताहिक कां होईना काढण्याचा यत्न केला असता तर एव्हांना एखादें साप्ताहिक गुजराथींत व एखादें मराठींत सहज निघूं शकलें असतें. पण लक्षांत कोण घेतो?

राज्यक्रांतीचा परिणाम.

—२०२—

गेल्या वर्षीं तुर्कस्थानांत रक्तपातावांचून जी राज्यक्रांति घडून आली तिनें सामाजिक क्रांतीचा पाया घातला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ज्या देशांत पिढ्यानपिढ्या जुलमी व्यक्तीच्या अंमलाची संवय लोकांना झालेली असते, त्या देशांतल्या लोकांचीं मनें नव्या गोष्टीच्या परिणामाविषयीं विशेष शंकाकुल झालेलीं असतात व त्यामुळें त्या देशांत प्रगतीचें बीज पेरलें गेलें तरी तिला अंकुर फुटून सतेज वृक्ष बनण्यास दीर्घ काल लागतो. परंतु अनुकूल राजकीय स्थितींत समाजसुधारणेचा रथ त्वरेनें जाऊं लागतो. सध्याचें तुर्कस्थानचें राजकीय वातावरण समाज सुधारणेला अनुकूळ आहे. राज्यक्रांति घडवून आणणारे तरुण तुर्क समाजसुधारणेला उन्मुख आहेत. या गोष्टीचा फायदा घेऊन तुर्की स्त्रियाही आपला गोषा झुगारून देऊन राष्ट्रीय प्रगतींतला आपला कर्तव्यभाग उचलण्याच्या विचारांत गुंतल्या आहेत. नुकत्या घडलेल्या राज्यक्रांतींत पडद्याच्या आंतून तुर्की स्त्रियांनीं सूत्रें हालविलीं होतीं असेंही कित्येकांचें ह्मणणें आहे. हें खरें असेल तर ती मोठी आशोत्पादक गोष्ट आहे. जन्मभर गोषांत राहणाऱ्या तुर्की स्त्रियांनाही जर देशाच्या कल्याणाच्या कामांत हातभार लावतां येतो, तर हिंदुस्थानांतल्या स्त्रियांनाही आज नाहीं उद्यां तो लावण्याची बुद्धि होऊन त्यांच्यांत कर्तृत्वशक्तिही येईल व म्युनिसिपालट्यांच्या अध्यक्षाचे जागीं, प्रोफेसराच्या खुर्चीवर, किंवा कायदेकौन्सिलाचे पंचायतनांत हिंदी स्त्रिया विराजमान झालेल्या आपण पाहूं असें आश्वासन एखाद्यानें आपल्या मनाला दिलें तर ते अगदींच निरर्थक होणार नाहीं. म्युनिसिपालिटीचा आणि गृहारोग्याचा इतका निकट संबंध आहे कीं स्त्रिया म्युनिसिपालिटींत मेंबर ह्मणून निवडून आल्या खेरीज हिंदुस्थानांतली आरोग्याची स्थिति सुधारणार नाहीं असें ह्मणणें बिलकुल गैरवाजवी होणार नाहीं. तुर्कस्थानांत राज्यक्रांतीनें जी गोष्ट दहापांच वर्षांच्या आंत घडून येण्याचा पूर्ण संभव आहे तीच गोष्ट हिंदुस्थानच्या राजकीय यंत्रांत क्रांति घडवून आणणाऱ्या मोर्ले साहेबांच्या योजनेचा थोडासा आणखी विस्तार केला व स्त्रियांना म्युनिसिपालिटींत, लोकलबोर्डांत, किंवा कौन्सिलांत पुढें मागें घेण्याचा रस्ता खुला करून दिला तर या नेमस्त क्रांतीनें सामाजिक व आरोग्य विषयक सुधारणेला पुष्कळच बळकटी खात्रीनें येईल.

तंबाखू आणि बधिरता.

तंबाखूच्या सेवनानें अपचन, अंधता, काळजाची दुर्बलता, व अकालीं वार्धक्य हीं येतात असें आजपर्यंत अनेक डाक्तरांनीं व शास्त्रज्ञांनीं सांगितलेलें आमच्या लक्षांत आहे. पण तंबाखूपासून निघणाऱ्या निकोटीन द्रव्याचा मनुष्याच्या श्रवणेंद्रियावर परिणाम घडून बधिरता येते ही गोष्ट ऐकून एका नाटकांतल्या नायकाच्या उक्तीचा आह्मांस आठवण होऊन एका दुष्ट पात्रास उद्देशून तो नायक म्हणतो— 'अरे दुष्टा तूं केवळ खुनी, घातक, माणसांचे प्राण घेणारा उलट्या काळजाचा आहेस. असें मी आतां पर्यंत समजत होतों; पण तूं खोटेनाटे दस्तऐवज करणारा, पापी आहेस अशी आतां माझी खात्री झाली आहे.'

लॉर्ड मिंटो यांचे विचार.

हिंदुस्थानासारख्या देशाला खुल्या व्यापाराचें तत्त्व हिताचें नसून संरक्षणाचें तत्त्व फायदेशीर होईल हें लॉर्ड मिंटो साहेबांचें मत त्यांनीं आजपर्यंत वारंवार बोलून दाखविलें आहे, पण त्याबरहुकूम कृतिमात्र आजपर्यंत केली नाहीं, तेव्हां ते नक्राश्रु होत, हिंदुस्थानाविषयींची खरी साहानुभूति नाहीं अशी कडक आणि अन्यायाची टीका एका देशी पत्रकर्त्यानें केली आहे. पण लॉर्ड मिंटो हे व्हाइसराय झाले तरी त्यांचे अधिकार अनियंत्रित नसतात ही गोष्ट आमचे व्यवसायबंधु विसरले असावें वाटतें. हिंदुस्थानला संरक्षणपद्धति देणें म्हणजे ब्रिटिश कारखानदाराचें नुकसान करणें आहे आणि तें करण्यास हिंदुस्थानसरकारचे सगळे मेंबर जरी तयार झाले तरी त्याचेवर विलायतेंतून स्टेटसेक्रेटरी मार्फत कारखानदारांचें दडपण आल्यावर त्यांना गप बसावें लागतें. हिंदुस्थानाला कांहीं कामापरता ब्रिटिशराज्याचा एक अवयव मानण्यात आलें तरी त्या शब्दाचा अर्थ इतका लवचीक आहे कीं ब्रिटिश मुत्सद्दी इच्छेनुरूप त्याची व्याप्ति विस्तृत किंवा आकुंचित करूं शकतात. परवाच अमेरिकेशीं कानडा देशाचा करार झाला त्याविषयीं बोलतांना लॉर्ड लुकस म्हणाले कीं 'आमच्या ब्रिटिशराज्याच्या सर्व अवयवाना आपापला उत्कर्ष करून घेण्याची आह्मी मोकळीक दिली आहे." या वाक्यावर मुंबईच्या टाइम्सपत्रानें सणसणीत टीका करून त्यांना पुढील प्रश्न विचारले आहेत. ते प्रश्न हे कीं जर हिंदुस्थानसंबंधानें सरकारचें हें धोरण असतें तर सरकारी व बिनसरकारी कौन्सिलरांचें एक्साइज जकातीच्या विरुद्ध मत असतां त्याला धाब्यावर बसविण्यांत कां आलें असतें? व १९१०--११ सालचें हिंदुस्थान सरकारचें बजेट लॉर्ड मोर्ले यांच्या धोरणाच्या आड जाऊं लागलें म्हणून त्याचे तुकडे करण्यांत कां आले असते? त्याच प्रमाणें तंबाखूवर बसविलेल्या नव्या जकातीचें मान ब्रिटिश कारखानदारांना नडूं लागलें तेव्हां त्यांच्या ओरडीला भिऊन तें मान बदलण्यांत कां आलें? हिंदुस्थानच्या खाणींतून खनिज पदार्थ काढण्याचे परवाने देण्याचे बाबतींत ही हिंदुस्थान विषयीं घडत असलेल्या अन्यायासंबंधानें खुद्द हिंदुस्थान सरकारचे भूगर्भ शास्त्रवेत्ते सर टॉमस हॉलंड यांनीं नुकतीच सणसणीत टीका केलेली पुष्कळांच्या वाचण्यांत आलीच असेल. अशा वेळीं लॉर्ड मिंटो साहेबासारख्या वजनदार मुत्सद्यांनीं हिंदुस्थानविषयींच्या सहानुभूतीनें प्रेरित होऊन हिंदुस्थानच्या हिताची एखादी गोष्ट निर्भीडपणें ब्रिटिश लोकांपुढें मांडली तर त्या बद्दल त्यांचे आभार मानण्याचें सोडून त्यांना नक्राश्रु गाळणारे अशी संज्ञा देणें या सारखी स्वार्थ मूढता व कृतघ्नपणा कोणताही नसेल.

फिरती पुस्तकालयें

आमचा बडोद्याचा बातमीदार ता० ३० मेच्या पत्रांत कळवितो कीं श्री० गायकवाडसरकार यांनीं स्थापिलेल्या नव्या सेंट्रल लायब्ररीखात्याकडून एक नवी उपयुक्त तजवीज लवकरच अमलांत यावयाची आहे. ती ही कीं कोणाही परगांवच्या लायब्ररीच्या सेक्रेटरीकडून किंवा शाळेच्या हेडमास्तरराकडून पुस्तकांची मागणी आल्यास रेलवे पार्सलनें उत्तमोत्तम वीस पुस्तकांची एक पेटी त्यांचे नांवें पाठविण्यांत येईल. हीं पुस्तकें गांवांतल्या कोणाही वाचनेच्छु गृहस्थास त्यांनीं फुकट वाचण्यास द्यावीं व ठरलेल्या मुदतींत परत आणावीं. अशा तजविजीचा उपयोग कसा काय होतो त्याचा दरमहा रिपोर्ट करावा. चांगला उपयोग होतो असें दिसण्यास पहिलीं पेटी परत आल्यावर दुसरी पेटी पाठविण्यांत येईल. तूर्त हा प्रयोग २० गांवीं करून पाहण्याचें ठरलें आहे. दरएक गांवीं कोणी नवी लायब्ररी किंवा वर्तमानपत्रें वाचण्याची सोय करील तर त्या संस्थेला निमेनिम मदत सरकारातून मिळेल. लायब्ररीसाठीं कोणी २५ रु० वर्गणी जमविल्यास सरकारातून ७५ रु० मदत मिळून शिवाय १००० रु० किंमतीपर्यंत गुजराथी पुस्तकें पाठविण्यांत येतील. श्री० गाइकवाड सरकारचा आजपर्यंत विद्यादानाचा लौकिक प्रसिद्धच आहे. त्यांत या कुयानें अधिकच भर पडून प्रजा त्यांना दुवा देत राहील यांत शंका नाहीं.

कामकरी वर्गासाठीं विम्याची योजना

इंग्लंडांतल्या लोकांचा मोठा वर्ग म्हणजे कामकरी अथवा मजूर लोकांचा आहे. या लोकांना त्यांच्या आजारीपणांत किंवा अडचणीच्या प्रसंगीं पैशाची मदत कोणत्या प्रकारें करतां येईल या विषयींचा प्रश्न तेथील मुत्सद्यांपुढें आज बरींच वर्षें आहे. शेवटीं जर्मनयोजनेंत थोडे फेरफार करून इंग्लंडचे क्याबिनेट मिनिस्टर मि० लॉइड जॉर्ज यांनीं एक विम्याची योजना तयार करून पार्लमेंटापुढें मांडली आहे. ही योजना फार गमतीची व मजुरांच्या हिताची आहे. ती अशी:—प्रत्येक पुरुष मजुरानें चार व स्त्री मजुरानें तीन पेन्स आपल्या वेतनांतून दर आठवड्यास द्यावे. पण ज्यांची दररोजची मिळकत अडीच शिलिंग किंवा कमी असेल त्यांनीं पुरे चार पेन्स न देतां प्रमाणानें कमी द्यावे; पण देण्याचें प्रमाण जरी याप्रमाणें कमी असेल तरी विम्याची रकम मिळावयाची ती सर्वांना सारखीच! हें कसें? याचें उत्तर असें आहे कीं चार पेन्सापैकीं मजुराला जेवढे देतां येतील तेवढे त्यानें द्यावे व बाकीचे त्यांच्या साठीं कारखानदारानें देऊन चार पेन्सांची भरती करावी. या प्रमाणें मजुरांना रोजमुरा देतांनाच रकमा कापून घेतल्यावर कारखानदार दर मजुरामागें तीन पेन्स व सरकार दोन पेन्स याप्रमाणें पांच दर आठवडयास भरून त्या मजुराचा विमा उतरणार. आजरीपणांत किंवा दुसऱ्या कांहीं अडचणी मुळें त्याला काम करतां आलें नाहीं व रकम भरतां आली नाहीं तर अडचण पडूं नये म्हणून मूळ हिशोब करतांनाच असें धरलें आहे कीं वर्षांतून सरासरी तीन आठवडे तो रिकामा राहील आणी असें गृहीत धरूनच वरील भरण्याच्या रकमेचें प्रमाण ठरविलें आहे. चार वर्षांत बारा आठवड्यापेक्षां ज्यास्त दिवस तो बेकार राहिल्यास मात्र ज्यास्त दिवसांबद्दलची रकम विम्याच्या रकमेंतून कापण्यांत येईल. याप्रमाणें विम्याचा प्रिमियम भरीत राहिल्यावर त्या मजुराला म्हातारपणीं, किंवा अपघातानें तो काम करण्यास नालायक होईल तेव्हां त्याच्या पोटाला नियमित रकम विम्याच्या रकमेंतून पेनशनासारखी पोंचविण्यांत येईल. मि० लॉईड जॉर्ज यांची ही सूचना मजूरवर्गाला अर्थात पसंत आहेच; व कित्येक मोठाल्या कारखानदारांनीं ही त्याला संमति दिली आहे. मि. जॉर्ज यांचें हें विम्याचें हें बिल पास झाल्यास इंग्लंडच्या सरकारी तिजोरीला एक मोठें थोरलें भोंक पडेल व दरसाल आठ हजार सहाशें पाउंडाची भर खर्चांत पडेल ही गोष्ट खरी आहे. पण या योजनपासून राष्ट्रीय हित मोठें होणार असल्यामुळें त्याला कोणी हरकत घेईल असें वाटत नाहीं. या योजनेनें सरकार, कारखानदार व मजूर तिघांचीं ही अंतःकरणें एकवटून मजुरांचे संप वगैरे उत्पात कमी होतील. जर्मनींत ही योजना यशस्वी झाली आहे, तशीच इंग्लंडांत ही होईल अशी तिकडच्या लोकांना उमेद आहे. हिंदुस्थानांत मात्र अशी एखादी योजना काढणारा लॉइड जॉर्ज उत्पन्न होण्यास अजून एक दोन शतकें पाहिजेत असा विचार मनांत आला म्हणजे चित्तास उद्विग्नता येते.

आम्रफल.

येथा सारखा आंब्याला चार क्वचितच दृष्टीस पडतो. या ग्रीष्म ऋतूंतलें हें उत्तम फळ म्हणून यास अमृतफळ म्हणतात या रुचिकर व स्वादु फलाहाराच्या सेवनानें शरीराला तृप्ती व पुष्टी येते. याच काय पण सर्वच फळांचा दोष एवढाच कीं अधीक पक्व होऊन नासल्यानंतर हें फळ विषवत् होतें व लोकांच्या आरोग्याला धक्का पोंचतो. यांचा नामू लागल्यानंतरहि खाऊ नयेच पण तो टाकवत नाहीं म्हणून त्याचा रस काढून सूर्यप्रकाशांत त्याच्या फणस पोळीसारख्या पोळ्या तयार कराव्या म्हणजे किरणांनीं त्यांतले रोगजंतु मृत होऊन ही स्वादिष्ट आम्रपोळी वर्षभर खाण्यास सांपडेल. सर्वांनीं अमृतपणा चाखावा व त्यांतील विष काढून टाकण्यास विसरूं नये म्हणून मुद्दाम ही व्यावहारिक गोष्ट नव्या सारखी नमूद केली आहे.

वाढदिवस.

चक्रवर्ती श्रीमान जार्जसाहेब यांचा राज्याभिषेक येत्या दिसेंबरांत हस्तिनापुरच्या त्या पावन क्षेत्रीं होणार असल्यामुळें सर्व इंडियन राष्ट्र समुदित व आनंदोल्लसित आहे. आणि त्यामुळें बादशहाचा जन्मदिवस इतक्या उत्साहानें व प्रेमानें आनंदांत घालविण्यांत आला कीं आकोल्यास गेल्या शनिवारचा मंगलोत्सव चिरस्मरणीय राहील. इंडियन रिवाजा प्रमाणें सकाळीं अन्नदान व वस्त्रदान हीं करण्यांत आलीं. गोरगरीब अनाथीं मंडळी साखरभात व आम्रफलें जेऊन संतृप्त झाली. सुमारें साडेतीन हजार लोक संतर्पणास जमला होता. आंघळेपांगळे दीडशेवर आले आणि त्यांस वस्त्रें लेववण्यांत आलीं. सुमारें पांचशेसहाशे विद्यार्थ्यांस मेवामिठाई देण्यांत आली सायंकाळीं रात्रौ ९॥ वाजतां येथील इंग्रजी क्लबामध्यें आमचे लोकप्रिय डिपुटी कमिशनर मेजर प्लैडन साहेब यांनीं या जिल्ह्यांतील जिल्हाबोर्डाचे सभासद, मुनसिपल सभासद ऑनरेरी माजिस्ट्रेट, मुखवस्तु प्रतिष्ठित ठळकठळक पुढारी, वकील, व्यापारी, इत्यादि सद्गृहस्थांचा दरबार भरविला होता. मंडळीच्या उपहारासाठीं फळफळावळ वगैरे सांडली होती. सुमारें सवाशेवर लांबलांबचे गृहस्थ मुद्दाम आले होते. मेजर प्लैडन साहेबांनीं फारच प्रेमळपणानें हस्तस्पर्श करून सर्वांचें स्वागत केलें; आणि कुशल प्रश्नपूर्वक राष्ट्रा संबंधाच्या भावी उत्कर्षाच्या व भरभराटीच्या नानाविध गोष्टी केल्या. मेजर प्लैडन हे आनंदी मुद्रेनें सर्व पाहुणे मंडळी बरोबर अगदीं हांसून खेळून वागले आणि दोन घंट्याच्या अवधींत त्यांनीं इंग्लिश नेटीव हा भेदाभेद अगदीं घालवून टाकला. सर्वांत आल्हादाची गोष्ट झाली म्हणजे तेव्हां मेजर प्लैडन साहेब यांनीं बादशहाचें आयुष्य चिंतून सर्वांची तद्रूपता केली तेव्हां सर्व धर्मीच्या समाजाची मंडळी परमेश्वराकडे दृष्टी देऊन उभी राहिली आणि ज्यानें त्यानें एकएक काचेचा पेला पुढें केला., आणि कांहींनीं मधुर पेय, कांहींनीं सोडावाटर व कांहींनीं पवित्र गंगाजल प्राशन केलें. त्या वेळचा देखावा, व्यासंडचे कर्णमधुर बोल व सर्वांच्या समयोचित चित्तवृत्ति हीं आकाशपटांवर लिहिलीं होतीं कीं इंडियन वसुंधरा ही खरी खरी ब्रिटिश भूमी व प्रजावृंद खराखरा ब्रिटिश बनत चालला असून ग्रेटब्रिटन व इंडिया या राष्ट्रांची संहती जगाला आदर्शभूत कालगतीनें होत जाईल.

वऱ्हाडवृत्त.

हवामान— आगामी मृगनक्षत्राची शीतलता येऊं लागली असून उष्णतेचें मान ८४ अंशापासून १०२ अंशापर्यंतचें आहे. सार्वजनिक आरोग्य अत्यंत समाधानकारक आहे.

रा० रा० विनायक मोरेश्वर खरे सब जज्ज, आकोला यांची बदली रायपुरास झाली असून तेथील सब जज्ज रा. रा. जानकीप्रसाद हर्दे यांस आकोल्यास बदलण्यांत आलें.

रा० रा० यशवंत रायभान पाटील, तहशीलदार यांस आकोल्यास तहशीलदार नेमून येथील आफि० तहशीलदार रा० रा० मिरझा गुलाम नबीबेग यांस यवतमाळास तहशीलदार नेमण्यांत आलें.

NOTICe

The Ellichpur Civil Station Municipal Committee has in its Special meeting, held on 18 th, April 1911 sanctioned the following rules under section 44 of the Berar Municipal Law for the assessment and collection and for preventing evasion of the scavenging tax, within the limits of the Ellichpur Civil Station Municipal Committee, the imposition of which was sanctioned by Hyderabad Residency Orders Notification N0 43 dated 13 th February 1897.

RULES.

1 There shall be imposed---

(a) On every building fitted with a private latrine, or any inmate whereof uses a private latrine cleansed by Municipal servants, a latrine cess;

(b) On every building fitted with a private latrine not cleansed by Municipal servants, but whereof the night-soil, sullage water or house sweepings are removd at the cost of the Municipality, a conservancy cess; and

(c) On every building without a private latrine and the compound whereof is not cleansed by Municipal servants, a cess for the use of public latrines provided the annual letting value of such building exceeds Rs .3 /.

2 .Every person not using a private latrine shall be deemed to use a public latrine

3 . The cesses referred to in rule. I shall be imposed on the annual letting value of a building according to the following scale:—

	Where the building comes under clause (a) Rule 1.	Where the building comes under clauses (b) and (c) of Rule 1.
	Rs. As. P.	Rs. As. P
		upto Rs. 3 /. exempt
		above Rs . 3/ -& below
where such value is Rs. 10.		Rs 10 /----------0-8-0
or under	1 ... 0 — 0	
Where such value is over – Rs. 10 /. anb does not exceed Rs. .20 /.....	2 — 0 — 0	1 — 0 — 0
Where such value is over – Rs. 20 and does not exceed Rs. 50 /.....	4 — 0 — 0	2 — 0 — 0
Where such value is over – Rs .50 /. and does not exceed Rs. 100 /.....	6 — 0 — 0	3 — 0 — 0
Where such value is over— Rs. 100 and does not exceed Rs. I50 /.....	8 — 0 — 0	4 — 0 — 0
Where such value is over— Rs. 150 / and does not exceed R . 200 /.....	10 — 0 — 0	5 — 0 — 0
Where such value is over— Rs. 200 /.....	12 — 0 — 0	6 — 0 — 0

4 . (a) The annual letting value of a building ordinarily let shall be deemed tc be the annual rent at which it is let.

(b) The annual letting vaue of a building not ordinarily let shall be the annual rent which it can command, as ascertained by local enquiry:

Provided that in the determination of the annual letting value no account shall be taken of any machinery existing or attached to the building.

Provided further; that where any building is occupied under such circumstances as to render a valuation as aforesaid unreasonably high, the Committee may fix the value at such lesser amount as it deems fit.

5 . The valuation shall be made by an officer or officer specially appointed for the purpose by the Committee In any case in which the assessing officer considers that the rental value is greater than the amount stated by the assessee, the Chairman may appoint a Sub—Committee of three members of the Committee to fix the proper value under Rule 4.

6 . In any case in which the Committee, is satisfied that the assessment under these rules is disproportionate to the means of the assessee it may assess him in a lower grade.

7 (a) The rates payable under these rules shall be paid by the occupiers of the buildings to which they relate half-yearly and in advance within 15 days of the commencement of each term.

(b) For the purpose of these rules the half year shall be deemed to commence on the Ist April and 1st October respectively.

(c) If the rate prescribed as above with respect to any building the committee may cease to render it conservancy service for such time as the cess remains unpaid.

8 (a) If any building remains continuously unoccupied for more than 3 months in any half year, only half the rate for which it would be liable under rule 3 shall be paid by the owner for the unoccupied period and, when it is vacant for a full official half yearly period it shall be exempt from all taxes.

(b) The burden of proving vacancy shall lie on the person claiming the benefit of this rule.

9. The Committee shall, on or before the 1st, of March of every year, prepare a register of persons assessed under these rules showing the amount payable by them

10. As soon as the register is ready public notice shall be given by the beat drum or otherwise through the area concerned that such a register has been prepared, and is open to inspection at the office of the committee, or such other place as may be appointed, and within such hours as may be specified in the notice.

11 (a) objections against the assessments shown in the register shall be made to the Committee within 30 days of the publication of the notice aforesaid

(b)All such objections shall be heard and determined on or before the 1st of April of every year by a Sub-Committee of at least three members to be appointed by the Committee.

12. (a) Any person dissatisfied with the decision of the Sub-Committee under Rule II (b) may within one month of the date on which the first instalment of the rate as assessed is payable, apply to the Committee.

(b) An appeal shall lie to the Deputy Commissioner from any order passed by the Committee under class (a) unless he is a member of the Committee, in which case the appeal shall lie to the Commissioner and the period for preferring such appeal shall be one month from the date of the order appealed against.

13. A receipt shall be granted for every payment, of cess, and the payer shall be bound to produce such receipt when called on to do so, within one year from the date of payment, by any officer, authorised by the committee in this behalf.

I4. Any entry in this register may be amended by the Committee either of its own motion after notice to the person affected by such entry, or upon the application of the person affected. with effect from the first day of the quarter next succeeding, the date of the amendment.

15.(a) No person shall construct or bring into use any private latrine without the permission previously obtained by the Committee or some officer of the committee duly authorised to grant such permission.

(b) Any person infringing this rule shall on conviction before a Magistrate be punished with a fine not exceeding Rs. 50.

I6. The committee may at its discretion cempound with the owner or occupier of any premises used as a factory, workshop. hospital, market, and other similar places where latrines are of quasi-public nature for certain sum to be paid in lieu of the cesses under Rule 1 or may levy a rate per head to be fixed by the Committee on the probable number of persons living within or habitually r sorting to any such place.

17 . For the purpose of these rules the term "owner" includes

(a) Every person who is entitled for the time being to receive any rent in respect of the building referred to therein.

(b) A manager or agent on behalf of or for such person.

Sd. E. M. Kiernander.
Chairman.
Ellichpur Civil Station
Municipality.

नोटीस

आमद साहेब वा॥ अबदुल नबी मुसलमान रा० कडतवाडी ता० आकोट

यास

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमची ता० २४-९-११ ची नोटीस वऱ्हाडसमाचारात छापलेली पावली. आपण नोटिसींत लिहेतां कीं यंदाच्या सालीं आपण केलेल्या व्यवहारा संबंधीं हिशोब पाहण्या करितां ह्यटलें असतां हिशोब दाखविला नाहीं हें तुमचें लिहिणें खोटें आहे. तुह्मी सुमारें २ महिन्यां पूर्वी आमचे जिनमध्यें येऊन हिशोब पाहून तुमचे कडेस निघत असलेले रुपये कबूल केले. सदा मजकूर देण्यास नाहींत करितां मालमी स्थावर इस्टेट सदर्हू रुपयांत गहाण लिहून देऊन रजिस्टर करून देतों व्याज दरमहा दरशेंकडा आठ आण्या प्रमाणें देईल. तुमचे ह्मणणें आह्मीं कबूल केलें मात्र व्याज दरमहा दरशेंकडा वारा आणे मागत होतों. व्याजाचा दर तुह्मास मान्य न झाल्यामुळें आपण आट दिवसांत आमचे निघत असलेले रुपये रोख देतों ह्मणून सांगून गेला व त्यानंतर हि आमचे कापडदुकानीं २।३ वेळां येऊन ४ दिवसांनीं देतों सहा दिवसांनीं देतों अशी चाळवाचाळव केला. आतां पुन्हां तुह्मास पंचें मार्फत हिशेब पाहणें असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांचे आंत आपले ने पंच अस-तील त्यांसह आमचे दुकानीं येऊन हिशेब पाहून घेणें व आमचे तुमचे कडेस निघत असलेले रुपये चुकते करुन देऊन पावती घेऊन जाणें. असें वरील मुदतींत न केल्यास रीतीप्रमाणें कोर्ट मार्फत फिर्याद करून या नोटिसीचे खर्चासुद्धां रक्कम वसूल करणें भाग पडेल. कळावें. ता० ४।६।११

सही

केदारनाथ त्रिदीचंद दुकान आकोट

तर्फे किसनपुरी.

नो० नं० २१८

नोटीस

रा० गोपाजी वा॥ गोरख माळी रा० पिंजर ता० आकोला

यांस

सेंगी मर्द गोपाजी माळी नोटीस देते कीं मी तुमची लग्नचीं बायको असून तुम्ही आतांशी पाठीत नाहीसे झाला आहा. तुम्ही देवभक्त बनला व मला टाकून घातलें. हल्ली माझी उमर अजमासे ३९।४० वर्षाची आहे. मजकडून मोलमजूरी होत नाहीं. सबब मला आतां पोसणें भाग आहे. करितां तुम्ही मला आपल्या घरीं ८ दिवसांत घेऊन जावें नाहींतर अन्नवस्त्रा बद्दल झालेलें कर्ज रु० १२९ अंदाजा तें देऊन या पुढें दरमहा सहा प्रमाणें देण्याची तजवीज करावी. असें न झाल्यास कोर्ट मार्फत दावा करून या नोटिसीचे खर्चासह रकम वसूल करीन. आपसात समजावें म्हणून ही नोटीस दिली आहे.

कळावें ता० २७।९।११

सही

सेंगी मर्द गोपाजी नि० खु० आंयठा
रा० पिंजर ता० आकोला
आज मु० आकोला

नो० नं० ८६

NOTICe

Notice is hereby given that the Municipal committee of Malkapur in the Buldana District propose to make the following byelaws under Section 114 (1) (2) the Berar Municipal Law 1886 for the storage of petroleum within the limits of the Malkapur Municipality.

The proposed byelaws will be taken into consideration on the expiry of one month from the date of the first publication of this notice and any objections or suggestions in respect thereof must be forwarded to the secretary to the Municipal Committee before the expiry of the said period—

BYE—LAWS

(1). Nothing in the following bye-laws shall be deemed to apply to persons licensed to possess petroleum under the Indian Petroleum Act, 1899 or to non-dangerous petroleum exceeding 500 gallons or to dangerous petroleum exceeding 3 gallons.

2. Except under, and in accordance with, a license granted under the Berar Municipal Law, 1886 or this rule as the case may be, no petroleum shall be stored within Municipal limits in the following cases :—

(1) When petroleum in any quantity is stored for sale (last clause of section 114 (1) of the Berar Municipal Law 1886).

(2) When non-dangerous petroleum exceeding 50 gallons or dangerous petroleum exceeding one gallon is stored, whether for sale or otherwise.

Note:— Tne following yearly fees have been fixed under section 114 (4) of the Berar Municipal Law 1886 for licenses issued for the possession of petroleum for sale viz :—

NON—DANGEROUS PETROLEUM

(a) When the quantity to be stored does not exceed 8 gallons. .....Nil

(b) When the quantity to be stored exceeds 8 gallons but does ont exceed 100 gallons .....Rs· 2–0–0.

(c) When the quantity to be stored exceeds 100 gallons but does not exceed 500 gallons ..... Rs2 for each 100 gallons or part thereof.

DANGEROUS PETROLEUM

When the quantity to be stored does not exceed 3 gallons ...Rs Nil.

3. No person shall store for sale in any shop within the limits of the Municipality non-dangerous petroleum exceeding 50 gallons or dangerous petroleum exceeding one gallon.

Note:— For the purpose of this rule a "shop" shall be deemed to include all premises on which petroleum is sold retail.

4. No person shall store non-dangerous petroleum exceeding 50 gallons but not exceeding 500 gallons, or dangerous petroleum exceeding one gallon but not exceeding 3 gallons in quantity except in buildings outside the inhabited area of the town, which have been approved by the Committee for the purpose.

5. To a conspicuous part of all premises licensed for the storage of petroleum a notice Board with the name of the license, and the fact that he is licensed to store petroleum legibly written thereon, shall be affixed.

6. Dangerous petroleum kept within municipal limits shall be placed in separate glass, stoneware or metal vessels each of which shall contain not more than one pint and shall be securely stopped.

7. Any breach of rules 2, 3, 4, 5, or 6 above punishable with fine which may extend to Rs. 50, and where the breach is a continuing breach, with further fine which may extend to Rs. 5/. every day after the first during which the breach is proved to have been persisted in.

Khaja Kutbudin.

Dated Malkapur. 23rd May 191. } Vice Chairman Municipal Committee Malkapur.

FORM. A.

License to store petroleum for retail sale granted under section 114 of the Berar Municipal Law, 1886, read with rule. 2 (1) of these rules.

No.

License is hereby granted to----------for the storage in the place described below of-------- gallons of Dangerous or non-dangerous petroleum, subject to the conditions herein contained:—

Maximum quantity to be stored at one time———

This license shall be in force upto———

The 161 } Secretary Municipal Committee

(DescriPtion of the place above referred to)

CONDITIONS

1. All non-dangerous petroleum shall be kept in tnis or other vessels, not easily broken. All dangerous petroleum shall be placed in separate glass, stoneware or metal vessels each of which shall contain not more than one pint and shall be securely stopped.

2. The depot or store house shall be liable to inspection by any officer appointed in this behalf.

3. A copy of the conditions of this license and a board showing the maximum quantity of cases and tins to be allowed at one time, shall be hung up in the storehouse.

4. This license is not transferable .If the holder of the license wishes to transfer it, he must apply to the Secretary to the Municipal Committee for permission to do so.

5. On the breach of any condition hereto attached, this license shall be liable to be forfeited.

Note:—— The Municipal Committee may insert any other condition which appears necessary in the circumtauces under which the license is granted.

FORM B.

License for the storage of petroleum whether for sale or otharwise granted under rule 2 (2) read with Rule 4 of these rules.

No.

License is hereby granted to----------for the storage in the place described below of———————gallons of dangerous or non-dangerous petroleum subject to the conditions herein contained:—

Maximum quantity to be stored at any one time———————

This license shall be in force upto———————

The 191 } Secretary Municipal Committee Malkapur.

(Description of the place above referred to.)

1. All non-dangerous petroleum shall be kept in tins or other vessels not easily broken. All dangerous petroleum shall be placed in separate glass, stoneware or metal vessels, each of which shall contain not more than one pint and shall be securely stopped.

2. All places in which petroleum may be stored under this license shall be liable to inspection by any officer appointed in this behalf.

3. Such places of storage shall be constructed of masonry or other uninflamable material; but the beams, rafters, columns, windows and doors may be of wood.

4. If the licensing officer calls on the holder of this license by notice in writing, to execute any repairs of the licensed place which may, in the opinion of such officer, be necessary for the safety of the place, the holder of this license shlal execute the repairs within such period as may be fixed by the notice.

5. A copy of the conditions of this license and a board showing the maximum quantity of cases and tins to be allowed at one time shall be hung up in the place of storage.

6. All due precautions shall be taken for the prevention of accidents by fire oxplosion.

7. This license is not transferable. If the holder of the license wishes to transfer it, he must apply to the Secretary to the Municipal Committee for permission to do so.

8. On the breach of any condition hereto attached, this license shall be liable to be forfeited.

Note:—The Municipal Committee may insert any other condition which appears necessary in the circumtances under which the license is granted.

नोटीस

नोटीस बेशमीं गुजाई मदें मल्हारी तेली रा० जनुनें ता० खामगांव

इस

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे जनूने ता० खामगांव येथील शेत स० न० १ याचें खातें भागाई मर्द नारायण तेली इचे नावें असून ही अजमासें दोन महिने झाले मयत झाली. इनें माझा भाऊ नामें मारुती दत्तक घेतला होता त्याचे मरणासाहि अजमासें १८ वर्षें झालीं त्यानंतर मारुतीची आई म्हणजे भागाई ही वारस झाली. भागाई मेल्यावर आम्ही उभयतां म्हणजे १ आनंदा व २ चिमणाजी वा॥ माहदाजी तेली वारस आहोंत इतकें असून तुझ्या ताब्यांत असलेली पट्टी आम्हांस वाहूं देत नाहीं तरी या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं सदर्हू नोटीस पावतांच ४ दिवसांचे आंत सदर्हू शेताचा ताबा द्यावा. तसें न केल्यास त्याजबद्दल दिवाणी कोर्टांत दावा करून तुजकडून शेती ताब्यांत घेतली जाईल. त्याजबद्दलचा खर्चही तुला द्यावा लागेल. शिवाय हें शेत तूं कोणापाशीं गहाण अगर खरेदी देऊं नये. दिल्यास तुजलाच जबाबदार धरलें जाईल. शेत जबाबदार राहणार नाहीं. कळावें. ता० २७।९।११ इ०

सही

चिमणाजी वा॥ महादाजी तेली रा० जनूने ता० खामगांव नि० खु० आंगठा.

आज मु० आकोला

नो० नं० २१९

नोटीस

नोटीस बेशमी सदु वा॥ नथु पाटील रा० कसारखेड ता० मलकापूर यांस:—

मी खालीं सही करणार याजकडून नोटिसीनें तुम्हास कळविण्यांत येतें कीं तुम्हास कुलमुकत्यारपत्र दिलें होतें. परंतु तुमची त्राईट वर्तणुक असून आमचे मतानें वागत नसून आमचे मनाचे विरुद्ध वागता. करितां तुमचें मुखत्यारपत्र आज तारखेपासून रद्द केलें आहे. या पुढें कोणतेही तऱ्हेचा व्यवहार करूं नये. केल्यास तुम्ही जबाबदार धरले जाल. कळावें. तारीख २६।९।११ इ. मुक्काम खामगांव.

सही

योगाजी वा॥ नवलाजी रा० सांगोत

याचे हाताची निशाणी असे.

नो० नं० २१६

जाहिरात

सर्व लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं मौजे मोलेगांव येथील सर्वे नंबर ६२ एकर २९ गुंठे ८ आकार रु. ६४ व कसबे मलकापूर येथील सर्वे नंबर ४८० एकर ९ गुंठे ६ आकार रु० १९८–॥ हे दोन्ही नंबर आमचे मालकीचे वडिलोपार्जित आहेत. तसेंच मोठे बाजारांत एक दुकान व लहान बाजारांत दुकानें दोन अशी आमची स्थावर जिन्नगी आहे. तिजविषयींची अफरातफर अथवा गैरकायदा तजवीज आमची पुतणी घोंडीबाई नवने मुल्हासिंग व मुल्हासिंग हे मिळून करण्याचे विचारांत आहेत. त्याजपासून ह्या जिन्नगी पैकीं कोणतीही बाब ह्या वरील लिहिलेले इसमापासून कोणी बक्षीस किंवा खरेदी किंवा गहाण किंवा वहीवाटीस घेऊं नये. घेतल्यास त्याची जबाबदारी आमचेवर राहणार नाहीं. हें सर्वांस कळविण्या करितां जाहिर केलें आहे तें सर्वांस कळावें ता० २७ माहे मे सन १९११ इसवी. सही

हिरालाल रूपचंद दलाल राहणार मलकापूर द० खु०

नो० नं० २२२

आयर्वेनाषधालय मुर्डी.

व्हाईसरॉय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल याजकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं आमचीं औषधे बारिक हर्ल्ली वर्तमानपत्रांतुन ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत अहेत त्याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास देणें आहे. हे असाधारण लक्ष ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्य कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखाद औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

मदनामृत संजविनी

वाजीकर, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जो धातु ती शुद्ध अमेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें तो दोषी अमेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरुपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षी पाहिजे या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हे अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नदोष इतर धातुगत उद्भवणें इंद्रियशिथिलता, कडकी. गर्मी बंधी मुरलेले विकोप मुत्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, पठ पाठ मांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, मंदाग्नि मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमाद्य मस्तकशुळ, मुळव्याधी. वातरोग, निद्रानाश पित्तावर. चाळंतरोग, मधुमेह जूनाट परमा, मुष्ठीमैथूनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीं बंद होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनेल. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त यांची शुद्ध वृद्धी, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचूं लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक अहेत करितां गुणावद्दल असंख्य सर्टिफिकेटें मिळालीं अहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यास पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी अहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल अनुपानखर्चे सोबत किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील.

दरः—एकदम ३९ गो० १ रु०, ७९ गो० २ रु० ११९ गो० ३ रु० १२९ गो० ४ रु० २७९ गो० ६ रु० ५९० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः—यानें वदस. साहर, फुल, खुपऱ्या. बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिसत नाहीं. बा० कि० १ १। भार बाटलीस रु० २

३ दंतबलवर्धक पूडः—दंत संबंधी सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें मुल्या ३ ते० ८ आणे

६ गजकर्ण.—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः—औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नाहींत. १० पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधान हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं मंग्रहीं तापावर गोळ्या, गाठीस मलम, वात चढू नये म्हणून पोटावर मात्रा ठेवून याचा एकवार अनुभव पहावा गुणावद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक कि० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा कॅटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्यावद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगावर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म खाक, गुटीका, आसवे, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्च सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोकडीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाचा निदान चिकीत्सा कळवूं.

अत्यंत आगत्याचा सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहीराती सुरूं असून प्रत्येक जाहिरात सुशोभित करून जो तो पुढें येऊं पाहात आहे. आपला समाज निरुद्योगी आळशी बनल्याभुळें एकदा जो धंदा सुरूं केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नकल करून वाटेल त्यानें करावी आमचे जाहितीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आजिबे वगैरे गावांतुन तो पुणेविस्तेत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याचा आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी ज्याची तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हच कीं rs यांचा कारखाना आज सतत १९।२० वर्षे अव्याहत सुरूं असून ज्यांच्या t म झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कोट्यावधी ग्राहक, रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करत अशाच प्रकारें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असले। व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आयर्वेदज्ञ व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरावी, एकदां अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षात ठेऊन औषधें मागवीं ती खालील पत्यावर बिनचूक मागवावी म्हणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

नो. नं. २४

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

Oriental Government security
LIFE ASSURANCE COMPANY
Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Berar manager,

HEAD OFFICE—BOMBAY

HEAD —QUARTERS— NAGPUR.

FUNDS Exceed 3 3/4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application—

M. DESOUZA,

CHIEF AGENT, Nagpur.

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

हें पत्र आकोलः येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

Registered No. N. 4

वर्ष ३५] आकोला—सोमवार तारीख १२ माहे जून सन १९११ इ॰ [अंक २३

वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस.....१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ..... २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वाहिवाट ठेविली आहे.

नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

जाहिरात

मुंबई व्यांकेची सेव्हिंग व्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमाच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई व्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०५ } एजंट.
नं १

मुंबइ बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या [illegible] चिपा मुंबई बँकच्या आकोले [illegible] येथील ऑफिसांत विकत [illegible] इकानें जास्त माहिती करितां [illegible] वा.

[illegible] वजन २६ ३/४ तोळे असतें.

[illegible] च्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. Phillips.
आकोला २१-९-१० } एजंट.
नो॰ न॰ २

नोटीस.

नोटिस बेशमी साळंकी मर्द केशव रंगारी राहणार मौजे नांदुरें खुर्द ता॰ मलकापूर हिसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं खालीं लिहिलेला स्थावर माल व जंगम माल माझे वाडवडिलांचे हातचा संपादन केलेला आहे. त्याचा तपशीलः—

१ मौजे वडाळी तालुका मलकापूर येथील शेतें ३

२ धावीं खांब १५ वर माडी धाव्याची खांब ६ व धाव्या लगत दिनाची छपरी एक पाखी. या शिवाय असलेला जंगम माल तांब्यापितळेचीं भांडीं व चांदीसोन्याचें डागीने वगैरे.

येणें प्रमाणें जिंदगी माझे वडिलांचे कमाईची असून त्याजला मरण्याला आज सरासरी ३—३॥ वर्षें झालीं. त्यांनीं जिवंतपणीं तीन शेतांपैकीं १ शेत विकून कर्जाचीं सर्व फेड केली. तेव्हांपासून माझी आई नामें बनाबाई इनें १ वर्ष मज पाळणपोषण करून नंतर तिनें आपलें गंधर्व करून निघून गेली. तिजला जाण्याला आज सरासरी २ वर्षें झालीं तेव्हांपासून मज पाळणपोषण माझा मामा नामें मारुती वलद बाबुसा रंगारी हा करीत आहे. हल्लीं असें ऐकण्यांत येतें कीं माझे वडिलांचे हातचीं २ शेतें तुम्ही माझ्या संमती वांचून गहाण ठेविल्याचें ऐकितों. **करितां या** नोटिसीनें कळविण्यांत येत आहे **कीं माझे** वाडिलांचे हातची असलेली जिन्नगी माझे व मामाचे संमती वांचून गहाण, **खरिदी** अगर बक्षीस देण्यास तुमचा या **मालावर** मुळींच हक्क नाहीं. जर करिता **तुम्ही असें** केल्यास तो व्यवहार रद्द असे. **जर तुम्ही** गहाण वगैरे व्यवहार **केल्यास तुमचेवर** रीती प्रमाणें दिवाणी दावा करून शेतें व घर ताब्यांत घेतलें जाईल.नतर तुम्हाला या नोटिसीचा खर्च व दाव्याचा खर्च भरून देणें भाग पडेल ही नोटीस दिली. ता॰ २९।५।११ इसवी.

सही
१ गोंडु वलद केशवसा रंगारी
अ॰ पा॰करणार मामा मारुती
वलद बाबुसा हातचीं अक्षरें
रा॰ कजवे नांदुरा.

नो॰ नं २२६

नोटीस

रा॰ उमाकांत अमृत ब्रम्हण किन्हीकर रा॰ हल्लीं वझर ता॰ खमगांव यासः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस कीं म्यां तुह्मास ता॰ २६-३-१९ रोजीं मुखत्यारपत्र करून दिलें. आतां तुमचें आमचें कांहीं कारणांनीं जमत नसल्यानें तें कुलमुखत्यार पत्र आज पासून रद्द केलें आहे. आतां आपण आमच्या वतीं कोणतेंच काम कुलमुखत्यार या नात्यानें करूं नये. केल्यास आपल्यावर कायद्याप्रमाणें तजवीज करण्यांत येईल.

या नोटिसीनें सर्वत्रांस जाहिर करितों कीं रा॰ उमाकांत अमृत यास अज तारेखे पासून कुलमुखत्यारपणांतून दूर केलें. त्यांच्याशीं आमच्या स्थांवरजंगम इस्टेटी संबंधानें कोणी कांहींही व्यवहार आमचे सहीच्यावांचून केल्यास रद्द बातल समजला जाईल व त्याची जबाबदारी आह्मांवर अगर इस्टेटी कोणत्याही प्रकारें नाहीं. कळावें. ता॰ २-६-११ इ॰

सही
सकाराम वलद दत्तुजी साबळे वती
संपत चंद्रभान गावंडे रा॰
किन्ही द॰ खु॰
नो॰ नं॰ २२७

नोटिसीचे उत्तर

नोटीस बेशमी जनी मर्द हरीनाथ मुक्काम राजंदा ता॰ आकोला जि॰ आकोला यासः—

खालीं सही करणार याजकडून नोटिसीचें उत्तर देण्यांत येतें कीं तूं वऱ्हाडसमाचार वर्तमान पत्रांतून अंक १९ ता॰ १९-९-१९११ इ॰ स नोटीस दिली आहेस. त्यांत आह्मी तुजला नीट रीतीनें वागवित **नाहीं** व तुजला आईबापाचे घरीं नेऊन **घातलें** हा मजकूर खोटा लिहिला असून तुजला शहाणे होण्यास फक्त दीड वर्ष **झालें आहे** व तूं ६ वर्षें लिहीलीस हें **बरोबर नाहीं**. अज्ञान अवस्थेंत एकदोन वेळ तुझे बापानें आणून घातलें व त्याप्रमाणें आह्मी तुझें संगोपन नीट रितीनें केलें. हल्लीं तूं सज्ञान असून वाईट संगतींत पडल्यामुळें तुजला आमचे येथें राहणें प्रशस्त वाटत नाहीं व सज्ञान झाल्या पासून वर्ष दीड वर्षांत तूं आमचे घरीं आली नाहींस. आह्मी तुजला आणण्यास दोनतीन वेळ आलों असतां तुझे बापानें पाठविलें नाहीं. हल्लीं तुझे व तुझे बापाचे मनांत माझा संसार न करूं देता दुसरा नवरा करण्याचा विचार दिसत आहे. तरी आज तारखेपासून १५ दिवसांचे आंत तुझे अंगावरील डागीन्या मुद्दां तूं आमचे घरीं आली पाहिजे. मी तुजला वागविण्यास तयार आहे. याप्रमाणें तुझेकडून न झाल्यास व माझे लेखी फारकती शिवाय तूं दुसरा नवरा केल्यास रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल. या नोटिशीचा खर्च व पुढें लागणारा खर्च तुजला द्यावा लागेल. कळावें. तारीख १।६।१९११ इ॰

सही
हरीनाथ वल्लद शिवरामनाथ राहणार
चांदूर निशाणी खुद
हातचीं असे
तर्फे सदाशिवनाथ भोलानाथ
आज मुक्काम आकोला. कुरणखेडकर
नो॰ नं॰ २२९

नोटीस

चेशमी भगु वा॥ नन्हा मोरे महार वस्ती अमानतपूर ता॰ व जिल्हा आकोला यासः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आपल्या मालकीचें शेत मौजे अमानतपूर येथील सर्व्हे नं॰ २१ एकर १४ गुंठे ३७ आकार रुपये २८ हें शेत ४०० रुपयांच्या मोबदल्यांत १३१९ फसली पासून १३२४ अखेर पर्यंत ६ पीकांच्या भोगवट्या साठीं माझ्या स्वाधीन केलें. आणि त्या प्रमाणें मी दोन पीकें घेतलीं.

यंदा १३२१ फसली साला पासून ३ पीकें दरसाल २२० रुपये स्वामीत्वानें मज पासून घेण्याचा करार करून २७।४।११ रोजीं तुह्मी सदहू शेताची कबुलायत लिहून नोंदून दिली. परंतु हा व्यवहार करण्यांत तुमची बेमानी होती व हेतु मला फसवून डुबविण्याचा होता. तुह्मी वरील कबुलायती नंतर लागलींच तें शेत भोरदच्या रा॰ रा॰ मारुतीच्या पाटलास गहाण दिलें व त्या नंतर त्याच शेताची विक्री लट्टापट्टीनें आपला जांवई शेगांवचा महार याच्या नांवानें करून दिली; आणि या रितीनें तुह्मी नादार बनला आहा आणि उभ्या पीकावर स्वामीत्वाचे रुपये वसूल करीन झटलें तरी देखील तुह्मी मज कडून घेऊं केलेला ३ वर्षांच्या वहितीचा हक्क आपल्या भाच्यास देऊन टाकला आहे. वरील प्रकार कळल्या वरून आह्मी तुमची कबुलायत रद्द करून टाकली आहे. माझी राहिलेलीं ४ पीकें पुरी होई पर्यंत तुह्माला किंवा तुमच्या कडून येणाऱ्या दुसऱ्या कोणाहि इसमाला शेतांत पाऊल टाकण्याचा अधिकार नाहीं. तुह्मी शेतांत याल तर तुह्माला हाकलून दिलें जाईल. आणि तुह्मावर फौजदारी करण्यांत येईल. तुमच्या कबुलायती प्रमाणें मी तुह्मास शेतीचा तावा दिला नव्हता आणि आतां या पुढें तावा तुह्माला किंवा तुमच्या वतीच्या माणसाला करूं देणार नाहीं. तुह्मी दगलबाजीनें मला फसविण्याचा प्रयत्न केल्या बद्दल तुह्मी माझी नुकसानी भरून द्यावी; नाहीं तर आठ दिवसांच्या मुदती नंतर मी तुह्मावर फौजदारींत काम चालविणार आहे. नोटिशीचा खर्च तुह्मावर पडेल: कळावें ता॰ २३ मे १९११ इ॰

सही
मारुती रंभाजी मुकटे पाटील
रा॰ अमानतपूर ता॰ आकोला
निशाणी बखर.
नो॰ नं॰ २३२.

वऱ्हाडसमाचार

जेष्ठ वद्ध १ शके १८३३ दुर्मतीनाम संवत०

आमच्या प्रांताची औद्योगिक पाहणी.

लेखांक ३.

कुंभार आणि चांभार यांचे धंदे.

—०—

मागच्या अंकांत कोष्टी, मोमीन वगैरे लोकांच्या ह्मणजे विणकामाच्या धंद्याची स्थिति कशी आहे व ती सुधारण्यासाठीं कोण कोणत्या उपायांची शिफारस झाली आहे तें सांगितलें. आज कुंभार आणि चांभार यांच्या धंद्या विषयीं दोन शब्द लिहावयाचे आहेत. ह्या दोन्ही धंद्यांचा संबंध एकंदर जनतेशीं येतो. श्रीमंत असो, गरीब असो, प्रत्येकाला राहण्यास घर लागतेंच. घर बांधण्याला विटा, कौलें, नळे वगैरे लागतात. गरिबांच्या घरीं तर स्वैपाकाचीं व पाणी भरण्याचीं भांडीं ह्मणजे मडकींच असतात. वऱ्हाडसारख्या उष्ण प्रदेशांत जोड्यांवांचून गोरगरिबांचा सुद्धां निभाव लागत नाहीं. तेव्हां या दोन धंद्यांची स्थिति कशी आहे तें आपण पाहूं. १९०१ सालच्या खानेसुमारीचे आंकडे घेतले तर प्रत्यक्ष कुंभारजातीची लोकसंख्या ४ लक्षांनीं कमी झालेली दिसते. पण धंद्याची स्थिति पाहावी तर निकडे तिकडे विटा आणि कौलें यांचीं बांधलेलीं नवीं नवीं घरें दिसत आहेत. कुंभाराच्या धंद्याला विशेषसें कौशल्य लागत नसल्यामुळें इतर जातींचीं माणसें या धंद्यांत पडलीं असण्याचा संभव आहे. तशी कल्पना केली तर त्यावरून असें अनुमान निघतें कीं ज्या अर्थीं इतर धंद्यांतल्या माणसांचा ओढा या धंद्याकडे आहे, त्या अर्थीं या धंद्याची भरभराट असली पाहिजे. पण नुसत्या नव्या नव्या इमारतींच्या संख्येवरून असें अनुमान काढणें चुकीचें होईल. कुंभाराच्या मालापेक्षां कौलें व विटा यांना जरी अधिक मागणी असली, तरी दुसऱ्या प्रकारच्या कांहीं मालाला ह्मणजे मडकीं वगैरेना मागणी कमी आहे. तेव्हां या धंद्याची भरभराट आहे हें अनुमान दूषित आहे यांत संशय नाहीं.

कुंभाराची चाकावर मडकीं, कौलें वगैरे करण्याची आणि तीं भट्टींत घालून भाजण्याची रीत सर्वांना माहितच आहे. ही रीत त्रेतायुगापासून जी चालत आली आहे तींत या घटके पर्यंत बिलकुल फरक झालेला नींहा. परदेशी माल या देशांत येऊन आपला धंदा बुडवील अशी भीती या देशाला नसली तरी युरोपियन कंपन्या या देशांत येऊन यांत्रिक कलेनें थोड्या वेळांत अधिक चांगला माल काढून आपला धंदा बसवील कीं काय ही भीती कुंभारांना आहे. शिवाय, मातीच्या भांड्यांचे मुख्य प्रतिस्पर्धी ह्मणजे टिनचीं वरून मिन्याचा रंग दिलेलीं भांडीं हीं आहेत. सध्यां दारावरून भिक्षा मागत हिंडणाराच्या हातांत मुद्धां खापरी परळाच्या ऐवजीं एनामेलची वशी दिसूं लागली आहे. कुंभाराच्या धंद्यांत अगोदरच प्राप्ति कमी. सरकारी अधिकाऱ्यांच्याच रिपोर्टावरून कुंभाराची रोजची सरासरी प्राप्ति-ह्मणजे अडीचपासून साडेचार आणे पर्यंत होते असें प्रमाण निघतें. या अल्प प्राप्तींत आणखी वांटेकरी मिळाला ह्मणजे निकालच लागला ह्मणावयाचा ! सध्या पाच्या वाहणारे मजूर मुद्धां पांच आण्याखालीं कामाला मिळत नाहींत, आणि ज्याचा गरिबाच्या संसाराशीं नित्य संबंध त्या प्राचीन काळापासून चालत आलेल्या कुंभाराच्या धंद्याची ही स्थिति! तेव्हां या धंद्यांत सुधारणा करण्याला जागा तरी कोठें आहे हें पाहणें अवश्य आहे. टिनच्या मालामुळें मातीच्या भांड्यांना, आणि विलायती कारखान्यांतल्या पक्क्या विटांमुळें देशी विटांना कमी भाव मिळतो, यंत्रापेक्षां हातानें कमी माल निघतो, व सर्पणाच्या टंचाईमुळें भाजण्याचा खर्च अधिक येतो या तीन गोष्टींत सुधारणा होणें अवश्य आहे. शिवाय मातीच्या भांड्यांना इकडच्याच कांहीं पदार्थांनीं झिलई देतां आली तर साधारण मध्यम स्थितीचे लोक सुद्धां चिनई मातीच्या भांड्या सारखा त्यांचा उपयोग करूं लागतील. माल पुष्कळ काढावयाचा ह्मणजे माती तयार करण्यासाठीं यंत्राचा उपयोग केला पाहिजे. हीं यंत्रें प्रत्येक कुंभाराला घेतां येणें शक्य नाहीं. ह्मणून सहकारी तत्त्वावर मंडळी स्थापून तीं आणावींत. भट्टीची रचनाही तर्पण कमी लागेल अशा तत्त्वावर करावयास पाहिजे. मुख्यत: या धंद्यांत चांगल्या जाणत्या सुशिक्षित माणसांनीं पडून इतर देशांतल्या या धंद्यांतलें कौशल्य आपले देशांत आणून सोडलें पाहिजे. तरच ही स्थिति सुधारेल. नाहींपेक्षां मजुरांपेक्षां ही कुंभाराची स्थिति वाईट होणार हें ठरल्यासारखें आहे.

चांभाराच्या धंद्याची स्थिति तर याहून ही वाईट आहे. १८९१ सालीं या धंद्याची लोकसंख्या सुमारें दीड लक्ष होती. १९०१ सालीं ती एक लक्ष सुद्धां राहिली नाहीं! यांचें कारण दुष्काळ, प्लेग वगैरे दैविक आपत्ति नाहींत. अलीकडे साऱ्या जगांतच कातड्याचा माल ज्यास्त वापरण्यांत येऊं लागला आहे आणि त्यामुळें विलायतेसारख्या देशांत इकडून चामडीं फार जात आहेत. हीं चामडीं कचीं इकडून तिकडे जातात आणि क्रोम नांवाच्या एका विशिष्ट व कमी खर्चाच्या पद्धतीनें कमावलीं जाऊन निरनिराळ्या मालाच्या रूपानें इकडे परत येतात. युरोपियन चांभार स्वत:च्या भांडवलावर व्यापार करणारे असतात. शिवाय त्यांची व्यापाराची संयुक्त पद्धति, यंत्रांची मदत, क्रोमसारखी स्वल्प पद्धति, शास्त्रीय ज्ञानाची प्रगति, पेटंट लेदरचा माल वापरण्याची लोकांची आवड, वगैरे अनेक कारणांमुळें परदेशी मालाला उत्तेजन मिळत आहे, आणि आमच्या इकडे चांभारांची कफल्लक स्थिति, संयुक्त व्यापारपद्धतीचा अभाव, घोर अज्ञान, पुरातनपद्धतीला चिकटून बसण्याची संवय, वगैरे गोष्टींमुळें त्यांचा धंदा खालीं जात चालला आहे. क्रोमपद्धति आणि आमच्या इकडची कातडीं कमावण्याची पुरातन पद्धति यांच्यांत तुलना करण्याचें हें स्थळ नाहीं. तथापि क्रोमपद्धति रासायनिक द्रव्याच्या साह्यानें चालणारी असल्यामुळें त्या पद्धतीनें अल्प श्रमांत, व काळांत कातडें कमावलें जातें; इतकेंच नाहीं तर अमकें कातडें कमावल्यावर अमक्या प्रकारचें दिसेल असें निश्चयानें सांगतां येतें. जुन्या पद्धतीनें हें आगाऊ सांगतां येत नाहीं जें होईल तें होईल असा दैवावर हवाला ठेवून बसावें लागतें असा ही त्यांतला एक भेद आहे. क्रोमपद्धतीनें कातडें पांच दिवसांत कमावलें जातें, आमच्या जुन्या पद्धतीनें दुप्पट वेळ लागून पुन: तें चांगलें टिकाऊ होत नाहीं. याचें कारण चामड्याला लाविलेला चुना चांगला साफ काढून टाकण्याची विद्या आमचे चांभारांना अद्याप ठाऊक नाहीं. क्रोमपद्धतींत रासायनिक द्रव्याचाच मुख्यत: उपयोग केल्यामुळें चुना सहज काढून टाकतां येतो. व त्यामुळें तें कातडें ज्यास्त टिकाऊ होतें. क्रोमपद्धतीनें एक चामडें कमावण्यास खर्च सरासरी १ रु० येतो; आमच्या जुन्या पद्धतीनें कदाचित थोडा कमी आला, तरी क्रोमचें कातडें अधिक टिकाऊ व दिसायला ही चांगलें व वजनांत हलकें असतें. यामुळें तें अधिक पसंत पडतें. या सर्व गोष्टींचा विचार केला ह्मणजे क्रोमविद्यात इकडे जितकी लवकर सुरू होईल तितकें इष्ट आहे असें वाटतें. मद्रास सरकारनें लोकांत क्रोमपद्धतीची आवड उत्पन्न करण्यासाठीं व लोकांना तिची माहिती करून देण्यासाठीं मुद्दाम एक सरकारी कारखाना काढला होता. त्यांतून तयार होऊन निघालेल्या अनेकांनीं मग स्वत:चे क्रोमपद्धतीचे कारखाने काढले

हल्लीं मद्रासेकडे क्रोमपद्धतीचें वीं चांगलें रुजलें आहे. पण याच्या मुळाशीं सरकारनें दिलेलें उत्तेजन आहे. आमचें प्रांतिक सरकार ही उमरावतीच्या टेक्निकल स्कूलला जोडून क्रोमपद्धतीनें चामडीं कमावण्याचा वर्ग काढील व ती पद्धति शिकविण्यासाठीं मद्रासच्या चटर्टनसाहेबा सारख्या हुशार, उत्साही आणि देशी धंद्याची भरभराट चाहणाऱ्या कारागिराची नेमणूक करील तर आमच्यांतल्या बुडूं पाहणाऱ्या एका धंद्याला हातभार लावण्याचें श्रेय त्यांचे पदरांत पडेल. आमच्या प्रांतांत पुष्कळ धनिक लोक आहेत. आपलें भांडवल कोणत्या कारखान्यांत घालावें या गोष्टीचा पुष्कळ वेळां त्यांना विचार पडतो. त्यांनीं मनावर घेतल्यास त्यांना ही ही गोष्ट करतां येईल. इच्छा मात्र पाहिजे.

मध्यप्रांत आणि कायदे कौंसिल.

मध्यप्रांताच्या वतीनें कायदे कौंसिलांत मेंबर असण्यापेक्षा आमच्या प्रांताला स्वतंत्रच कायदे कौन्सिल मिळणें न्यायाचें आहे असें सरकारच्या नजरेस आणून देण्याचे कामीं ना० रा० ब० मुधोळकर, ना० चिटणवीस, व डा० हरसिंग गौर वगैरे लोकनायकांनीं जे परिश्रम केले, त्यांची सफलता लवकरच दृष्टीस पडेल अस कळत. या संबंधांत स्टेटसेक्रेटरीसाहेबाकडे पाठविण्याकरीतां हिंदुस्थानसरकारनें एक योजना तयार केली नसून ती आतां बहुतेक तयार झाली आहे अशी ताजी खबर आली आहे. मध्यप्रांत व वऱ्हाड हे देश विद्याप्रसार, व्यापार, उद्योगधंदे वगैरे कोणत्याही बाबतींत इतर प्रांतांहून मागें नसतां त्याला राज्यकारभारांत त्याच्या योग्यतेप्रमाणें स्थळ मिळत नाहीं अशी लोकांची बाजवी तक्रार आहे व ती स्वतंत्र कायदे कौन्सिलाच्या स्थापनेनें अंशत: तरी दूर होईल अशी आह्मांस वाटत. कायदे कौंसिलाच्या मागोमाग इतर राजकीय सुधारणा आपोआपच जातील. या दृष्टीनें या प्रथम सुधारणेचें महत्त्व किती आहे तें सहजच सर्वांच्या लक्षांत येईल.

कायदेशीर चळवळीचा विजय.

दक्षिण आफ्रिकेंतल्या हिंदी रहिवाशांनीं आपल्या नागरिकत्वाच्या हक्काच्या रक्षणार्थ जी कायदेशीर चळवळ आज कित्येक वर्षे चालविली आहे आणि जिच्या प्रीत्यर्थ रा० गांधी व त्यांचे स्वदेशाभिमानी अनुयायी यांनीं नानाप्राकारचा छळ व अवर्णनीय हालअपेष्टा सासून अचाट स्वार्थत्याग केला आहे त्या कायदेशीर चळवळीचा विजय होण्याचीं चिन्हें सुदैवानें दिसूं लागलीं आहेत. या चळवळीचें सुकाणूं रा० गांधी यांच्यासारख्या पूर्ण राजनिष्ठ, खऱ्या देशाभिमानी, दृढव्यासंगी, आणि अप्रतिम धैर्यशाली पुरुषाच्या हातीं होतें ह्मणूनच या थराला गोष्ट आली. मि० गांधी यांच्या जागीं एखादा लोकमान्य दे० भ० असता, तर काय अनर्थ झाला असता तें सांगतां येणें कठीण आहे. रा० गांधी यांच्या दीर्घ प्रयत्नाला अखेर यश आलें यांत त्या थोर पुरुषाच्या अंगच्या अलौकिक गुणांचा तर गौरव आहेच, पण त्याबरोबर असेंही ह्मणतां येईल कीं भयंकर दिव्याच्या कसोटीस लावून पाहिल्यानंतर त्यांतून उत्तीर्ण होणाऱ्यांच्या श्रमाची सफलता करण्याइतका थोरपणा ब्रिटिश मुत्सद्द्यांच्या अंगीं आहे, आणि सार्वभौम सरकारचा तरी हा जयजयकारच ह्मटला पाहिजे. दक्षिण आफ्रिकेंतल्या हिंदी लोकांची ग्रहदशा संपून त्यांना अपेक्षित असे सगळे हक्क मिळाल्यानंतर या कायदेशीर लढाईतले वीरचूडामणी रा० गांधी यांच्या सन्मानार्थ त्यांचा एक पुतळा दक्षिण आफ्रिकेंत उभारला जावा अशी आह्मी मनोभाव सूचना करतों.

साहित्यसेवा

गेल्या मार्च अखेर मुंबई इलाख्यांत प्रसिद्ध झालेल्या इंग्रजी, गुजराथी, कानडी, व मराठी पुस्तकांची तिमाही यादी प्रसिद्ध झाली आहे. ती अनेक दृष्टीनें विचार करण्यासारखी आहे. देशी गृहस्थांत चांगले फर्डे इंग्रजी लेखक कांहीं थोडे नाहींत. पण त्या मानेंत ग्रंथलेखनाचा मान साऱ्या दोनतीन गृहस्थांच्याच वांट्याला आला आहे ! रा. ब. कृष्णाजी बल्लाळ देवल यांनीं हिंदुसंगीतशास्त्र आणि बावीसश्रुति यांच्या विषयींचा लिहिलेला निबंध हा त्यांना

[illegible] कित्येक वर्षे त्या विषयाच्या लागलेल्या ध्यासाचें पक्व फळ आहे. दुसरें इंग्रजी पुस्तक रा. बेहेरे यांचें हिपनॉटिझम वरचें होय. हें आह्मी पाहिलेलें नसल्यामुळें त्याविषयीं कांहीं लिहितां येत नाहीं. पण या विषयावर इंग्रजींत अगोदरच पुष्कळ ग्रंथ असतां त्या भाषेंत ग्रंथ लिहून ग्रंथसंग्रहांत भर टाकण्यापेक्षां मराठींत रा. बेहेरे यांनीं सदर ग्रंथ लिहिला असता तर मायभाषेची थोडी तरी सेवा केल्याचें श्रेय त्यांना मिळालें असतें.

गुजराथी लोक सधन असल्यामुळें आणि पोटांपाण्याची चिंता त्यांना विशेषशीं न वाहावी लागल्यामुळें त्या लोकांत साहित्यसेवा करणारांची संख्या अधिक आह असें आपणांस वारंवार सांगण्यांत येतें. मुसल्या लेखकांच्या संख्येपुरतीच ही तुलना असेल तर आह्मी तिला हरकत घेत नाहीं, आणि तिला महत्त्व ही देत नाहीं. पण सारमय वाङ्मय निर्माण करण्याच्या सामर्थ्याच्या दृष्टीनें मराठी व गुजराथी यांची तुलना कोणी करील तर मात्र मराठी भाषेलाच वर्चस्व द्यावें लागेल. मार्च अखेरच्या तिमाही रिपोर्टांत गुजराथी पुस्तकांची भली मोठी संख्या आहे. पण त्यांतलीं पुष्कळशीं चोपडीं स्तोत्रें, नाटकना गायनो, किंवा अशाच तऱ्हेचीं आहेत. शास्त्रीय विषयावरचीं पुस्तकें ह्मणजे अलंकारशास्त्रावर एक, अर्थशास्त्रावर एक, स्वरशास्त्रावर एक, आणि संगीतावर एक अशीं चार आहेत. यांतल्या शेवटच्या दोहोंत स्वतंत्र रचना नाहीं. पहिल्यांत मात्र आहे. स्वरशास्त्र हें पुस्तक प्राणायामविषयक आहे. असें असतां रिपोर्ट करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांनीं त्या विषयींची माहिती देतांना त्याला ध्वनिशास्त्र Science of Sound ठरविलें आहे! यावरून रिपोर्टराच्या आफिसांतल्या व्यवस्थेचा हा एक मासला बघण्यासारखा आहे! मागें एकदां 'सुधारक'कारांनीं रा. हरि नारायण आपटे कृत एका ऐतिहासिक कादंबरीस चरित्राच्या वर्गांत घातलें होतें त्याची यावेळीं आह्मांस आठवण होते. असो. गुजराथी पुस्तकांत अविवाहितांचें कान्फरन्स ह्मणून एक फार्साचें पुस्तक आणि माझी विलायती पाटलोण ह्मणून एक उपहासपर चोपडें आहे. दोन्ही आमच्या इकडच्या तरुणी शिक्षण नाटिकेच्या काळाला शोभणारीं आहेत. यावरून मराठी वाङ्मय ज्या अवस्थेंतून सुखरूप पार पडलें आहे त्या अवस्थेंत गुजराथी साहित्य अद्याप आहे असें दिसतें.



गुजराथीकडून आतां आपण मराठीकडे वळूं गेल्या तिमाहींत शास्त्रीय विषयावर तीन ग्रंथ मराठींत झाले. एक फोटोग्राफीवर, दुसरा मेस्मेरिझमवर, आणि तिसरा अर्थशास्त्रावर. तिन्ही ग्रंथ चांगले आहेत. तिन्ही पुस्तकें त्या त्या विषयांतल्या पूर्ण वाकबगार माणसांनीं लिहिलीं आहेत. चरित्रविषयक पुस्तकें दोन आहेत. एक परलोकवासी श्री. आपासाहेब जमखिंडीकर यांचें चरित्र व दुसरें हरिभक्तिपरायण लक्ष्मणराव पांगारकर यांचें एकनाथचरित्र हें. दोन चरित्रें दोन प्रकारचीं आहेत. पहिल्यांत घटनावैचित्र्य मुळींच नाहीं. हा चरित्रकाराचा दोष नाहीं. दुसऱ्यांत एकनाथमहाराजांच्या चरित्रांतील अनेक प्रसंग अंधश्रद्धेनें व रसाळ वाणीनें वर्णिले आहेत. ऐतिहासिक दृष्टि, रहस्योद्ग्राही दृष्टि, व चिकित्सकदृष्टि यांचा संगम या पुस्तकांत झालेला दिसेल अशी प्रौढी स्वतः ग्रंथकारानें प्रस्तावनेंत मारली आहे. पण आंत पाहावें तों या तीहींचा ही पूर्ण अभाव! मनोरंजनपरग्रंथांत रा. ह. ना. आपटे यांचींच बहुतेक पुस्तकें आहेत, आणि तीं ही नवीं नसून जुन्या पुस्तकांच्या नवीन आवृत्तिमात्र आहेत! मनोरंजनपर पुस्तकांचें इतकें दुर्भिक्ष या तिमाहींत जितकें भासतें, तितकें पूर्वी कधींही भासल्याचें आह्मांस स्मरत नाहीं. ऐतिहासिक ग्रंथ असा ह्मणण्यासारखा एकच— रा० खरे यांचा ऐ० ले० संग्रहाचा ६वा खंड— आहे. रा० खरे यांचे अचाट परिश्रम, व्यवस्थितपणा, विषय सुबोध करण्यासारखा उपोद्घात लिहिण्याची शैली, व सत्यनिष्ठा या विषयींच्या लौकिकास शोभण्यासारखाच हा ग्रंथ आहे. थोडे दिवसांपूर्वी ब्रिटिशसरकारचा जयजयकार करण्यास पुढें येण्याचें मनोधैर्य फार क्वचित् दिसे. कारण, तसें करण्याला दे० म० मंडळीकडून होणारा अनन्वित छळ सोसावा लागे; पण तेवढी अडचण सरकारानें दूर करतांच सार्वभौम सरकारचा जयजयकार करण्यास व विद्येची महती गाण्यास (हिंदुस्थानांत गेल्या पाऊणश वर्षांत जो विद्येचा प्रसार झपाट्यानें झाला आहे तो सार्वभौम सरकारचा मूर्तिमंत जयजयकार होय.) रा० भीमराव विठ्ठल महामुनि हे पुढें झाले यावरून राजकीय वातावरणाची स्थिति स्पष्ट होते. पुनर्विवाहाच्या शास्त्रसिद्धत्वाविषयीं दोन पुस्तकें झालीं आहेत. आज पन्नास वर्षें शास्त्रार्थाचा काथ्याकूट झाला तो जणूं काय पुरेसा नाहीं! आतां पुनर्विवाहाची सुधारणा शास्त्रार्थाच्या नव्हे, तर न्यायाच्या, उपयुक्ततेच्या आणि युक्तिवादाच्या पायावर उभी राहूं लागली आहे. अशा वेळीं शास्त्रार्थ धुंडाळण्यांत लेखकांनीं परिश्रम करण्याची अवश्यकता उरलेली नाहीं. तत्त्वज्ञानविषयक पुस्तकांत एकच ह्मणण्यासारखें पुस्तक आहे. तें 'खडे तात्विक बोल' हें होय. यांत दाखल केलेले उद्गार स्वयंप्रेरणेनें निघाले आहेत असें ग्रंथकार रा० मोडक हे लिहितात. तें कोणी खरे मानोत किंवा न मानोत, पण या प्रेरित उद्गारांतला कांहीं अश्लील भाग अत्यंत तिरस्करणीय असतां तो न काढून टाकल्यामुळें सदर पुस्तक एरवीं चांगलें असतां अश्लीलत्वामुळें कुलीन स्त्रीपुरुषांच्या हातांत देण्यास योग्य नाहीं या विषयीं मात्र विचारी लोकांत सहसा मतभेद होणार नाहीं.

वऱ्हाडवृत्त.

हवामान—तुफान वारा, चमकणारी वीज व सजल मेघ यांनीं सृष्टीला नूतन रूप देण्याचा प्रारंभ केला असून रोहिणी व मृग या नक्षत्रांनीं अगदीं बहार करून सोडली. हक्क समशीत व आरोग्यदायक आहे. एकंदर पाऊस दोन इंचावर झाला.

विद्युतात— गेल्या सोमवारीं सायंकाळीं येथील डिपुटी कमिशनरच्या कचेरीच्या मैदानापुढें एक बैल विजेच्या धक्यानें मृत झाला आणि याच विजेच्या पतनानें कांहीं आसपासच्या गांवीं मनुष्यें दगावलीं असें कळतें.

रा० रा० ए. जे. वाम बारिस्टर यांस आफि० मुनसफ करून बुलढाणा येथें नेमलें.

रा० रा० जी. एल. टामसन एक्झीक्युटीव इंजिनिअर यांस पूर्व वऱ्हाडच्या भागावर नेमण्यांत आलें.

रा० रा० रामचंद्र रघुनाथ टिपनीस यांस वऱ्हाडांतून बदलून ब्रह्मपुरी येथें आफि० मुनसफ नेमण्यांत आलें.

रा० रा० विनायक मोरेश्वर आकोला यांची बदली रायपुरा अन्वयें हे या आठवड्यांत तिकडे हे गृहस्थ चांगले विद्वान कायदेपंडित दोन वर्षांच्या सहवासानें विशेष ले झाले होते. हे स्वभावानें निस्पृह व का असून सरकारी काम अगदीं मौनव्रतात्वरित चालवितात पण परिचयाला व स्नेहभावाला प्रेमळ व मनमिळाऊ आहेत.

मुंबईच्या 'ओरिआंटल' लाईफ इनसुअरन्स कंपनीचा १९१० चा वार्षिक रिपोर्ट अत्यंत भरभराटीचा आहे हें कळविण्यास आनंद वाटतो ही विमा कंपनी महाराष्ट्रांत सुप्रसिद्ध असून तिचे फंड तीन पूर्णांक तीन चतुर्थांश कोट रुपयांचे आहेत. रा. रा. गोवर्धनदास खटाव हे अध्यक्ष या नात्यानें ह्मणतात कीं या कंपनीचा कारभार १९१० इतका मोठा कधींच पूर्वी नव्हता, आणि तिची सांपत्तिक स्थिति प्रशंसनीय आहे. गेल्या वर्षी सुमारें ९३ लक्ष रुपयांच्या ४९६३ पालिसी किंवा विमापत्रें देण्यांत आलीं. वर्षा अखेर ५७४५५ विमापत्रें चालू आहेत आणि त्यांच्या विम्यांची रक्कम १० कोटी ९५ लक्षाहून थोडी मोठी आहे. विमापत्रें करारा प्रमाणें पुरीं झाल्यामुळें विम्याच्या हक्कदारांमध्यें गुदस्तां २५॥ लक्ष रुपयांचा बटवाडा करण्यांत आला. गेल्या वीस वर्षांच्या कालांत विमापत्रें १० हजारा पासून ५७ हजारा पर्यंत वाढलीं हीच गोष्ट कंपनीची अभिवृद्धि सूचवीत आहे. अलिकडे विमा कंपन्या, पुष्कळ निघाल्या आहेत आणि त्यामध्यें सर्वांबरोबर टक्कर देऊन 'ओरिआंटल' इतकी अग्रस्थानीं आहे हें या कंपनीच्या व्यवस्थापकास भूषणास्पद होय.

जाहिर नेटीस

सर्वत्र लोकांस व एरंडी ता० मलकापूर येथील लोकांस. आमच्या धाकट्या भावाची लग्नाची बायको कुंगरी ही तो प्रेगनें मयत झाल्यापासून चारचौघां हूड लोकांच्या नादानें असल्यामुळें फंदफितुरांत शिरली आहे. तिचा बेत दुसरा घरठाव करण्याचा आहे ती फक्त अन्नवस्त्राची धनीण आहे. तिच्याशीं कोणी शेतीसंबंधानें व इतर जिन्नगीसंबंधानें कोणत्याच प्रकारचा व्यवहार करूं नये. तिच्या कडून कोणी [illegible] गहाण किंवा खरेदी घेऊं नये. जो घेईल त्याचा जिन्नगीवर कांहींच हक्कसंबंध किंवा वारसा चालणार नाहीं. आमच्या शेतीचा वगैरे कोणी कबजा वगैरे करण्यास आल्यास त्याजवर फौजदारींत फिर्याद करण्यांत येईल आणि त्याच्या गैरहक्काच्या कृत्यामुळें आमची जी नुकसानी होईल ती सर्व त्याजकडून आह्मी त्या इस्टेटीचे मालक व कर्ते आणि आमच्या ती पूर्ण कबज्यांत असल्यामुळें भरून घेतली जाईल. कळावें ता० २२-५-११

सह्या

(१) भवानी वा भुलजी नि० खु० आंग

(२) नारायण वा भुलजी नि० खु० आंग

रा० दोबे एरंडी ता० मलका

आज मुक्काम आको

नो० नं० २२८

नोटिशीचें उत्तर

रा० रा० हरी वल्लद देवाजी राहणार अळसणें ताळुके बाळापूर [illegible] यांस:—

तुम्ही वऱ्हाड समाचार पत्रांत २४।६ १९११ इ० रोजीं मजला नोटीस अगदीं खोटी व खोडसाळ आहे. कारण कीं तुम्ही तुमच्या म्हणजे माझ्या बायको [illegible] दिवाळी नेलें. त्या नंतर मी दोन तीन तिजला घेऊन येण्याकरितां आलों अ तुह्मी तिला पाठविलें नाहीं. तुमच्या म कांहीं तरी कुत्सित विचार येऊन माझे बायकोस ठेऊन घेतलें आहे. असून तुम्ही तिच्या खावटी बद्दल रुपये मागतां हें अगदीं गैर आहे. तिजला वागविण्यास तयार आहे. विनाकारण माझी नालस्ती करण्याक ही नोटीस दिली आहे. मी इज्ज आहे. माझ्या इज्जतीस या नोटिशीनें कमीपणा आणल्याबद्दल तुम्हास द्यावा लागेल. अशानें तिजवरील नवरेपणाचा हक्क सुटणार नाहीं. हल्लीं या नोटिसीनें कळविण्यांत येत आहे ही नोटीस पावल्या पासून ८ दि आंत माझी बायको माझ्या घरीं करावी. नाहींतर मजला कायद्या तजविज करणें भाग पडेल.

तारिख ८ माहे जून सन १९११

सही

संभु वल्लद दानू तेली

थेरोळें, पेटा एदलाबाद

मुसीवल पोष्ट कुंहे

नो० नं० २३३

तारिख ५।६।११ या अंकावरून पुढें चालू

ळघाट तालुक्यांत ज्या लोकांनीं "किंग एडवर्ड मेमोरीयल फंडा-करितां" वर्गणी दिली त्यांचीं नावें १९११

वर्गणीदाराचें नांव	राहण्याचें ठिकाण	रक्कम	शेरा
श्रावण	नीमदरी	५	
भगवानगीर	पथरोट	१०	
नथु लक्ष्मण	"	२५	
परशराम कृष्णाजी	"	१०	
रामचंद्र माळी	"	५२	
सखाराम झाली	"	१०	
श्रावण देवाजी	"	१०	
श्रावण चाभार	"	१०	
सोनाजी लोहार	"	१०	
वीठू बाळाजी कुणबी	"	१०	
संपत	पीपरखेड	१०	
जगन्नाथ कलाल	पोपटखेडा	५१	
महमदखान	"	१०	
दादू गवळी	राजपूर	१५	
राजा दळपतसींग	रानीगव्हाण	१०१	
बादीया कोरकू	रोहीखेडा	१०	
घीसेखान	"	१०	
गुमानसींग	साळ[illegible]वण	१०१	
दादू निंबाजी	सळ[illegible]ना	२०	
नुमानसींग	" [illegible]वल	१०	
वा रामा महार	" ति.चा	५	
स्टी पाटील	साळ[illegible]डित	१०	
या कोरकू	साद[illegible]दी	२५	
दू कोरकू	"	२५	
कोरकू	"	२५	
रा कोरकू	[illegible]बरीया	२५	
ा कोरकू	सावळीखेडा	१०	
मद अली	तळई	३०	
दिवसींग	तांबोळी	२५	
घसा	टेंबली	४१	
जी रावजी	टेंब्रूसोंडा	१०	
ी पाटील	"	२५	
जी	तोरनवाडी	४१	
कोरकू	टोळी	१०	
कोरकू	उखापाटी	१०१	
दासीव मानसींग	उपातखेडा	५०	
खाराम पाटील	वडापाटी	५	
ा रतसींग	वागडोहो	२००	

जगद्गुरु श्रीशंकराचार्य यांची प्रश्नोत्तरमाला.

-५०५-

हे प्रभो, कोणती वस्तु ग्रहणीय होय.

श्रीगुरुवचन.

कोणती वस्तु त्याज्य होय.

अनुचित कर्म.

गुरु कोणास ह्मणावें.

जो सत्य जाणतो व आपले शिष्यार्थ नित्य काळजी वाहतो.

सूज्ञानें प्रथम काय प्राप्त करून घेतलें पाहे?

जन्ममरणबंधापासून मुक्तता.

मोक्षरूप वृक्षाचें बीज कोणतें?

सत्कर्मापासून मिळविलेलें सम्यग्ज्ञान.

अत्यंत हितकारक असें काय आहे.

धर्म—कर्तव्यकर्म.

प्र. जगांत शुद्ध कोण?

उ. ज्याचें अंतःकरण शुद्धतो.

प्र. सूज्ञ कोण?

उ. सद्सद्विवेकी.

प्र. विष कोणतें!

उ. गुर्वाज्ञा.

प्र. जन्ममरण चक्राची शक्ति किती आहे?

उ. निरंतर विशयाचिंतन करवावयास लावणें.

प्र. नरजन्मास येऊन सार्थक कोणी केलें.

उ. जो स्वार्था करितां आणि परमार्थ करितां झटतो त्यानें

प्र. मादरे समान मोहीत करणारी वस्तु कोणती आहे.

उ. प्रपंचमोह.

प्र. तस्कर कोण?

उ. इंद्रियविषय.

प्र. हें स्थूल शरीर प्राप्त होण्याचें कारण काय?

उ. वसना.

प्र. शत्रु कोण.

उ. आळस

प्र. येथें भीतीचें कारण कोण

उ. मृत्यु.

प्र. अंधळ्या पक्षां अंधळा कोण.

उ. कामी.

प्र. शूर कोण.

उ. स्त्रियांचे नेत्रकटाक्षास मोहीत न होणारा.

प्र. कर्णपुटानें अमृता समान सेवन करण्यास योग्य असें काय आहे.

उ. सज्जनांचा उपदेश.

प्र. मोठेपणा कशांत आहे.

उ. निर्याचना.

प्र. निबिड अरण्या सारखें काय आहे.

उ. खिचरित्र.

प्र. शहाणा कोण.

उ. जो स्त्रियांचे तावडींत सांपडला नाहीं तो.

प्र. दारिद्र कोणाचें.

उ. असमाधान.

प्र. मनुष्यास हलकेपणा कशानें येतो.

उ. नीच मनुष्याची याचना केल्यानें.

प्र. कायदेशीर उपजीविका कोणची.

उ. निर्दोष क्रिया.

प्र. जडत्व कोणचें.

उ. जें वाचलें गेलें त्याचें पुनरपि मनन न होणें.

प्र. जागृत कोण.

उ. सद्सद्विवेकी.

प्र. निद्रा कोणची.

उ. अज्ञान.

प्र. कमलपत्रा वरील जलबिंदू प्रमाणें चंचल काय आहे.

उ. तारुण्य, संपत्ति आणि आयुष्य.

प्र. चंद्रबिंबा प्रमाणें शोभादायक कोण आहे.

उ. सज्जन.

प्र. 'नर्क' कोणता.

उ. परावलंबन.

प्र. 'सुख' काय.

उ. निर्मोहता.

प्र. 'सत्य' कशास ह्मणावें.

उ. सर्व भूतांस सुखदायक तें.

प्र. भूत मात्रास प्रिय काय आहे.

उ. जीवित.

प्र. दुष्परिणामाचें उगमस्थान कोणचें.

उ. गर्व.

प्र. सुख कशा पासून होतें.

उ. सज्जनमैत्री.

प्र सर्व दुःखनाशक असें काय आहे-

उ. सर्वसंग परित्याग.

प्र. 'मरण' कशास ह्मणावें.

उ. मूढता.

प्र. 'अमोलिक' असें काय आहे.

उ. बेळेवर केलेलें दान-

प्र. कांट्या प्रमाणें आमरणांत दुःख देणारें काय आहे.

उ. गुप्त पातक.

प्र. प्रयत्न कोणकोणच्या गोष्टींत झाला पाहिजे.

उ. विद्याभ्यासांत, रोगावर चांगली औषधी घेण्यांत, आणि दान करण्यांत.

प्र. कोणच्या गोष्टीची उपेक्षा करणें अवश्य आहे.

उ. दुष्ट लोक, परदारा, आणि परधन.

प्र. अहोरात्र कोणच्या गोष्टींचें ध्यान करावें.

उ. संसाराची क्षणभंगुरता.

प्र. आनंदानें दाखवावें काय.

उ. गरीबा करितां दया, व चांगल्याशीं मैत्री.

प्र. कोणाचें मन वळविणें कठीण आहे, व आमरणांत कोण वश होत नाहीं.

उ. मूर्ख, तार्किक, दुःखी आणि कृतघ्न.

प्र. चांगला कोण.

उ. ज्याचें आचरण शुद्ध. तो

प्र. नीच कोणास ह्मणावें.

उ. ज्याचें वर्तन चांगलें नाहीं.

प्र. जगास कोण जिंकतो.

उ. सत्य, शांत आणि क्षमाशील पुरुष.

उ. देव देखील कोणास वंदन करीतात.

उ. ज्याचे अंतःकरणांत दयेचा वास आहे.

प्र. सूज्ञास भीति कशाची वाटते.

उ. अशाश्वत अशा संसाराची.

प्र. सर्व जीव मात्रास वश कोण ठेवितो.

उ. जो नम्र असून, सत्य आणि सुखदायक असें भाषण करितो.

प्र. धैर्यानें स्वस्थ राहण्या सारखें असें स्थल कोणचें.

उ. नीतिपथ— ज्या मार्गानें गेले असता इहलोकीं आणी परलोकीं कल्याण आहे.

प्र. अंध कोण!

उ. दुराचरण गामी.

प्र. बधिर कोण!

उ. जो सदुपदेशास ऐकत नाहीं.

प्र. 'मुका' कोण

उ. जो प्रसंगीं आनंददायक असें भाषण करूं शकत नाहीं.

प्र. देणगी कोणची

उ. मागितल्या वांचून दिलेली.

प्र. मित्र कोण

उ. जो दुर्वर्तना पासून परावृत्त करितो.

प्र. भूषण कोणतें.

उ. सुस्वभाव.

प्र. भाषणाचा आलंकार कोणता?

उ. सत्य.

प्र. विद्युत् प्रकाशवत चंचल काय आहे.

उ. तरुणस्त्रिया आणि दुष्ट लोकांची मैत्री.

प्र. कलियुगांत देखील जे आपल्या कुलास अनुरूप अशा आचरणापासून ढळत नाहीं ते कोण?

उ. सज्जन.

प्र. 'चिंतामणी' प्रमाणें दुर्मीळ काय आहे

उ. गोड्यापणानें दान करणें.

प्र. सूज्ञ जन नेहमी आणि निश्चयपूर्वक असें काय सांगतात.

उ. ज्ञान, दानत आणि द्रव्य हीं एकत्र दुर्मिळ असतात.

प्र. शोचनीय असें काय आहे.

उ. कंजूषपणा.

प्र. द्रव्यवानामध्यें स्पृहणीय असें काय आहे.

उ. औदार्य.

प्र. विद्वानास पूज्य कोण आहे.

उ. जो निरंतर स्वभावानें शांत असतो तो.

प्र. कुटुंबांत सूर्याप्रमाणें कोणाचा प्रभाव असतो.

उ. गुणसंपन्न असून जो नम्र आहे त्याचा.

अपूर्ण

सुधासिन्धु

सुख संचारक कंपनी मथुरा यांचीं तयार केलेलीं व सरकारांतून रजिष्टर झालेलीं औषधें, जीं वीस वर्षांपासून लोकांत अनुभविलीं आहेत.

सुधासिन्धु

हें कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादीवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किंमत प्रत्येक बाटलीस ८ आणे.

दद्रुगज केसरी

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ८४ आणे. १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलीं जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें.

मागविण्याचा पत्ता:—
पंडित क्षेत्रपाल शर्मा मालक,
नं. १५९ सुख संचारक कंपनी, मथुरा.

सिन्धु

अशी संधी पुन्हां येणार नाहीं.

सहा घड्याळें देणारांस

एक घड्याळ बक्षीस.

पोष्टखर्च माफ दर एकाची किंमत ३।.

जंटलमन् इमिटेशन रास्कोप सिस्टिम.

नांवचें खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट मिळेल. अशी अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. बाजा पी. नें मागवा.

मिळण्य. पत्ता:—खोजा वल्लीभाई इस्माल
मुंबई मुक्काम वर्धा. [मध्यप्रांत] WARDA.
नो. नं. ४

चिरकालचा खरा लाभ कोणता ?
पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो !
महाराज ! ह्या दोन्ही गोष्टी

वार्षिक वर्गणी ट. ख. स ह रु. १॥) कलाशिक्षण (नमुना अंकास ८=आ.

नांवाच्या विविध हुन्नर, शास्त्रीयज्ञान, व्यापार, शेतकी, व इतर शेंकडो विषयांची माहिती शिकविणाऱ्यास वर्गणीदार व्हा. मराठी भाषेंत हें असें एकच पुस्तक आहे. वर्गणी रु. १॥ खरी पण चालू मार्च अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल. कारागिरांस, विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य हवें शिवाय ग्राहकांस हिप्नॉटिझम [Hypnotism] ऊर्फ अमेरिकन वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रामोहन, आरोग्यहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु. २५ फीची तूर्त रु. ११ त शिकवूं. पैकीं १ रु. प्रथम सही बरोबर पाठवावा. बाकीची व्ही. पी. येईल.

ह्या शिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या. औषधी. मंत्रतंत्रक्रिया, जडीबुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं. सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो,

व्यवस्थापक— कलाशिक्षण, कार्यालय
ना. न. ५ बडोदें.

नोटीस

विहार आनन्दका सागर रंगीन तसबीरे सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.

असली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुशोके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पातिव्रता, व्यभिचारणी आदिकी 'पेहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार समय सहवास स्थान क्रया, शैय्यातिथ, कामस्थान सोलासगारें, वतीसोआमूशण, वस्त्रतअर्दिवमधान पुत्रश्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोकी चिकित्सा औषधे, पशुभाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण सुद्धां विद्या आदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु० १

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा
नो० नं० ७७ अलीगड सिटी.

विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार— खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदेशविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अल्लिबाग.

जाहिरात

वर्षफल—प्रत्येक महिन्याचे फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ८= जन्मकाल, जन्म अथवा चालूं नांव कळवावें.

पत्ता— भा० गो० पंडित,
रा- व पो० लोणखेड प. खानदेश.

जाहिरात.

टेक्स्ट बुक कमिटींत पसंत होऊन मे. डैरेक्टर सा. ब. मध्यपांत व ऱ्हाड यांनीं व्ह. आणि अ. व्ह. शाळांतील बक्षिस व लायबऱ्या साठीं मंजूर केलेलें प्रसिद्ध धनुर्धारी कृत;-

१ व्यापारी वाचनपाठ. किं० ।॥— त्याच प्रमाणें २ पिराजी पाटील किं०. ॥-। ३ उपाशी महाराष्ट्रास उद्योग किं०. ।= ४ धर्मावरील मार्मिक निबंध अक १ ते १४; १०० बुकांस ।=रु० (पूर्वी १॥: किं० होती) १००० अगर ज्यास्त एकदम घेतल्यास ।— व त्याहून ज्यास्त घेतल्यास वरील प्रमाणें देऊं. निदान १०० तरी घेतलीं पाहिजेत

नंबर १, २ व ३ यांच्या प्रती एकदम १० घेतल्यास अनुक्रमें ॥= व । व ज्यास्त घेतल्यास ॥— व ।. किंमतीस देऊं.

टपाल खर्च निराळा—व्ही. पी. नें मागविल्यास निदान एक त्रितीयांश तरी किं० अगाऊ आली पाहिजे

ल. वें. मांजरेकर आणि कंपनी

दिवस थोडे राहिले.

वळीव पाऊस तर चोंहोंकडे पडूं लागले आहेत. व झडीचे पाउस सुरू होण्यास फारच थोडे दिवस राहिले. जर पेरणीच्या वेळे पर्यंत तुमची जमीन नांगरून तयार व्हावयाला पाहिजे तर आम्ही तयार केलेल्या सुधारलेल्या लोखंडी नागरानें तुमची जमीन नांगरा म्हणजे थोड्या वेळांत व थोड्या खर्चांत तुमची दुप्पट जमीन नांगरून होईल. नांगर नंबर १०— चो किंमत फक्त आडतीस रुपये आहे.

किर्लोस्कर बंधु.
किर्लोस्करवाडी.
नो. नं २२२ पोष्ट कुंडल (सातारा.)

जाहिर नोटीस

खालीं सही करणार दत्तराम वल्लद संभाजी जात मराठे मौजे पिंपळगांव नजीक कान्हा परगणे व ता० पुसद जि० यवतमाळ जाहिर नोटीस देतो कीं बापूजी वल्लद रामजी मराठे मौजे पिंपळगांव नजीक कान्हा प्र० व ता० पुसद जि० यवतमाळ यांस रुपये ११६ वसूल देऊन त्याजपासून दस्तऐवज काढून आणिला आहे. सदरहू रुपये एप्रील सन १९११ इ० स दिले आहेत तरी तो दस्तऐवज तारीख २५।४।११ इसवीचे सुमारास गहाळ झाला आहे तरी ज्या कोणास सांपडल्यास त्यानें मजला आणून देण्याची कृपा करावी

ता० २६।५।११ इ०

द० विष्णू वामन रा० पुसद.
सही
निशाणी दत्तराम वल्लद संभाजी याची असे.
नो० न० २२३

नोटीस

नोटीस बेशमी— माधो रामचंद्र आपा नारायण साहू दुकान मौजे नांदेड तालुके व जि० उमरावती यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुह्मास सुमारें तीन वर्षें झालीं रुपये २२५ चा पुर्जा लिहून दिला त्यांत तुह्मांस रुपये १५० वसूल दिला तो जाता व्याजा सहित. रुपये २२०- चा नवीन रोखा तारीख १-५-१९११ रोजीं लिहून दिला. मागील पुर्जा रुपये २२५ चा मला परत देण्या विषयीं तुह्मी कबूल केलें त्याप्रमाणें मी मागील पुर्जा दोनतीन वेळा तुह्मांस परत मागीतला असतां दिला नाहीं. सबब या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येतें कीं तुह्मी आठ दिवसांत माझा मागील २२५ रुपयांचा पुर्जा वापस घ्यावा. तसें न केल्यास मी तुमचेवर दिवाणींत अगर फौजदारींत काम चालवून खर्चासह रुपये भरून घेईन ही नोटीस दिली सही तारीख ५-५-१९११ इ०

सही
सिवरामजी वल्लद निंबाजी द. खु.
नो० नं० २२४

आर्यवनोषधालय मुर्डी.

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन राजा अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं आमचीं औषधें बारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्याहून आमचीं औषधें, त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास दिलें आहे. हे अवश्य लक्ष ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखाद औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

मदनामृत संजिवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातु ती शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचें रोगरुपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षी पाहिजे वा दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य इतर धातुपात उन्हाळें इंद्रियाशिथिलता, कडकी. गर्मीसंबंधीं मुरलेले विकोप मुत्रसंकोच, धातुचा पातळपाणा, स्त्रियाची घुपणी, छातींतील रोग, सठ पाय श्रमांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडूरोग मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी. वातरोग, निद्रानाश पित्तावर. बाळंतरोग, मधुमेह जुनाट परमा, मुष्ठीमैथूननें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सत्तेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्ध वृद्धी, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचूं लागते त्यांत उपयुक्त वनस्पतीचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सार्टिफिकेटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल अनुपानखर्ची सोबत किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील.

दर:—एकदम ३९ गो० १ रु०, ७३ गो० २ रु० ११९ गो० ३ रु० १२९ गो० ४ रु० २७९ गो० ६ रु० ५९० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजन:—यानें वदस. साहर, फुल, खुपऱ्या. बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रण:—कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिसत नाहीं. बा० कि० १ १। मात्र बाटलीस रु० २

३ दंतबलवर्धक पूड:—दंत संबंधी सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विष:—औषध लावतांच उतरतें मुल्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्ण:—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वर:—औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुन: उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषध:—आजपर्यंत आमचे औषधानें हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रहीं तापावर गोळ्या, गाठीस मलम, वात चढू नये म्हणून वातावर मात्रा ठेवून याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक कि० २ आणे स्व० शि०

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं, औषधांत अपाय कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सार्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म वाफ, गुटीका, आसवे, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्ची सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं मजकुरीं मात्र कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहिराती सुरूं असून प्रत्येक जाहिरात सुशोभित करून जो तो पुढें येऊं पाहात आहे.

आपला समाज निरुद्योगी आळशी बनल्यामुळें एकदा जो धंदा सुरूं केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नक्कल करून वाटेल त्यानें करावी आमचे जाहितीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिले वगैरे गावांतून तो पुणेवस्तींत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याची तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस मुचविणें हच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १९।२० वर्षें अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कोट्यावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजानिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्यबंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरावी, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावी म्हणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

नो. नं. २४

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

Oriental Government security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Berar manager,

HEAD OFFICE—BOMBAY

HEAD —QUARTERS— NAGPUR.

FUNDS Exceed $3\frac{3}{4}$ crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowmenp policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man up his mind to assure his life the better. Once satisfied of the propr the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application—

M. DESOUZA,

CHIEF AGENT, Nagpur.

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

हें पत्र अकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

बेरार समाचार.

Berar Samachar.

Regd. No. N 4

वर्ष ४५] आकोला—सोमवार तारीख १९ माहे जून सन १९११ इ० [अंक २४

वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस.....१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ..... २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमाच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

ब्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये याप्रमाणें दिलें जाईल. ब्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस ब्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट

नं १

मुंबइ बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या **आकोले** व **उमरावती** येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ ½ तोळे असतें. साधारण भाव वर्‍हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. PHILLIPS. एजंट.

नो० न० २

दिवस थोडे राहिले.

वळीव पाऊस तर चोहोंकडे पडूं लागले आहेत. व झडीचे पाऊस सुरू होण्यास फारच थोडे दिवस राहिले. जर पेरणीच्या वेळे पर्यंत तुमची जमीन नांगरून तयार व्हावयाला पाहिजे तर आम्ही तयार केलेल्या सुधारलेल्या **लोखंडी नांगरानें** तुमची जमीन नांगरा म्हणजे थोड्या वेळांत व थोड्या खर्चांत तुमची चुण्पट जमीन नांगरून होईल. नांगर नंबर १०— ची किंमत फक्त आडतीस रुपये आहे.

किर्लोस्कर बंधु.
किर्लोस्करवाडी.
नो. नं २२२ पोष्ट कुंडल (सातारा)

श्री राधावल्लभाजयाति
वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान, तरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु से लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल वी० प० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे हांथ जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते हैं, अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ८॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगा लीजीये.

मिलने का पताः—

गोस्वामी राधामोहन शर्म्मा
चित्तीखाना आगरा.

NOTICe

Notice is here—by given that the Municipal Committee of Malkapur in the Buldana District on reconsideration of the draft rules previously made propose to make the following rules for the imposition of a tax under section 41 (1) (a) (b) of the Berar municipal Law on persons who practise the trade of ginning cotton or pressing the same into bales by means of steam or mechanical process at the following rules:-

(1) For each Boja of ten maunds ginned.....8 pies.
(2) For each bale of fourteen maunds pressed .....10 pies.

The tax shall be payable in one instalment on the 1 st. August each year.

The proposed rules shall be taken into consideration on the expiry of one month from the date of first publication of this notice and any objections or suggestions in respect thereof must be forwarded to the Secretary to the Committee before the expiry of the said period.

Khaja Kutubudin
D.: 14-6-11 Vice chairman
N. N. 242 Malkapur Municipality.

नोटीस

विद्यमान सबजज साहेब बहादूर आकोला. यांचें कोर्ट.

सक्सेशन सर्टिफिकेट नंबर १३ सन १९११
सक्सेशन सर्टिफिकेट मिळविण्याचा अर्ज.

गीताबाई जवजे बाळकृष्ण ब्राह्मण कुळकर्णी राहणार नेरीदिगर ता० जामनेर जिल्हा खानदेश:— अर्जदार.

सर्वत्र लोकांत कळविण्यांत येतें कीं, अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल दिलेला अर्ज आमचे कोर्टीत ता० १७-७-११ रोजीं नेमिला आहे. त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टीत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकिली जाणार नाहीं कळावें. ता० १६-६-१९११

सही
Jankiprasad Harda.
नो० नं० २४३ सबजज आकोला

नोटीस

विद्यमान सबजज साहेब बहादुर आकोला यांचें कोर्ट.

सक्सेशन सर्टिफिकेट नंबर १२ सन १९११
सक्सेशन सर्टिफिकेट मिळविण्याबद्दल अर्ज.

राघव श्रीकृष्ण बांडी जात ब्राह्मण रा० आकोला:— अर्जदार.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल दिलेला अर्ज आमचे कोर्टीत ता० १७-७-११ रोजीं नेमिला आहे. या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टीत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकिली जाणार नाहीं कळावें. ता० १३-६-११

सही
Jankiprasad Harda.
नो० नं० २४४ सबजज आकोला.

नोटीस

गणु व॥ नारायण कुणबी रा० खंडाळे ता० बाळापूर यासः—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं तुमची ता० २७।४-।१९११ इसवी रोजची नोटीस ता० २९।९।११ इसवी रोजीं पोचली. ह्या नोटिशींतील मजकूर खोटा आहे. तुमच्याकडे १ खंडी १४ मण कापूस राहिला असून त्याची मागणी मी आपणाकडे वेळोवेळीं केली पण आपण त्याच्याकडे लक्ष दिलें नाहीं. त्यावेळेस कापसास भाव चांगला असल्या कारणानें तुम्ही आम्हास कापूस न देतां आमच्या परवानगी शिवाय कापूस विकला व आतां राहिलेला १० मण कापूस आम्हास घेऊन जाण्या विषयीं तुम्ही नोटीस देतां व बाकीच्या १ खंडी ४ मणा बद्दल तुम्ही दस्तऐवज लिहून देतो असें म्हणतां. परंतु तुम्ही आपल्या जवळ कापूस असतांना लोकांस विकला व आमच्या मागणी कडे लक्ष दिलें नाहीं. सबब तुमचें म्हणणें आम आम्हास कबुल नाहीं. वेळेवर कापूस दिल्या कारणानें आमचे बरेंच नुकसा झालें आहे. त्याबद्दल तुम्ही जबाबदा आहात. आतां ही नोटीस पोचल्या पासू आठ दिवसांत आमचा राहिलेला स म्हणजे १ खंडी १४ मण कापसाच्या किंमत आम्ही मागितली. त्यावेळची म्हण १८० रु० खंडी या दरानें होणारी रक्कम व त्याचें व्याज आम्हास आणून देऊन आमची पावती घेऊन जावी. त न केल्यास त्याबद्दल तुम्ही जबाबदार आहात. ही नोटीस विनाकारण द्यावी लागली. सबब हिचाही खर्च व कोर्ट-खर्च वगैरे सर्व तुम्हास द्यावा लागेल. कळावें ता० ९।६।११.

सही
मारवाडींत.
रूपचंद पन्नालाल तर्फे
इनामदार वकील आकोला.
नो० नं० २३८.

नोटीस.

रा. रा. हुसेनखा व॥ लालखा रा० नवा जालना, हैदराबाद, यासः—

नोटीस देणार खतीजाबी मर्द हुसेनखा रा. पिंपळगांवराजा ता. मलकापूर नोटीस देतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून मला तुमचे पासून एक मुलगी झाली आहे. तुमच्याशीं लग्न लावते वेळीं करार झाला कीं मी तुमपाशीं पिंपळगांवराजा येथें राहून संसार करीन. त्या प्रमाणें अजमासें ४।५ महिने तुम्ही राहिला. पुढें एके दिवशीं तुम्ही एकदम जालन्यास निघून गेला. ते आज पावेतों पुन्हां वापस आले नाहींत. तुम्हांस या बाबतींत पोष्टांतून नोटीस धाडली होती परंतु तुम्ही कांहीं पिंपळगांवराजास येत नाहीं. यामुळें आतां तुमचा करारनामा अमलांत आणणें मला भाग झालें आहे. तरी हा नोटीस प्रसिद्ध झाल्यावर ८ दिवसांत येऊन माझ्याशीं संसार करावा. नाहीं तर मला आज दोन वर्षें अजमासें टाकून घातलें त्याबद्दल अलबत्ताबद्दल कर्ज रु. ९६ झालें तें पाठवून माझी पावती घ्यावी. असें वरील मुदतींत न केल्यास हीच फारकत समजून दुसरा घरठाव करीन. मग माझ्यावर किंवा माझ्या दुसऱ्या नवऱ्यावर तुमचा कोणत्याही प्रकारें हक्क वगैरे राहणार नाहीं कळाव. ता. १२।६।१९११

सही
खतीजाबी मर्द हुसेनखा नि. बांगडी
दस्तुर शेख बुढन व॥ महंमद अनवर
रा. पिंपळगांवराजा आज मुक्काम
आकोला नि. आंगठा
नो. नं. २३९

मागील अंकावरून पुढें चालं

जगद्गुरु श्रीशंकराचार्य याची प्रश्नोत्तरमाला.

प्र. जग कोणाचें स्वाधीन राहतें.
उ. जो कर्तव्यतत्पर असून ज्याचे शब्द बोधप्रद व सौम्य आहेत.
प्र. विद्वान मनुष्यास समाधान कोणच्या गोष्टीनें होतें व मोह कोणच्या गोष्टीचा पडतो.
उ. ज्ञान आणि कविता.
प्र. दुःखाची उर्मी ज्यास होत नाहीं असा कोण.
उ जो वडिलांचे आज्ञेनें चालतो व ज्यानें इंद्रियनिग्रह केला आहे.
प्र. लक्ष्मी कोणास प्रसन्न होते.
उ. उद्योगी आणि प्रामाणिक मनुष्यास.
प्र. ती कोणास एकदम सोडून देते.
ऊ. जो आलसी असून देव, द्विज आणि गुरूची निंदा करतो.
प्र. निरंतर वास कोठें असावा.
उ. सज्जनाचे सहवासांत अथवा काशी क्षेत्रें.
प्र. कोणत्या देशाचा त्याग करावा.
उ. ज्या देशांत मिथ्या दोषारोप करणारे असून नथळ राजकर्ते लोभी आहेत.
प्र. कोणत्या स्थितींत मनुष्य दुःखापासून दूर राहूं शकतो.
उ. आज्ञाधारक भार्या आणि तैलबुद्धि पुत्र
प्र. कींव करण्यालायक या जगांत कोण आहे.
उ. संपत्ति असून जो धर्म करीत नाहीं.
प्र. हलकेपणा कशांत आहे.
उ. हलके मनुष्यापाशीं याचना करणें.
प्र. श्री रामचंद्रापेक्षां शूर कोण?
उ. ज्याचेवर मदनबाणाचा परिणाम होत नाहीं.
प्र. श्वान कोणास ह्मणावें.
उ. हीन मनुष्यांची सेवा करणारा
प्र. माया कोणास वश आहे
उ. ईश्वरास
प्र. मोह कोणचा
उ. हें जगत.
प्र. स्वप्नवत काय आहे
उ. जागृती
प्र. सत्य काय
उ. ब्रह्म
प्र. मिथ्या काय
उ. ज्याच्या ज्ञानानें नाश होतो
प्र. असत्य काय
उ. शशविषाण
प्र. पुरुषार्थसिद्धि कशानें होते?
उ. परमेश्वराचें अनन्य चिंतन केल्यानें.
प्र. सदसद्विवेक शक्ती कोणामध्यें दिसून येते
प्र. भूदेव ब्राह्मण
प्र. ही शक्ति कोणच्या उपायानें प्राप्त झाली आहे.
उ. गुरु जनांचीसेवा
प्र. वृद्ध कोण
उ. जे धर्मरहस्य जाणतात
प्र. सन्माननीय पुरुषास मृत्यू पेक्षां दुःखदायक काय आहे.
उ. अपमान
प्र. या जगांत सुखी कोण आहे
उ. धनवान पुरुष
प्र. 'धन' ह्मणजे काय
उ. ज्या पासून इच्छित वस्तु प्राप्त करून घेता येते
प्र. सर्व सौख्याचें बीज कोणचें
उ. सद्गुण.
प्र. दुःखाचा उगम कोठून होतो.
उ. दुर्गुणा पासून.
प्र. दैवी शक्ति कोणास प्राप्त होतात.
उ. जो भक्तिपुरःसर परमेश्वराची पूजा करतो त्यास.
प्र. संपन्न आणि सुखी कोण होतो.
उ. जो शांत आणि नम्र आहे
प्र. गर्व परिहार कोणाचा होतो.
उ जो गर्विष्ट आहे.
प्र. अविश्वासू कोण?
उ. जो वारंवार असत्य भाषण करितो.
प्र. कोणत्या प्रसंगीं असत्य हें पातक समजलें जात नाहीं.
उ. धर्मसंरक्षणार्थ गुरु परंपरागत गुह्य ज्ञानाबद्दल हें वाक्य आहे.
प्र. धर्म कोणचा
उ. स्ववर्णाचें सूज्ञानीं आचरण
प्र. सद्गुणी पुरुषाची शक्ती कशांत दृग्गोचर होते
उ. सदाचरणांत
प्र. सद्गुणी कोण (साधु)
उ. ज्याची समाधान वृत्ति आहे
प्र. 'दैव' कशास ह्मणावें
उ. उत्तम कर्म
प्र. उत्तमाचरण कोणाचें आहे असें समजावें
उ. ज्याची प्रशंसा सद्गुणी लोक करितात
प्र. गृहस्थाश्रमांतील खरा मित्र कोण
उ. भोया गृहिणी
प्र. गृहस्थ (कोण?)
उ. यज्ञकर्ता स्वार्थत्याग करणारा.
प्र. यज्ञ कशास ह्मणावें.
उ. वेदानें आज्ञापित क्रिया व जेणेंकरून भूतमात्राचें कल्याण होईल ती क्रिया.
प्र. कोणाची क्रिया सुफलदायी असते.
उ जे सद्गुणी आणि विद्वान आहेत.
प्र. विद्वान कोणास ह्मणावें.
उ. जे वेदास आधार समजतात.
प्र. पूर्ण नाश कोणाचा झाला.
उ. जो शास्त्र प्रस्थापित आचरणानें चालत नाहीं.
प्र. सुखी कोण?
उ. ज्यानें सर्व संगपरित्याग केला आहे.
प्र. सन्मानीय कोण.
उ. विद्वान.
प्र. गायत्री, सूर्य, अग्नि आणि शिव यांज मध्यें काय राहतें
उ. सत्य.
प्र. प्रत्यक्ष 'ईश्वर' कोणचा आहे
उ. माता.
प्र. पूजनीय असा गुरु कोणचा
उ. पिता
प्र. सर्व देवता पेक्षां श्रेष्ठ कोण
उ. ब्रह्मवेत्ता असून स्वकर्तव्यारूढ असा ब्राह्मण
प्र. ज्ञातीचे नाशास कारण कोण
उ. संतास जो दुःख देतो तो.
प्र. कोणाचे शब्द विफल होत नाहींत
उ. सत्यवादी, निश्चयी आणि शांत पुरुषाचे
प्र. जन्म कशास म्हणावें?
उ. विषयानुरक्तता
प्र. पुढिल जन्म कोणचा
उ. पुत्रोत्पत्ति
प्र. कोणची गोष्ट टाळणें कठीण आहे
उ. मृत्यु
प्र. अपण आपला पाय कोठें ठेवावा
उ. शुद्ध भूमिवर
प्र. अन्नदानास योग्य कोण
उ. क्षुधित
प्र. पूजनीय कोण
उ. ईश्वरावतार
प्र. परमेश्वर कोण
उ. महेश – ज्याचे ठिकाणीं शंकर, ब्रम्हा आणि विष्णू यांचें वास्तव्य आहे
प्र. ईश्वर सेवेचें फल काय
उ. ईश्वराशीं सारूप्यता आणि स्वस्वरूपप्राप्ति
प्र. अवर्णनीय काय
उ. माया
प्र. सर्व कल्पनासृष्टीचा उगम काय?
उ. द्वंद्व
प्र. त्रिकालाबाधित असें सत्य काय
उ. अद्वैत
प्र. अज्ञान कोठून उत्पन्न होतें?
उ. तें अनादी आहे
प्र. शरीरपोषण कशानें होतें?
उ. प्रारब्धानें
प्र. अन्न कशा पासून मिळतें
उ. प्राणशक्ति
प्र. ब्राम्हणास पूज्य काय आहे
उ. गायत्री, सूर्य, आणि अग्नींत याचा बाप आहे असा शिव
प्र. मोक्ष म्हणजे काय?
उ. अज्ञानाचा लय.

अपूर्ण

ब्राह्मणांची कर्तव्यदिशा.

—०—

पहिल्या पासून ब्राह्मणांची पदवी या भरतखंडांत फारच उच्च मानली गेली आहे. पुरुषसुक्तामध्यें वर्णिलेल्या विश्वस्वरूप पुरुषोत्तमाचे मुखाचे ठिकाणीं ब्राह्मणाची योजना केलेली आहे. या वरूनच समाजामध्यें ज्ञानोपदेश करणें ही जबाबदारी ब्राह्मणावर पूर्वापार बसविली गेली आहे हें स्पष्ट होतें. पण या वेद—कालानंतर जेव्हां चारी वर्ण जास्त रेखिले जाऊन त्यांच्या चार जाती बनल्या, त्या जातींचीं कर्मे रुढीनें ठरलीं गेलीं त्या वेळीं समाजा संबंधी ब्राह्मणांचें पुष्कळसें अग्रेसरत्व क्षत्रियाकडेस गेलें. व भूपतींचें मंत्रिपद मात्र ब्राह्मणांकडेस राहिलें. या पुढें समाजांत ब्राह्मणांना हातानें कामें करण्याची जरूरी हळूं हळूं नाहींशी होऊं लागली. खालच्या जातीं मध्यें नाना तऱ्हेचे कारागीर व मजूर तयार झाले व धनाशा व संसाराची आशा सोडून देऊन वेदाभ्यास जड अशा आयुःक्रमांत काळ घालविण्यांचें ब्राह्मणांच्या नशीबीं आलें. जगाच्या इतिहासांत ही दृष्टोत्पत्तीत येतें कीं, प्रथमतः पुरोहितवर्गाची योग्यता फार मोठी होती; व तीच हलके हलके कमी कमी होत गेली. ब्राह्मणां संबंधी देखील, हाच अनुभव इतिहासांत दिसून पडतो. क्षत्रियामध्यें ज्ञानाचा प्रसार सुरूं होऊन जनका सारखे तत्त्वज्ञानी त्यांमध्यें निर्माण झाले. व ज्ञानमार्गाचें अवलंबन करून ज्याला त्याला समाजामध्यें श्रेष्ठता संपादन करणें सुखकर झालें.

संस्कारानें मात्र अजून ब्राह्मण हे इतरा पासून उच्च मानिले जात. पण सर्व ज्ञान ब्राह्मणामध्यें राहिलें नाहीं. शास्त्रोक्त संसार व रूढी या मध्यें भेद दिवसेंदिवस इतका स्पष्ट होऊं लागला कीं, खरें कोणते हा प्रश्न जेव्हां विवेकी लोकांपुढें उभा राहूं लागला व अश्रद्धेचा रिघाव जनसमाजांत होऊं लागला. इकडे दिवसेंदिवस ब्राह्मण हे कर्महीन होऊ लागले. भिन्न देश, भिन्न भाषा, व भिन्न रूढी यांही करून ब्राह्मणांची एक स्वरूपता हळूं हळूं नष्ट होऊन निरनिराळ्या ब्राह्मणांमध्यें, इतर जाती प्रमाणें, जाती पडूं लागल्या. या निरनिराळ्या ब्राह्मण जातींमधील आचार, विचार, आहार यांमध्यें फार फरक पडून ब्राह्मणांचें तेज लोप पावूं लागलें व ब्राह्मणांची पदवी व महत्वाकांक्षा ही कमी होत गेली. परचक्रें दुष्काळ प्रवासाभाव व अश्रद्धा या निरानिराळ्या कारणामुळें ब्राह्मण मागासले व वेदघोकण्या पालिकडे त्यांच्यामध्यें कांहीं जास्त सामर्थ्य नाहीं असें बहुजन समाजास वाटूं लागलें त्यांत 'कोण ज्ञता राज्य स्वीकार करिल' या व अशा वचनांच्या इंगिताचा विपर्यास करून उद्योगाची किंमत व समाजनियंत्रण करण्याची हाव ब्राह्मणांनीं कमी करून टाकिली. १७ व्या व १८ व्या शतकांत ब्राह्मणांनीं थोडेसें डोकें वर काढिलें होतें. पण सामाजिक भरभराटीकडे लक्ष देण्यास त्यास फावलें नाहीं व अगोदरच नष्ट दशेस आलेल्या ब्राह्मणसमाजाचे धुरीणत्वा खालीं असलेला महाराष्ट्रदेश थोडक्याच कालांत परशासना खालीं गेला. या कालाचे सुमारास हिंदी लोकांवरील पौर्वात्य शिक्षणाचें वर्चस्व नष्ट होऊन पाश्चात्य शिक्षणाचा रिघाव हिंदुस्थानांत व्हावयास लागला. पेंढारी व ठग यांचा बंदोबस्त झाला. रेल्वे, टेलिग्राफ यांच्या योगानें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागास एकत्व आलें, इंग्रजी भाषेमुळें विद्वान लोकांची विचार करण्याची कोर्ट दरबाराची भाषा एक होऊन त्यांच्या मध्यें सहानुभूति वाढत गेली. शिक्षण सर्वांस मिळूं लागलें व अशा तऱ्हेच्या मिश्र समाजांत वर्चस्व संपादन करण्यास अनेक गुणांची जरूरी भासूं लागली. उद्योगधंद्यांची महतीही या नवीन शांततेच्या कालांत जास्त भासूं लागली या नवीन मनूंत प्रत्येक जातीच्या स्त्री---पुरुषाचे परिश्रमाची व बुद्धिची किंमत भासूं लागून सार्वत्रिक सुख सद्गुणाच्या मार्गानें संपादन केलेल्या भौतिक संपत्तीनें लाधते अशी सर्वांचीच कल्पना होत चालली आहे. या भौतिक संपत्तीच्या बळानें मनुष्य उत्तम गतीप्रत पावतो कीं काय हा प्रश्न निराळा पण उपयोग—प्रिय समाजांत नानाविद्यासंपन्न पुरुषाची योग्यता जास्त मानिली जाते ही गोष्ट मात्र आज निर्विवाद आहे. हल्लीं ब्राह्मणामध्ये खरोखर औद्योगिक गुण फार थोडे आहेत. शाळामास्तर, कारकून, डॉक्टर, वकील, ओव्हरसीअर किंवा इतर लहान मोठ्या सरकारी नोकऱ्या या शिवाय ब्राह्मण कोणतीही कामें करतांना दिसून येत नाहींत. खरोखरीचें विद्यार्जन, कडकडीत ब्रह्मचर्य या संबंधी चहा ब्राह्मणांत

नाहीं. पूर्वापार चालत आलेले समाज-श्रेष्ठत्व राखण्यासाठीं अवश्यक तीं सुधारणा करण्याकडे ब्राह्मणांची मनापासून प्रवृत्ति नाहीं. धर्माच्या नांवाखालीं कित्येक देवस्थानांच्या व अन्नछत्रांच्या उतन्नाचा विनाकारण फन्ना उडत आहे. नवीन तत्त्वें व विचार यांच्या मदतीनें आपल्या सनातन धर्ममतांचें विवरण करण्याची खटपट ब्राह्मणांत करित नाहींत. शिवाय ब्राह्मणामध्यें अक्षरशत्रु असे ग्रामजोशी व भटजी किति तरी सांपडतील! धर्मग्लानीचा निरास करून टाकून खरी धर्म-जागृति करण्याकडे कित्येकांची प्रवृत्ति आहे! व्यक्तिस्वातंत्र्याचे हे दिवस आहेत हें ध्यानांत ठेऊन स्त्री जातीच्या उन्नतीसाठीं किती लोक कळकळ दाखवित आहेत. निराश्रित व खालावलेल्या जातींचा उद्धार व्हावा एतदर्थ त्यास शिक्षण देण्या करितां व धंदे लाऊन देण्याकरितां वगैरे कोण झटत आहे? अशा चळवळींत ब्राम्हणांनीं पुढाकार घेतला आहे काय? केवळ ज्ञानार्जनासाठीं शिकण्याची आस्था कोण दाखवित आहे? बालविवाहाची चाल मोडून स्तुत्यरीतीनें विधवाविवाह प्रचारांत आणण्यासाठीं कोण इच्छा धरित आहे? आज विश्वविद्यालयांतून शिक्षण मिळून पास झालेल्या ब्राह्मणां पैकीं कितीक ब्राम्हणांनीं स्वभोंवतील ग्रंथभांडारामध्यें भर घातली आहे? कारखाने काढणें, सहकारीतत्त्वावर पेढ्या चालावणें, यांत किती ब्राम्हण स्वतःची पदरमोड करून मन घालीत आहेत? खरोखर अनाथालयें किंवा धर्मपर व्याख्यानमंदिरें यांची किती जरूरी आहे व अशा कार्यांत ब्राम्हणांचा फार पुढाकार नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे! गरीब ब्राम्हणांच्या होतकरू मुलामुलींच्या शिक्षणादि हितांसाठीं किती फंड उभारले गेले आहेत? लग्नांत मुलामुलींच्या मातापित्यास होणारा त्रास हलका होण्यासाठीं कोणी सामाजिक दृष्ट्या चळवळी केल्या आहेत? हिंदी लोकांच्य एकराष्ट्रियत्वाच्या कल्पनांचा परिपोष होण्यासारख्या चळवळी नेटानें अनेक अडचणी सोसूनही अजे किती ब्राम्हण करित आहेत? या सर्व गोष्टींचा विचार केला असतां असें दिसतें कीं ब्राम्हणांची रहाणी, दिनचर्या व ध्येय यांत फार फरक पडला पाहिजे. त्यांच्यापाशीं बुद्धिधन आहे. व त्यांनीं व्यक्तिशः विचार करण्याचें सोडून दिलें पाहिजे. व दैवावर हवाला न ठेविता त्यांनीं आपलें नशीब काढिलें पाहिजे. स्वतःच्या हिमतीवर विद्यालयें काढिलीं पाहिजेत; अनेक धर्ममतामध्यें मेळ पाडून लोकांमध्यें धर्मबुद्धि जागृत राहील अशा चळवळी सुरू केल्या पाहिजेत देवळें, मठ, अन्नछत्रें या मध्यें असणारे मोठे मोठे फंड यांचा उपयोग शिक्षण व अनाथपरिपोषण या कडे केला पाहिजे. निदान आपल्या जातीच्या माणसांस (मग तीं माणसें पुरुष असोत किंवा स्त्रिया असोत त्यांना) लिहिणेंवाचणें शिकवून विद्याभिरुचि लाऊन दिली पाहिजे. दानधर्म नवीन तत्त्वानुसार केला पाहिजे. निरुद्योगी लोकांना पुष्ट करण्याकडे उपयोग केला जाणारा पैसा पंगू लोकांच्या मदती करितां खर्च करण्याचा प्रघात त्यांनीं पाडला पाहिजे. ज्या प्रमाणें ब्रह्मचारी पुरुषांची समाजास जरूर आहे, त्याप्रमाणें विद्या किंवा उद्योग यांचा उत्कर्ष होण्याकरितां कांहीं स्त्रिया समाजांत आमरण अविवाहित राहिल्या पाहिजेत या तत्त्वांची जाणीव ब्राह्मणांनीं बाळगिली पाहिजे. व अशा तऱ्हेनें बुद्धिमान व हिंमती स्त्रिया राहू इच्छितील तर त्यांची जीवनयात्रा सुखावह होईल अशा तऱ्हेचें सामाजिक वळण व राहणी हीं त्यांनीं प्रचारांत आणलीं पाहिजेत. स्त्रियांच्या बुद्धीपासून किंवा सामर्थ्यापासून समाजाला साहजिक होणारे उपयोग घडून यावेत म्हणून स्त्रीशिक्षणसंस्था काढिल्या पाहिजेत व स्त्रीजातीविषयीं मोठा अभिमान बाळगीला पाहिजे. आपणामध्यें गरीब पण बुद्धिमान अशा मुलांच्या शिक्षणाची सोय लागली व त्यांच्या उत्कर्षानें समाजाचें हित व्हावें अशी तजवीज त्यांनीं घडवून आणिली पाहिजे. ब्राह्मणाब्राह्मणांमध्यें देशरूढी मुळें असणारे भेद लोपवून त्यांच्या आचारविचारांत एकत्वरूपता आणण्याची ब्राह्मणधुरीणांनीं जारीनें खटपट सुरू केली पाहिजे. हल्लींचें राजकीय वातावरण लक्षांत घेऊन एकंदर ब्राह्मण जातीचा होणारा ऱ्हास बंद होण्याकरितां जेणें करून त्यांचें तेज व संघशक्ति हीं वाढेल तेंगें करून चौत्र वाढविलीं पाहिजेत ठिकठिकाणीं ब्राह्मणमंडळी स्थापून आपसांतले घरगुती सोयऱ्यासंबंधी तंटे किंवा अडचणी सदर्हू मंडळी मार्फत दूर केल पाहिजेत. ब्राह्मणांची विद्या व ब्राह्मणांचें बीज यांची शुद्धता अबाधित राहण्याकरितां अती काळजी घेतली पाहिजे. वर दर्शविल्या प्रमाणें ब्राह्मण मंडळ्यांचीं संमेलनें अनेकदां घडवून आणिलीं पाहिजेत म्हणजे प्रत्येक बाबतींत सर्वसाधारण ब्राह्मणांची एकमेकाविषयीं सहानुभूति व अभिमान ही वाढून जाऊन ज्ञानाचा विकास होत जाइल व सुधारणा सुखाची व सुसाध्य होईल. या रीतीनें एकवटलेल्या ब्राह्मण जातीचें महत्त्व किती वाढेल याची कल्पना करितां येणें फार कठिण आहे. हल्लींचा जीवनकलह फार भयंकर आहे. एकमेकाशीं मोठ्या युक्तीनें व कावेबाजपणानें निरनिराळीं राष्ट्रें वागत आहेत. व आपलें संरक्षण आपल्या मनगटाच्या जोरावर करित आहेत. ब्राह्मणसमाजाचें जीवनयात्रा देखील मोठ्या संकटाची झाली आहे. त्यांची अगोदरच निरनिराळ्या तऱ्हेनें अधोगती झाली आहे व त्यांत राजकीय दृष्ट्या त्यांच्या संबंधी तिरस्कारोत्पादक विचारलहरी इतर जातींमध्यें सुरूं झाल्या आहेत. अशा समयीं आपल्या मनाचा उदात्तपणा कायम राखून आपली श्रेष्ठ पदवी चिरतर करण्या करितां त्यांनीं करावी तितकी खटपट थोडी आहे.

हिंदुस्थानांत ज्या अनेक मोठ्या सुधारणा घडणें इष्ट आहे असें वाटूं लागलें आहे त्या पैकीं ब्राम्हणजातीची सुधारणा ही एक मोठी चळवळ आहे. व या चळवळी मध्यें पुढाकार घेण्याचें भाग्य ज्या महात्म्याचे पदरीं असेल तो धन्य. ज्या ब्राम्हणांच्या मुखांमधून वेद अग्नी वेदरागी प्रथमतः निघाली, ज्यांना ब्रम्ह म्हणजे काय याचा साक्षात्कार झाला जे विद्येचें माहेरघर व जे आनादि वैदिक धर्माचे आधारस्तंभ ज्यांचें मंत्रसामर्थ्य व तपोबल हें अप्रतिम मानलें गेलें आहे, व ज्यांनीं विद्येच्या रूपानें व धर्मोद्धाराच्या रूपानें जगतावर अनंत उपकार करून ठेविले आहेत, ज्यांच्या जातीच्या इतकी वयानें जुनी बुद्धीनें श्रेष्ठ अशी जात पृथ्वीवर दुसरी नाहीं, ज्या मध्यें मोठे मोठे ऋषी, साधु, कवी, वीर व अवतारी पुरुष होऊन गेले, ज्यांच्या सत्गुणांची बरोबरी आजपर्यंत दुसऱ्या कोणत्याही जातीनें केलेली नाहीं, ज्यांनीं धर्म व विद्या व स्वाभिमान यांच्या पताका धरून उत्तरमहासागरांकित प्रदेशापासून वसंधरा थेट सिंहलद्वीपापर्यंत निरानिराळ्या युगांत वसविली ज्यांचे ग्रंथ किंवा ज्यांच्या कारागिरीचे बद्दीचीं कामें पाहून आधुनिक विद्वानही तोंडांत बोट घालतात, व ज्यांच्या अंतर्गत तेजानें व जोमानें ज्यांचें हल्लीं स्वाभाविक संरक्षण होत आहे अशा ब्राम्हणांची ज्ञाति या भूतलावर शुद्ध रूपानें अस्तित्वांत राहिली तर एकंदर मानव जातींच्या इतिहासास भूषण होणार आहे. सर्व प्राचीन वस्तूंचा उद्धार करण्याचें आधुनिक मुज्ञांच्या मनांत येत आहे. पण त्या वस्तू निर्जीव आहेत. ब्राम्हण जाती सारख्या सजीव श्रेष्ठ वस्तूंचें संरक्षण करण्याकडेस तर प्रत्येक विद्वानाचें चित्त वेधलें पाहिजे. पण इतर जातींच्या लोकांकडून हें समाजरक्षणाचें कार्य आस्थेनें होईल तर उत्तमच पण खुद्द ब्राम्हण वीरांनीं आतां पुढें सरसावले पाहिजे, व आपलें सहानुभूतीरूप चैतन्य चोहोंकडे पसरवून सर्व समाजाचें आयुष्य वृद्धिंगत केलें पाहिजे, स्वतःच्या बलानें व बुद्धीनें हें कार्य त्यांनीं साधिलें पाहिजे. सत्कार्याचा पाठीराखा सखा भगवंत हा त्यांचे मागें उभा आहेच.

वऱ्हाडसमाचार

जेष्ठ वद्य ७ शके १८३३ दुर्मतीनाम संवत०

आमच्या प्रांताची औद्योगिक पाहणी.

लेखांक ४.

किरकोळ उद्योग धंदे.

आतांपर्यंत विणकरी, कुंभार, व चांभार या तिघांच्या धंद्याला ऊर्जितावस्था प्राप्त होण्यासाठीं काय करावयास पाहिजे आहे या गोष्टींचा विचार झाला. आजच्या लेखांत तेली, धनगर, रंगारी, तांबट, बुरुड, लोहार, सुतार वगैरे लोकांच्या उद्योगधंद्यासंबंधानें चार शब्द लिहून ही लेखमाला समाप्त करण्याचें योजिलें आहे. प्रथम तेल्याचा धंदा घेऊं. गेल्या दहा वर्षांत हा धंदा बराच खालावला आहे हें सरकारी रिपोर्टीत कबूल केलें आहे आणि त्याचीं कारणें शोधूं जातां असें दिसतें कीं केरोसीन तेलाचा प्रसार, व तेलाच्या गिरण्या यांच्यापुढें आमच्या तेलाच्या धंद्याचा टिकाव लागत नाहीं. केरोसीन तेलाच्या स्वस्तपणामुळें त्याचा खप इकडे वाढत जाणारच. तो प्रतिस्पर्धी नाहींसा करणें हें सरकारच्या व लोकांच्या दोघांच्याही हातांत नाहीं. तेलाच्या घाण्यांचा गिरण्यापुढें टिकाव लागणें ही शक्य नाहीं. आमच्या तेल्यांनीं जीवनार्थ कलहांत मागें पडूं नये म्हणून आतां संघशक्तीचा उपयोग करून घेणें अवश्य आहे. परस्परसाह्यकारी मंडळ्या स्थापून त्यांच्या पासून मिळालेल्या कर्जाऊ रकमेनें तेल्याच्या मंडळीनें गिरण्या चालविण्यास शिकलें पाहिज, आणि या कामीं शेतकी खात्यानें तेल्यांना मदत करावी असें रिपोर्टीत सुचविण्यांत आलें आहे.

धनगराच्या धंद्याला—म्हणजे घोंगड्या, घाबळ्या वगैरे विणण्याला—ही उतरती कळा लागली आहे. याचें कारण यंत्रावर निघणा। लोंकरीचा माल पातळ व सफाईदार असून लोंकर कमी लागल्यामुळें स्वस्त ही देतां येतो. आमच्या धनगरांनीं नव्या सुधारलेल्या हातमागावर पातळ पण भपकेदार रंगाचा माल काढला, व हातानें पायमोजे, गंजीफ्राक वगैरे लोकरी काम काढण्याचीं यंत्रें निघालीं आहेत त्यांचा उपयोग केला तरच त्यांचा स्पर्धेंत टिकाव लागेल. लोंकरीच्या मेंढ्यांची निपज व त्यांची जोगवण याही बाबतींत सुधारलेल्या पद्धतींचे अनुभव घेण्यास ते शिकले नाहींत तर स्पर्धेंत ते टिकून राहण्याचा संभव फार कमी आहे.

रंगाऱ्यांच्या धंद्याला मुख्य प्रतिस्पर्धी म्हटला म्हणज जर्मनी वगैरे पाश्चात्य देशांतून येणारा रासायनिक रंग होय. हा रंग कच्चा, पण भपकेदार, तयार, आणि स्वस्त असल्यामुळें वनस्पतीपासून रंग काढण्याची मोठ्या यातायातीची व खर्चाची, पद्धति अर्थातच मागें पडली. पण या रासायनिक रंगाचा ही उपयोग आमच्या रंगाऱ्यांना त्यांच्या अज्ञानामुळें योग्य प्रकारें करतां येत नाहीं असें आढळून आलें आहे. रंगाऱ्याच्या धंद्यापुरतें थोडें तरी व्यावहारिक रसायनशास्त्राचें ज्ञान अवश्य आहे. तें ज्यांस आहे असे पांढरपेशाचे सुशिक्षित तरुण लोक हा धंदा हातीं घेतील, आणि पळसाचीं फुलें, कुसुंबा वगैरे इकडच्या रंगाच्या वनस्पतीपासून स्वस्त रंग कसे तयार करावे तें आपल्या बुद्धीनें शोधून काढतील तर मोठें देशकार्य होईल.

छिटें छापण्याचा धंदा ही मागें पडण्यास गिरण्याच कारण झाल्या आहेत. छिटांसंबंधानें लोकांच्या आवडी नेहमीं बदलत असतात. पण आमच्यांतले छिटें छापणारे या गोष्टीं लक्षांत घेत नाहींत. यामुळें त्यांचा माल नव्या नव्या रुचीला पसंत पडत नाहीं. तेव्हां या धंद्यांत सुधारणा करावयाची म्हणजे प्रथम नवे नवे लोकांना आवडतील असे सांचे तयार केले पाहिजेत. पौराणिक कथाभाग छिटांच्या छापांतून घालीत गेल्यानें जुन्या भाविक लोकांस बरें वाटतें. असा माल खपण्याचा संभव बराच आहे. सारांशीं, लोकांची अभिरुचि नेहमीं पाहत गेलें पाहिजे. दुसरी गोष्ट, विलायती छीट लोकांच्या नजरेपुढें जसें वारंवार येतें, तसें देशी छीट येत नाहीं. माल चांगला असला तरी तो लोकांच्या नजरेपुढें वारंवार येणें अवश्य असतें. दिल्ली, आग्रा, बनारस वगैरे उत्तर हिंदुस्थानांतल्या ठळक

ठळक शहरीं देशी छिट विकण्याच्या ए-जन्सी स्थापिल्या पाहिजेत. छिट वापरण्याचा प्रघात कोठें ज्यास्त आहे तें पाहून आपला माल तेथें लोकांच्या नजरेस पाडण्याची तजवीज झाली पाहिजे.

तांबट, कासार, ओतकरी वगैरे धंद्यांत आमचा वऱ्हाडप्रांत अतिशयच मागें आहे. आह्मांस लागणारीं बहुतेक भांडीं पुणें, मुंबई, नासिक, सांगली, बनारस, मिरझापुर, जबलपूर, वगैरे बाहेरच्या ठिकाणांहून येतात. अलीकडे उच्च दर्जाच्या माशिक्षित लोकांत अल्युमिनम धातूचीं भांडीं वापरण्यांत येऊं लागलीं आहेत. जर्मन सिल्व्हरची स्पर्धा त्यापूर्वीपासूनच चालूं आहे. नागपुरास कांहीं नक्शीचीं भांडीं तयार होतात. पण कोणत्या प्रकारचा माल काढावा हें कारागिरांना नीट न कळल्यामुळ दरवाजे, खिड-क्या, वगैरे सारखीं अवजड कामें ते काढतात. या धंद्यांत सुधारणा करण्यास पुष्कळ जागा आहे. ओतीव कामासाठीं मातीचे साचे तयार करतात, व ते लवकर मोडल्यामुळें प्रत्येक कामाला नवीन साचा करावा लागतो. यापेक्षां लांकडी साचे केले तर पुष्कळ त्रास वाचेल. पंचिंग मशीन व हातानें चालविण्याचा लेथ यांचा उपयोग ज्यास्त करतां येईल. मध्यप्रांतांत धातूवर नकसकाम करणारे कारागीर पुष्कळ आहेत आणि. वऱ्हाडप्रांतांत कोणी नाहींत. तेव्हां नागपूर कडून कांहीं कारागीर वऱ्हाडांत येऊन राहतील तर त्यांचें चांगलें चालून वऱ्हाडांतही कारागीर तयार होतील. अद्याप नकसकामांत गिरण्या आमच्या कारागिराशीं स्पर्धा करूं लागल्या नाहींत तोंपर्यंतच हें शक्य आहे.

बुरुडांच्या कामाला नेहमीं मागणी फार असते व त्यांच्या कामांत परदेशीयांची स्पर्धा अद्याप विशेषशी सुरू झाली नाहीं. शिवाय रेलवेच्या विस्तारामुळें त्यांचा माल शहरांतून जाण्याच्या सोयीही अधिक झाल्या आहेत. पण या सगळ्या गोष्टींचा परिणाम असा झाला आहे कीं बुरुड आपलें सगळें लक्ष जाडा व ओबड-धोबड माल तयार करून पैसे कमावण्याकडे लावीत आहेत. बारीक नाजूक व कलाकुशलतेचा माल कोणीच काढीत नाहींत. जपान किंवा चीन या देशांतून बांबूचे पडदे, सुबक करंडे, पेट्या, वगैरे माल जसा येतो तसा इकडे होत नाहीं. असा माल इकडे होऊं लागल्यास फ्याशनेबल राहणीच्या लोकांत व युरोपियन लोकांत त्यांचा खप झपाट्यानें होईल.

दोर करण्याचा धंदा अद्याप बऱ्या स्थितींत आहे. तथापि हातानें दोर वळण्यापेक्षां लहानशा यंत्राचा उपयोग करून श्रम वाचविण्याचें आमच्या लोकांच्या मनांत कधीं येत नाहीं. सुताचे दोर चांगल्या प्रतीचे मजबूत, पण बारीक करण्यास लांब धाग्याच्या कापसाचा उपयोग केला पाहिजे.

लाखेचीं भांडीं, खेळणीं, वगैरे जबलपूरच्या बाजूला फार दिवसांपासून होतात. पण त्यांच्यांत एक गोम आहे. ती ही कीं तीं असावीं तशीं चित्ताकर्षक नसतात. कागदाच्या कारखान्यांत जो लगदा आयता तयार होत असतो त्याचा खेळणीं करून त्यावर लाखेचे निरनिराळे रंग चढविले तर माल हलका होऊन स्वस्तही देतां येईल. अशा प्रकारचीं खेळणीं चीन, जपान वगैरे देशांतून इकडे आलेलीं पुष्कळांनीं पाहिलीं असतील. जपानी छत्र्यांना कागदाच्या लगद्याच्या मुठी असतात त्या वरून हुबेहुब हस्तिदंती मुठी सारख्या दिसतात. अशा प्रकारच्या मुठी इकडच्या कागदाच्या कारखान्यांतून सहज करतां येतील. मात्र वरून हस्तिदंतासारखें लुकण लावतां आलें पाहिजे ही विद्या कोणी जपानांतून शिकून आल्यास चांगलें होईल.

याप्रमाणें आगच्या प्रांताच्या औद्योगिक पाहणी करणाऱ्या आफिसराच्या रिपोर्टाचा सारांश व त्यावरून आह्मांस सुचलेले विचार दिले आहेत. या रिपोर्टांत केलेल्या सूचनांचा सरकारानें व लोकांनीं वेळींच विचार करून त्या सूचनांना मूर्त स्वरूप देण्याची कांहीं तरी तजवीज अवश्य करावी तरच वऱ्हाडप्रांताचा व्यापारी व औद्योगिक सर्वेंत कांहीं टिकाव लागेल. नाहींपेक्षां या प्रांताचें जीवन सर्वथा नुसत्या शेतकीवरच अवलंबून राहील, आणि अर्थे होगें कोणत्याही प्रकारें इष्ट नाहीं हें सांगावयास नकोच.

वऱ्हाडवृत्त.

हवामान—या सप्तकांत पावसानें उघाडी दिल्यामुळें शेतीच्या कामाला चांगली संधि मिळाली. एकंदर पर्जन्य ४। इंच झाला; पण हा सर्व बंगालच्या उपसागराच्या बाजूचा होता. पश्चिमेकडील वारा सोसाट्यानें वाहतो, हवेंत थंडपणा आहे आणि ढग वारंवार गर्दीनें उसळतात यावरून आतां मुंबईकडील बरसात लवकरच येथवर पोंचेल असा अंदाजा आहे. रोगराई नाहीं. सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे.

रा. रा. एफ. एल. क्राफर्ड साहेब असि० कमिशनर यांस आफि. डिपुटी पोलीस सुपरिन्टेंडंट करून बिलासपूर येथें नेमल्यामुळें वऱ्हाडच्या अधिकाऱ्यांस बढतीची उमेद अधीक राहील.

रा. रा. माणिकचंद आफि. मुनसफ यांस आकोल्यास ४थे मुनसफ नेमल्या अन्वयें ते येथें येऊन दाखल झाले.

रा. रा. त्रिम्बक नारायण तारे तहशीलदार वर्ग ३ यांनीं पेनशन घेतल्या कारणानें रा. रा. कृष्णाजी गणेश सहस्रबुद्धे तहशीलदार, बाळापूर यांस वर्ग ३ची बढती दण्यांत आली.

सुमुहूर्त— येत्या गुरुवारीं योगिनी एकादशीच्या सुमुहूर्तावर आमच्या ब्रिटिश राज्याचा सूर्य जार्ज ५वे हे आपल्या पत्नीसह सिंहासनावर विराजमान होऊन आपल्या सौहार्दानें, मैत्रीनें व भूतदयेनें सर्व जगाला प्रशांत, तेजस्वी व आल्हादित करूं लागतील. हा सुदीन इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिण्यांत यइल आणि सर्व पृथ्वी आनंदोत्सवांनीं दुमदुमून जाईल.

नोटिशीचें उत्तर.

सेनाजी वल्द चाहादू राहणार पिंपळखुटे खुर्द तालुका मलकापूर यांस:—

खालीं सही करणार हिनकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येतें कीं मी तुजला दत्तक घेतलें नाहीं. तुझा माझ्याशीं अर्थाअर्थीं कांहींच संबंध नाहीं. माझे घरांत तूं राहत नाहीं व माझे स्थावरजंगम इस्टेटीचा मालक नाहींस. नोटीस दिली ती सर्व खोटी आहे. विनाकारण त्रास दिला आहेस. तूं माझा दत्तक आहे ह्मणतोस तर योग्य कोर्टांत दावा करावा कळावें. ता. १२।६।११ इ. दस्तुर विष्णू माधव फडके पी. रा. आकोला.

सही

भीमाबाई मर्द नथुजी पा॥ ह्मे बांगर्दा असे.

नो. नं. २४०

नोटीस

नोटीस— ओंकारसा देवमणसा लाड टीकाईत वासीमकर रहाणार परतवाडा यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आमचे जवळ सोन्याचे दागिने वजन तोळे ४०॥ साडेचाळीसचे गहाण ठेवून मिती फाल्गुन वद्य ९ संवत १९६४ रोजीं मुद्दल १००० एक हजार रुपये दरमहा दर शेंकडा ४।२ आणे व्याजानें कर्जाऊ नेले आहेत. व्याजाची रक्कम व मुद्दल रुपये आणून देऊन निकाल करण्यास तुह्मास वरेच वेळां पत्रें लिहिलीं व निरोपही पाठविले पण त्याप्रमाणें तुह्मी आतां पर्यंत कांहींच तजवीज केली नाहीं किंवा भेटून निकाल लाविला नाहीं ह्मणून निरुपायास्तव आजही नोटीस देणें भाग पडलें तरी ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत आह्मांस भेटून सालीम रक्कम व व्याज आणून देऊन डागीने घेऊन जावे. जर मुदतींत तुह्मी येणार नाहीं व सोय करणार नाहीं तर आह्मी डागिन्याची चार मंडळी समक्ष बाजारभाव विक्री करून रक्कम येईल तींतून अगोदर व्याज वसूल केलें जाईल व जी बाकी रक्कम राहील ती मुदतींत जमा होईल आणि त्या शिवाय जी रक्कम येणें राहील ती तुह्मास जवळून द्यावी लागेल. करितां ह्या नोटिशीनें तुह्मास कळविलें आहे. कळावें. ता० ४-६-११ इ.

सही

श्री वीरसेन स्वामी संस्थान

कारंजा हल्लीं मुक्काम

नो. नं. २४१ मालेगांव जाहगीर.

नोटिशीचें उत्तर.

बेशमी नारायण वा॥ नकाजी धनगर रा. रवंदळ पोष्ट पळसो ता० आकोट

यांस—

रामु वा॥ नारायण धनगर रा. रवंदळ ता० आकोट यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं वऱ्हाडसमाचार आकोला ता १२-६-११च्या अंकांत तुझी मनला दिलेली नोटीस माझे वाचण्यांत आली त्यांतील मजकूर समजला. मी तुमचा पुत्र असून मी काम करण्यास ताकददार झालें दिवसापासून घरांतील सर्व बाय्कामाणसांचे हाल होऊं नयेत व दिवसेंदिवस आपले घरांत स्थावरजंगम जिंदगी वाढती होत जावी याजकरितां मी अतीशय कष्ट करून माझे तुमचे मेहनतीनें आजपर्यंत वरीच जिंदगी जमली आहे. अलीकडे मकर अर्थे दिसूर कीं माझ्याशीं तुह्मी द्वेषबुद्धीनें वागता याचें कारण हेंच असावें कीं माझे मेहनतीनें घरांत स्थावरजंगम असलेले जिंदगीवरचा माझा हक्क अगदींच राहूं नये. कोणीच तरी सांगण्यावरून तुमचे मनांत कुबुद्धि शिरली आहे. दोघांच्या सारख्या कष्टानें आजपर्यंत घरांत जिंदगी वाढली आहे. हल्लीं असलेल्यां सर्व स्थावरजंगम जिंदगी पैकीं निमे जिंदगीवर मालकी माझी आहे. माझा हक्क उडविण्याकरितां तुझी मजला नोटीस दिली आहे, यांजकरितां ही नोटीस पोंचले दिवसापासून चार दिवसांचे आंत एकंदर जिंदगीची निमे निमे वांटणी करून आपसांत निकाल करून माझी पावती घ्यावी. तसें न केल्यास सरकारचे हातानें या नोटिशीचे खचासुद्धा व एकंदर खर्चासुद्धां निकाल करून घेणें भाग पडेल कळावें ता० १७।६।११ मुकाम आकोला

सही

नि० रामु वा॥ नारायण याचे हातची रा० रवंदळ पो० पळसोद ता० आकोट.

नो. नं. २४६

नोटीस

गुजाई मर्द देवनाथ जात नाथ राहणार वाडेगांव हल्लीं राहणार पारस तालुके बाळापूर इस:—

खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं वऱ्हाडसमाचार वर्तमान पत्रांतून ता० २९।५।११ रोजीं नोटीस दिली ती पावली. तूं दिलेले नोटिशींतील मजकर खोटा आहे. तुझे भावाने त्याचे घरीं दोन माहिन्यांपासून नेलें आहे. तूं माझे घरांतून ६ माहिन्यांपासून गेलेली नाहींस. तूं भावाचे घरीं जातांना तुझे जवळ ठेविलेले रुपये ९० व तुझे आंगावरील दागिने किंमत रुपये ६०चे नेले आहेस. मी माझे घरीं तुजला अन्नवस्त्र देण्यास तयार आहे. दुसऱ्याचे घरीं तूं जाऊन राहिल्यास मी तुजला कांहीं देणार नाहीं. ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत मोझ घरीं येऊन राहावें. तुझे भावाचे सांगण्याप्रमाणें तूं करीत आहेस त्यांत तुझें नुकसान होईल.

कळावें ता० १६।६।११ सही

देवनाथ वल्द कल्याण नाथ जात नाथ राहणार वाडेगांव तालुके

नो. नं. २४६ बाळापूर नि० हातची

जाहिरात.

विष्णुसा बाळकृष्णसा सावजी दुकान मलकापूर या नोटिशी अन्वयें सर्वांस जाहिर करितो कीं आमच दुकानचें प्रामेसरी नोटेचें बुक संमत १९६५-६६-६७चें गहाळ झालें आहे तें पुस्तक कोणीं आमचें आह्मास आणून दिल्यास अगर कोणीं एखादे इसमांजवळ आहे असें खात्रीनें माहीती दिल्यास व शोधाअंतीं सांपडल्यास सदरहू बुक आणून देणारास अगर वरील माहीती देणारास रुपये पन्नास ५० आह्मी आपले खुषीनें देऊं ता० १७ जून १९११ ई०

सही

विष्णुसा बाळकृष्णसावजी द. खु.

नो० नं० २४७

सुधासिन्धु

सुख संचारक कंपनी मथुरा यांचीं तयार केलेलीं व सरकारांतून रजिष्टर झालेलीं औषधें, जीं वीस वर्षापासून लोकात अनुभविलीं आहेत.

सुधासिन्धु

हें कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादीवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किमत प्रत्येक बाटलीस ८८ आणे.

दृङ्गज केसरी

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ८४ आण. १२ बाटल्या एकदम मागाविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलीं जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें.

मागविण्याचा पत्ताः—
पंडित क्षेत्रपाल शर्मा मालक,
न. १९९ सुख संचारक कंपनी, मथुरा.

सिन्धुसुधा

अशी संधी पुन्हां येणार नाहीं.



सहा घड्याळें बेगारांस एक घड्याळ मोफत.

पोष्टखर्च माफ दर एकाची किंमत ३।.

जंटलमन इंमिटेशन रास्कोप सिस्टिम.

नांवचें खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट देणें. अशी अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पत्ताः—**खोजा वल्लीभाई इस्माल**
मुक्काम वर्धा. [मध्यप्रांत] WARDA.
नो. नं. ४

चिरकालचा खरा लाभ कोणता ?
पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो !
महाराज ! ह्या दोन्ही गोष्टी

वार्षिक वर्गणी ट. ख. म ह रु. १॥ **कलाशिक्षण** नमुना अंकास ८ आ.

नांवाच्या विविध हुन्नर, शास्त्रीयज्ञान, व्यापार, शेतकी, व इतर शेंकडो विषयांची माहिती शिकविणाऱ्यास वर्गणीदार व्हा. मराठी भाषेंत हें असें एकच पुस्तक आहे. वर्गणी रु. १॥ खरी पण चालू मार्च अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल. कारागिरांस, विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य हवें शिवाय ग्राहकांस हिप्नॉटिझम [Hypnotism] ऊर्फ अमेरिकन वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रामोहन, आरोगहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु. २५ फीची तूर्त रु. ११ न शिकवूं. पैकीं १ रु. प्रथम सहीं बरोबर पाठवावा. बाकीची व्ही. पी. येईल.

ह्या शिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या. औषधी. मंत्रबंत्रक्रिया, जडीबुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं. सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो,

व्यवस्थापक—कलाशिक्षण, कार्यालय
ना. न. ९ बडोदें.

नोटीस

विहार आनन्दका सागर रंगीन तसवीरे सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.

अगली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुशोके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पातिव्रता, व्यभिचारणी आदिकी 'पेहचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार समय सहवास स्थान क्रया, शैय्यातिथ,' कामस्थान सोलासगारें, वतीसोआभूशण, वस्त्रतअर्दवमधान पुत्रइष्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोकी चिकित्सा औषधि, पशुभाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण सुद्धां विद्या आदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु० १

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा
नो० नं० ७७ अलीगढ सिटी.

विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार– **खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल** इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशाधिकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी अमून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालेपयोगी मराठी इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग.

जाहिरात

वर्षफल—प्रत्येक महिन्याचे फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये **वर्ग** २ चे २ रुपये. खर्च ८= जन्मकाल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

पत्ता— भा० गो० पंडित,
रा- व पो० लोणखेड प. खानदेश.

जाहिरात.

टेक्स्ट बुक कमिटींत पसंत होऊन मे. **डैरेक्टर** सा. व. **मध्यपांत व वऱ्हाड** यांनीं व्ह. आणि अ. व्ह. शाळांतील बक्षिस व लायब्ऱ्या साठीं मंजूर केलेलें प्रसिद्ध **धनुर्धारी** कृत;-

१ **व्यापारी वाचनपाठ.** किं० .॥. त्याच प्रमाणें २ **पिराजी पाटील** किं०. ॥- ३ **उपाशी महाराष्ट्रास उद्योग** कि०. ।= ४ धर्मावरील मार्मिक निबंध अक १ ते १४; १०० बुकांस ।=रु० (पुर्वी १॥। किं० होती) १००० अगर ज्यास्त एकदम घेतल्यास .।– व त्याहून ज्यास्त घेतल्यास वरील प्रमाणें देऊं. निदान १०० तरी घेतलीं पाहिजेत.

नंबर १, २ व ३ यांच्या प्रती एकदम १० घेतल्यास अनुक्रमें ॥= व । व ज्यास्त घेतल्यास ॥– व .। किंमतीस देऊं.

टपाल खर्चे निराळा—व्ही. पी. नें मागिवल्यास निदान एक त्रितीयांश तरी किं० अगाऊ आली पाहिजे.

ल. वें. मांजरेकर आणि कंपनी

नोटिस

नोटिस बेशमी जैनारायण सांवगीदास मारवाडी व गंगाराम चुनिलाल मारवाडी राहणार मलकापूर

यांसः—

मी खालीं सही करणार याजकडून नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं तुम्हास आम्ही आमचे मालकीचें घर भाड्यानें एक वर्षा करितां १२॥ रुपया प्रमाणें दिलें होतें परंतु प्रत्येक माहिन्याच्या माहिन्याला करार देण्याचा होता. त्या प्रमाणें तुम्ही आतां पावेतों घरभाडें आणून दिले नाहीं व तुम्हास चालूं साला करितां भाडेपट्टा लिहून मागितलें असतां आज देतों उद्या देतों असें आम्हास चाळविता. आज पावेतों लिहून दिला नाहीं करितां तुम्हास या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत घरभाडें १९० रुपये आणून देऊन पावती घेऊन जावे व घर खालीं करून द्यावें. जर तुम्हास घर लागत असल्यास, दरसाल ३०० रूपये घरभाडें द्यावें लागेल. जर तुम्हास वर प्रमाणें भाडें कबूल असेल तर घरभाडेपट्टी लिहून द्यावें तसें न केल्यास घर खालीं करावें करितां तुम्हास मुद्दाम नोटिसीनें कळविलें असून नोटिशी प्रमाणें न केल्यास रिती प्रमाणें कोर्टात दावा आणून कोर्टखर्च व नोटिसीचा खर्च तुझा पासून घेतला जाईल कळावें ता० १२।६।११इसवी.

सही
वासमोहीदीन
नो० नं० २३९

नोटीस

नोटीस बेशमी खुशालराव वल्द योगाजी देशमुख रा- अलमपूर ता- मलकापूर यास

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुझी आमची सून नामें पिसी जवजे बापुराव इजला आपले नात्याच्या संबधानें सरासरी १। २ वर्षें झालीं आपले घरीं ठेऊन घेतलें आहे व तुझी तिजला फंदफितूर देऊन वडीलोपार्जीत असलेल्या जिन्नगीची अफरातफर करण्याचा विचार आहे. करितां या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं तुझी आमची सून पिसी जवजे बापुराव इजला आमचे घरीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत आणून घालावें. आणून न घातल्यास तुझी तिच्या अन्नवस्त्रा संबंधानें मजवर दावा वगैरे केल्यास तो रद्द असे व तुझी जी आमची वडिलोपार्जित जिन्नगी आहे ती आमचे सुनीचे इकडून आमचे संमतीवांचून गाहाण खरिदी व पट्टेखतानीं वगैरे देण्याचा कोणत्याच प्रकारें अधिकार नाहीं. दिल्यास ती रद्द असे. या नोटिसीचा खर्च देणें भाग पडेल. ही नोटीस दिली ता- १९-६-११ इसवी

सही
१ केशवराव रुतमराव देशमुख
दस्तुर खुद पोस्ट नांदुरा
नो. नं. २३६

आर्यवनौषधालय मुर्डी.

व्हाईसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल याजकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं आमचीं औषधें बारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास दिलें आहे. हे अवश्य लक्ष ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखाद औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

मदनामृत संजविनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्यस्तंबक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातु ती शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रागरूपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षी पाहिजे या दिवसांत एकदां तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हे अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य इतर धातुपात उन्हाळें इंद्रियशिथिलता, कडकी. गर्मीसंबंधीं मुरलेले विकोप मुत्रसंकोच, धातुचा पातळपाणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय त्रमांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडूरोग मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी. वातरोग, निद्रानाश पित्तावर. बाळंतरोग, मधुमेह जूनाट परमा, मुष्ठीमैथूननें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सत्तेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्ध वृद्धी, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचूं लागते त्यांत उपयुक्त वनस्पतीचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपानखर्डे सोबत किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील.

दरः—एकदम ३५ गो० १ रु०, ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १२५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः—यानें वडस. साहर, फुल, खुपऱ्या. बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिसत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु० २

३ दंतबलवर्धक पूडः—दंत संबंधीं सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें मुळ्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्णः—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः—औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधांनें हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रहीं तापावर गोळ्या, गाठीस मलम, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा ठेवून याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म खाक, गुटीका, आसवे, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहिराती सुरूं असून प्रत्येक जाहिरात सुशोभित करून जो तो पुढें येऊं पाहात आहे.

आपला समाज निरुद्योगी आळशी बनल्याभुळें एकदा जो धंदा सुरूं केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नक्कल करून वाटेल त्यानें करावी आमचे जाहितीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिले वगैरे गावांतून तो पुणावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याची तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १५।२० वर्षें अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कोट्यावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्यबंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरावी, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागणें ती खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

नो. नं. २४

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

Oriental Government security
LIFE ASSURANCE COMPANY
Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Berar manager,

HEAD OFFICE—BOMBAY

HEAD —QUARTERS— NAGPUR.

FUNDS Exceed $3\frac{3}{4}$ crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowmenp policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application—

M. DESOUZA,

CHIEF AGENT, Nagpur.

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाड समाचार.

Berar Samachar.

Registered No. N. 4

वर्ष ४५] आकोला—सोमवार तारीख २६ माहे जून सन १९११ इ० [अंक २५

वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस.....१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ..... २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.

हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील; यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमाच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक G. A. Phillips.
आकोला ९।९।०५ एजंट
नं १

मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ $\frac{२}{३}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभोंव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक G. A. Phillips.
आकोला २१-९-१० एजंट.
नो० न० २

यंदाचा पाऊस.

यंदा पावसानें लवकरच कंबर बांधल्यामुळें ओला चारा लवकर मिळूं लागेल यांत शंका नाहीं. तथापि तुमच्या गुरांना आतां पासूनच ओला चारा घालणें अपायकारक आहे. कारण पुढें कदाचित पावसानें ओढून धरल्यास हिरवा चाराही नाहींसा होणार आणि हिरव्याची चट लागल्या मुळें वाळलेला कडबा गुरें खाणार नाहींत. बरें ओली वैरण पहिल्या पासूनच मुबलक मिळाली तरी ती एकदम गुरांना सुरू केली असतां ती त्यांना पचत नाहीं. याकरतां या वेळींच वाळलेल्या कडब्याचे अगदीं बारिक तुकडे करून त्यावर मिठाच्या पाण्याचा शिडकाव द्याल तर तुमचीं गुरें फार गोडीनें वैरण खातील. या कामा साठीं आमचें सुधारलेलें कडबा कापण्याचें यंत्र वापरा. कारण आमचें यंत्र शेतकऱ्यांनीं, गवळ्यांनीं व पागा आफीसरांनीं ही पसंत केलें आहे. किंमती बद्दल विचाराल तर फक्त १० रु. ५ आणे पडतात.

किर्लोस्कर बंधु,
किर्लोस्करवाडी.
नो. नं २५० पोष्ट कुंडल (सातारा)

श्री राधावल्लभाजयति

वर्षफल।

हमारे पास सिर्फ १ पोस्टकार्ड पर किसी फल या फूल का नाम लिख भेजो हम आप के एक वर्ष का सुख, दुःख लोभ, हानि, जीवन, मरण, रोग, सन्तान, तेरक्की, मौकूफी, व्यापार में किस वस्तु स लाभ होगा दिसावरी काम में कैसा लाभ होगा और जो महीना हानिकारक उस का उपाय महीनेवार वर्षफल वी० प० द्वारा २। रुपये में भेज देंगे. हमारे हांय जन्म पत्रादि उत्तमोत्तम बनते हैं, अनेक प्रशंसा पत्र मौजूद हैं, विशेष परिचय के अर्थ ८॥ आना का टिकट भेज कर सूचीपत्र मंगो लीजीये.

मिलने का पता:—

गोस्वामी राधामोहन शर्म्मा
चित्तीखाना आगरा.

जाहिरात.

मी इंदरसिंग जसराज मारवाडी राहणार खामगांवपेठ तालुके मजकूर जिल्हा बुलडाणा येथें जसराज श्रीराम या नांवाचें माझे मालकीचें दुकान आहे. त्या दुकानीं व इतर दुकानां करितां बाकीदास कणीराम मारवाडी व अंबादास गंगाराम ब्राह्मण बधनापूरकर व शंकर गोविंद ब्राह्मण बधनपूरकर या त्रीवर्गांना कुलमुखत्यारपत्र तारीख २६।११।१९०९ इसवी रोजीं दिलें होतें. तें हल्लीं अनुक्रमें तारीख २५।३।१९११ व १४।३।११ व ४।९।१० इसवी रोजीं कुलमुखत्यारपत्र रद्द केलें आहे त्या त्रीवर्गांनीं आमचे संबंधानें कोणाशीं कांहीं वरील तारखे नंतर व्यवहार केल्यास आह्मी जबाबदार नाहीं कळावें, तारीख १६।६।११ इसवी,

सही (मारवाडींत)
इंदरसिंग जसराज मारवाडी द० खु०
नो नं २५१

नोटीस

नोटीस बेशमी शेख दादू वा॥ शेख मानीक बकरकसाई रा. मौजे मोटेगांव प्रगणें रिसोड तालुके वाशीम जि. आकोला यांस:—

नोटीस लिहून देणार बन्नुबी मर्द शेख दादु हल्लीं रा. गोहगांवदानेड तालुके मेहकर जि. बुलडाणें नोटीस लिहून देते पैसाजे कीं:— तुह्मी मजला सहा वर्षें झालीं मुळींच टाकून दिलें आहे माझे अन्नवस्त्राची व्यवस्था केली नाहीं. मी माझ्या भावाच्य येथें राहत आहे. तेथें मजला अन्नवस्त्राबद्दल दरमहा दहा रुपये प्रमाणें खर्च येत आहे. सहा वर्षांचा [illegible]नें खर्च ७२० सातशें वीस रुपये या नांवा आहे. सदर्हू रक्कम माझा भाऊ मज[illegible]हण्यांत आहे. तुह्मी दुसरी बायको के[illegible] मध्यें प्रा[illegible] मजला नेऊन मुळींच नांदवत ना[illegible]नचे [illegible]तां मजला माझे भावाचें कर्ज अतिशय [illegible]र्माचे [illegible] आहे. व तो हल्लीं अन्नवस्त्र देण्यास नाकारित आहे. वरील कर्ज फेडण्यास मजजवळ मुळींच साधन नाहीं. तुह्मी दुसरी बायको केल्यामुळें जनरीती प्रमाणें माझ्याशीं संसार तुह्मी मुळींच करीत नाहीं. करितां या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं, सदर्हू नोटीस पावल्या दिवसा पासून पंधरा दिवसांचे आंत माझे बद्दल माझे भावास जो ७२० रुपये खर्च आला आहे, तो देऊन टाकावा व मजला घेऊन जाऊन नांदणुकीची व्यवस्था करावी. मुसलमानी धर्माप्रमाणें आपण लग्नामध्यें जे माहेरचे रुपये पंचासमक्ष ठरविले आहेत तेही देऊन टाकावे. जर याप्रमाणें १५ पंधरा दिवसांत सर्व व्यवस्था माझे पुढें लागणारे अन्नवस्त्रासुद्धां जर तुमचेकडून झाली नाहीं तर मी हीच फारकती समजून माझे मनास येईल तो नवरा करून मजसंबंधानें माझे भावास जो खर्च आला आहे तो देऊन टाकीन व तुमचे जवळ माझी जी माहेरची रक्कम पंचासमक्ष ठरलेली आहे तीजबद्दल फिर्याद करून रक्कम वसूल करीन. मी दुसरा नवरा केल्यावर माझ संबंधानें आपला कोणत्याच प्रकारें हक्कसंबंध राहणार नाहीं. तरी वरील मुदतींत माझे भावास लागलेला खर्च व माहेरची रक्कम देऊन मजला पुढें अन्नवस्त्राबद्दल महिना बांधून द्यावा. जर याप्रमाणें आपणाकडून व्यवस्था झाली नाहीं, तर मी दुसरा नवरा करीन. सबब तुमचा मुळींच हक्कसंबंध चालणार नाहीं. ही नोटीस लिहून दिली. आज तारीख १२ माहे जून सन १९११ इसवी दस्तुर यादव दामाधर कुळकर्णी रा. बुलडाणें.

सही
बन्नुबी मर्द शेखदादु राहणार गोहगांव हल्लीं मुक्काम बुलडाणें निशाणी खुद हातची बांगडी.
नो. नं. २५२

नोटीस

पुंजाई मर्द माधोजी ठाकरे रा० मौजे भांबेरी ता० आकोट हल्लीं वस्ती बोरगांववैराळ ता० बाळापूर इस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं तुमचा नवरा आणि माझा बाप असे उभयतां बंधु असून वडिलोपार्जित [illegible]ळकतीचे मौजें भांबेरी प्रगणे पातुर्ड ता० आकोट येथील शेत सर्वे नंबर ५७ एकर गुं[illegible] २७८३६ आकार रुपये ७३ यांतील [illegible]न एकर वीस गुंठे जमीन तुमचे कबज्यां[illegible] मैयत वारस या नात्यानें असलेली या [illegible]वीं तुह्मी मैत तुमचा नवरा माधोजी वल्लद [illegible] संभाजी यांजवर असलेले लोकांचें कर्ज [illegible]ाझे बापानी तोडल्यावरून याचे व तुमचे अन्नवस्त्र पुरविण्याचे मोबबल्यांत तुह्मी [illegible]ऊन कबज्यांतही दिली होती त्या वरून सदर्हू शेताचा आठनऊ वर्षें उपभोग घेतला आणि तुह्मीही माझेच येथें होत्या. यानंतर कांहीं लोकांच्या चिथावणीवरून तुह्मी माझे घरांतून निघुन अलग राहिल्यावरून पंचानुमतें ठरल्याबरहुकूम जें शेत तुह्मी आह्मास दिलें होतें तेंच शेत फक्त तुमच्या अन्नवस्त्राच्या सोयी करितां तुह्मास देण्यांत आलें. या शेतावर अगर याचे भागावर तुमची कोणतेच प्रकारची मालकी नसून अनाधिकारानी तुमच्या मुलीचा मुलगा नामें मारूती याचा बाप जिवंत असतांना तुह्मी लग्न केलें आणि या कर्जांत रघुनाथदास रामनारायण बोरगांववैराळ यांस रक्कम रुपये तीनशांचें गाहाणखत लिहून देऊन बुक नंबर १ अ० नंबर ५१८ सन १९११ यास नोंदून दिलें. हें तुमचें करणें माझ्या नुकसानीच्या उद्देशाचें असल्यावरून शेत कबज्यांत घेण्यास आह्मास कारण उत्पन्न झालें व या योग्य कारणानें आह्मी शेत कबज्यांत घेणार तुमचें अन्नवस्त्र देण्यास मी तयार आहे. जें कर्ज तुह्मी काढलें तें या शेतीवर नसून ज्या मुलाचें लग्न केलें त्याचे बापावर आहे. त्याजकडून तें कर्ज आदा करावें. माझी शेती त्या कर्जास जबाबदार नाहीं. माझा बाप वृद्ध असल्या कारणानें त्यांच्या हुकूमनाम्यावरून ही नोटीस मी आपले सहीनें तुह्मांस दिली आहे. कळावें. तारीख १२ ६।१९११ इसवी. दस्तुर गोविंद बापूजी पी० रा० आकोला.

सही
नामदेव वल्लद भिवसन ठाकरे राहणार भांबेरी द० खु०
नो० नं० २५३

ागील अंकावरून पुढें चालूं

गद्गुरु श्रीशंकराचार्य ची प्रश्नोत्तरमाला.

दाचें स्थान कोणचें?
ग
या करण्यास योग्य कोण ?
शूर
ा कोण
जेस उपयोगी पडणारा
धारी मनुष्याची खरी संपत्ति कोणची
रोग्यता
तो कोण व फल कोण भोगतो
जामिनीची मेहेनत मशागत करतो
मुक्त कोण होता
पवित्र वेदांच पठण करतो
र्ग काणास म्हणावें
ास संतती आह
ण्यास अत्यंत कठीण अशी कोणच
ोजय
पचारी कोण
ाचे रताचा व्यय झाला नाहीं
ार्त श्रेष्ठ देवता कोणची
म्रविद्या
गास कोण पोसतो
विता
र्वास जीवनदाता कोण
र्जन्य
ूर कोण?
। भीतास भया पासून सोडवितो
ारक कोण
गुरु देव
गद्गुरु कोण
हिश्वर
ानाचें उगमस्थान कोणचें
ाकर
खेर मुक्ति कशानें प्राप्त होते
क्तिदात्या श्रीगुरुसेवेनें (मुकुंदसेवा)
कुंद कोण
ो आपणास अज्ञानापासून सोडविते
ज्ञान कशास म्हणावें
वस्वरूप विस्मरण
खी कोण
ज्याचें ठिकाणीं क्रोध नाहीं
रात्रंदिवस ध्यान कशाचें करावें?
ाच्या जगाचें ध्यान न करितां ईश्वराचें चिंतन करावें.
नेत्र असून अंध कोण
नास्तिक
या जगांत पंगू कोणास म्हणावें
जो वृद्धपणीं तीर्थयात्रे करितां निघतो

प्र. तीर्थांत अत्यंत पवित्र तीर्थ कोणते
उ. जें मनाचें दोष नाहींसे करितें
प्र. मनांत निरंतर कोणची गोष्ट वागवावी
उ. हरीचें नाम; म्लेंच्छ भाषा नव्हे.
(ग्रीक आणि)
प्र. शहाण्याच्या तोंडून कोणच शब्द निघू नये?
उ. परदोष आणि मिथ्या भाषण
प्र. मानव जातीनें कोणती गोष्ट प्राप्त करून घेतली पाहिजे.
उ. ज्ञान, धन, सत्ता, कीर्ति आणि सद्गुण
प्र. सर्व उत्तम गुणांचा नाशक कोण
उ. लोभ (हव्यास)
प्र. शत्रू कोण
उ. काम वासना
प्र. कोणता समाज त्याज्य गाय
उ. जेथें वृद्ध आणि श सल्लागार कऱ्या नाहींत.
प्र. या जगांत मनुष्यानें म्याकडे. येईल अ बद्दल सावध त्याच्या इ
उ. राजसेवा तें पत्र
प्र. प्राणापेक्षा जास्त आल्हा मार ि काय अहे
उ. सज्जनसहवास आणि कुलधर्मानुसार आचरण
प्र. प्रयत्नें करून संरक्षण कोण्या गोष्टीचें केलें पाहिजे.
उ. मान, सद्गुणी आणि पतिव्रता भार्या आणि स्वमत.
प्र. या जगांत कल्पलता कोणती आहे.
उ. सच्छिष्यास केलेला उपदेश
प्र. चिरकाल राहणारा असा वटवृक्ष कोणचा
उ. सत्पात्रीं दान
प्र. सर्वांत उत्तम शस्त्र कोणचें
उ. कर्म कुशलता
प्र. माता कोण
उ. धेनू
प्र. शक्ति कोणची
उ. धैर्य
प्र. मृत्यु कोणचा
उ. निष्काळजीपणा
प्र. विषाचें स्थान कोणतें ?
उ. दुष्ट मनुष्य
प्र. मनुष्याची अब्रू कोण्या गोष्टीनें जाते
उ. ऋण
प्र. निर्भय असें स्थान कोणतें
उ. विषय निर्मोहता
प्र. भीतिचें स्थान कोणतें
उ- द्रव्य
प्र. दुर्लभ असें काय आहे
उ. हरिभक्ति
प्र. पातक कोणचें
उ. हिंसा, परपीडा
प्र. परमेश्वरास प्रिय कोण आहे
उ. जो दुसऱ्यास त्रास देत नाहीं व आपणास त्रास दिला असता त्रासत नाहीं.

हा प्रश्नोत्तररूप रत्नहार जे आपल्या गळ्यांत घालतील ते निर्दोष असे सज्जना मध्यें विचरतील.

चिं० ह० मराठे.

जून स
वऱ्हाडसमाचार रु. पण
जयजय

जेष्ठ वद्य ३० शके १८३३ दुर्मतीनाम संवत०

स्वस्तिवाचन.

गेल्या गुरुवारच्या एकादशीचा मुमुहूर्त फार कल्याणकारक झाला आणि पूर्व संकेता प्रमाणें आमचे चक्रवर्ती बादशहा हे आपल्या पत्नी सह सिंहासना वर अभिषिक्त व विराजमान झाले ही गोष्ट परम आल्हादाची होय. हा राज्याभिषेकाचा समारंभ फारच उत्कृष्ट व वर्णनीय झाल्याबद्दल सर्वानें विलायतच्या तारा बोलतात. पुण्यश्लोक श्रीमान्नृपती जार्ज ५ वे आणि राणी मेरी यांच्या राज्यारोहणासंबंधानें हा सोन्याचा दिवस ब्रिटिश राष्ट्राच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं नमूद केला जाईल आणि ब्रिटिश राष्ट्राचें मुख्यांग या दृष्टीनें आगच्या हिंदी देशानें हा धन्य काल आनंदोल्लासांत घालविला इतकेंच नाहीं तर ईश्वराच्या प्रार्थनांनीं मंदिरें, माशिदी, चर्चें, अग्यारी हीं अगदीं दणाणून गेलीं आणि सर्व प्रजासमूहाचें स्वस्तिवाचन आकाशांत दुमदुमून मनोवेगानें श्रीमान् नृपतीच्या इश्वरी देहावर आनंदाची व अभिनंदनाची वृष्टी करीत होतें हा हृदयंगम देखावा मनापुढें उभा राहिला म्हणजे आनंदाश्रुनीं डोळे भरून येतात आणि इंडिया व ग्रेटब्रिटन यांचीही एकजीवात्मक संघटना पाहून ईश्वरी लीलेचें कौतुक वाटतें !

आकोल्यास तर हा दिवस असा सर्वोत्कृष्ट गेला कीं त्या दिनकार्याच्या बाहुल्यामुळें सर्व शहर आनंदोत्सवांनीं परिप्लुत होतें. श्रीराममंदिरांत पुराण, मशिदींतून निमाज, चर्चमधून प्रार्थना, व अग्यारीमध्यें ईश्वरस्तवन इत्यादी मंगलांनीं दीनचर्येला प्रारंभ झाला. विद्यार्थिजनांच्या खेरीज नानाविध खेळांनीं तरुण पिढी अगदीं हर्षनिर्भर व व तल्लीन होती आणि सायंकाळीं जाहिरसभा भरवून लोकांनीं आपले लोकप्रिय अध्यक्ष मेजर कोलंब साहेब यांच्या द्वारें विलायतेस अभिनंदनपर स्वस्तिवाचनाचा विद्युत्संदेश पाठविला आणि रात्रौ कोठें चिराकदान व कोठें कीर्तन यांनीं रात्रीचा काल देखील फार रमणीय प्रकारें न कळत निघून गेला. जाहिरसभेंत रावबहादूर देवराव विनायक, मेजर प्रौडन, रा. रा. मोरेश्वर बाळकृष्ण परांजपे इत्यादिकांचीं समयोचित संभाषणें होऊन जयजयकारांचा घोष करीत करीत लोक आपापल्या गृहीं परत गेले. विलायतेंत या राज्याभिषेकाच्या वेळीं इंडियन लष्कराला मोठाच सन्मान दिला आणि मिरवणुकीच्या वेळीं श्रीमंत सयाजीराव महाराज यांस राजेसाहेबांनीं आपले प्रतिनिधी होण्याची अलभ्य संधि दिली. ही गोष्ट आनंदोद्गारांनीं जाहिरसभेंत व्यक्त करण्यांत आली.

गेल्या गुरुवारचा राज्याभिषेक हा इंडियांतील भावी राज्याभिषेकाचीं प्रसादचिन्हेंच होत. इतिहासांत अपूर्व असा हा कपिलाषष्ठीचा सुयोग आहे; आणि त्या दिसंबरच्या राज्याभिषेकाची मार्गप्रतिक्षा करण्यांतही फार विलक्षण आनंद वाटतो. हस्तिनापूराच्या पुण्यक्षेत्रीं श्रीधर्मराजाच्य सिंहासनावर आमचे चक्रवर्ती जॉर्ज व मेरी या प्रतिष्ठित होतील तेव्हां त्या सिंहासनाच्या पूर्वील परंपरा आमचे बादशहा आपल्या बरोबर विलायतेस नेतील तेव्हां आमच्या राष्ट्राला अशी प्रौढी वाटेल कीं आज हिंदुस्थानचा बादशहा ब्रिटनवर राज्य करण्यासाठीं आम्ही पाठवीत आहों. ईश्वर करो, आणि भावी जगद्गुरूच्या आगमनाला अत्यंत अनुकूल अशी देशकालस्थिति आमचे पुण्यश्लोक श्रीमान् नृपति जॉर्ज हे लवकरच आणोत.

आणखी एक अत्याचार !

श्रीमन्महाराज पांचवे जॉर्ज बादशहा यांच्या राज्याभिषेकमहोत्सवाच्या तयारींत हिंदुस्थानचे लोक गुंतले आहेत, आणि दिल्लीच्या दरबाराकडे सर्वांचे डोळे लागून राहिले आहेत; हिंदुस्थानाला ब्रिटिशसाम्राज्यांत योग्य स्थान मिळून त्या देशाच्या राज्यपद्धतीची सुधारणा हा मुत्सद्यांच्या चिंतनाचा विषय होऊन बसला आहे; देशी संस्थानिक व रयत यांच्या राजनिष्ठे बद्दलचा किंतु पार नाहींसा होऊन इंग्लंड व हिंदुस्थान यांचीं मनें प्रेमरज्जूनें एकवटत चाललीं आहेत अशा मंगलमय प्रसंगीं सर्वांच्या उत्साहाचा भंग करणारी आणि सर्व देशावर उद्विग्नता पसरणारी मीनाक्षी-स्टेशनवर घडलेल्या अत्याचाराची बातमी येऊन थडकावी ही केवढी दुर्दैवाची गोष्ट आहे! मीनाक्षी स्टेशनवर तिनिवेल्लीचे कलेक्टर मि० ॲश हे पत्नीसह प्रवास करीत असतां आगगाडीच्या डब्या पाशीं येऊन एका माथेफिरूनें गोळी झाडून साहेबांचा प्राण घेतला आणि स्वतःही त्या दुष्टकृत्याचा जबाब देण्यासाठीं स्वतःवर गोळी झाडून खुनी मनुष्य देवाच्या द्वारीं जाऊन उभा राहिला या माणसाला अत्याचार करण्याची बुद्धि कशामुळें झाली, त्याचे साथीदार कोणकोण आहेत, व हा खून करून त्याला काय मिळवावयाचें होतें वगैरे गोष्टी सांगण्यास खुनी मनुष्य जिवंत राहिला नसल्यानें पोलीस तपासाला मोठी अडचण झाली आहे. तथापि आमची खात्री आहे कीं मद्रास सरकार या चौकशीचें काम शांत डोक्याच्या आणि हुषार कामदाराकडे सोपवून या प्रकरणाचा पूर्ण छडा लाविल्याशिवाय राहणार नाहीं, आणि राजनिष्ठ प्रजाजनही या कामीं पोलिसास यथाशक्ति साह्य देऊन आपल्या अंगचा खरा नागरिकत्वाचा गुण प्रकट करतील. या प्रकरणाचा सत्वर आणि पूर्ण निकाल केव्हां लागेल तो लागो, पण तूर्त तरी हिंदुस्थानच्या प्रत्येक समंजस माणसाच्या मनांत एकच गोष्ट प्रमुखत्वानें वास करीत आहे आणि ती म्हणजे अत्याचारास बळी पडलेल्या मि० ॲशसाहेबांच्या पत्नीविषयीं निःसीम सहानुभूति ही होय. मद्रास इलाखा अशा प्रकारच्या अत्याचारा पासून आतांपर्यंत अलिप्त होता. त्यालाही या कृत्यानें

डाग असल्यामुळें हिंदी प्रजेविषयीं अगोदरच असलेल्या गोऱ्या लेखकांना सरसकट हिंदी लोकांविषयीं हवेतसे निरर्गल प्रलाप काढण्यास आतां चांगलें फावेल. पण हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें लॉर्ड हार्डिनसाहेबासारख्या सहानुभूतिप्रेरित, सदय, आणि शांत डोक्याच्या मुत्सद्याचे हातीं असल्यामुळें कोणत्याही प्रकारें अन्याय घडण्याचा संभव नाहीं ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे.

अत्याचारा संबंधानें लिहितांना याविषयींची भविष्यवाणी खरी ठरली याबद्दल आश्चर्य व्यक्त केल्या वांचून राहवत नाहीं. विलायतेंतले सुप्रसिद्ध ज्योतिषी मि० झाडकिल हे नव्या वर्षाचें भविष्य व वर्षफळ गणितानें वर्तवून अगोदर चारसहा महिने प्रसिद्ध करीत असतात. यांनीं जून १९११ संबंधाचें भविष्य वर्तवितांना असें स्पष्ट झटलें होतें कीं 'जून महिन्याच्या शेवटीं शेवटीं बंगाल्यांत नसली तरी निदान मद्रास इलाख्यांत तरी अशांति ही अत्याचार, दुष्कृत्यें व आगी या रूपानें प्रकट होईल.' या भविष्याप्रमाणें तंतोतंत गोष्टी जुळाव्या, आणि बंगाल प्रांतीं पोलीस इनस्पेक्टराचा आणि मद्रास इलाख्यांत खुद्द कलेक्टराचा असे दोन खून जून महिन्याच्या उत्तरार्धांत-आणि तेही एकाच आठवड्यांत घडावे-हा योगायोग अतर्क्य आणि अत्यंत आश्चर्यकारक आहे यांत शंका नाही.

लष्करी खर्च.

गेल्या सालीं बजेटावरील वादविवादाच्या वेळीं हिंदुस्थान सरकारच्या मुख्य फडनिसांनीं हिंदुस्थानचा खर्च कमी करण्याचें वचन दिलें होतें. त्या वचनाप्रमाणें कोणकोणत्या बाबींत खर्च कमी करतां येईल या विषयींचा विचार तूर्त चालूं आहे असें कळतें. कांग्रेसनें आज जवळ जवळ पंचवीस वर्षें लष्करी खर्च कमी करण्याविषयीं आपला आक्रोश सुरूं ठेविला आहे. या आक्रोशाचें या वेळीं स्मरण होऊन लष्करी खर्च कमी करावा कीं नाहीं याबद्दल वर्तमानपत्रांतून भवति न भवति सुरूं आहे. कित्येक आंग्लो इंडियन पत्रांनीं असें सुचविलें आहे कीं सरहद्दीवरील रशियाचा बाऊ जो आतां पूर्वी इतका राहिला नसला तरी पूर्वेकडचें पिंवळें संकट भीति दाखवीत असल्यामुळें ब्रिटिश फौज कमी करणें अगदीं रास्त होणार नाहीं. खर्च कमी करावयाचाच असला तर देशी फौज कमी करावी म्हणजे झालें. सिव्हिल खात्यांतून काटकसर करणें झालें म्हणजे पहिली धाड गरीब बिचाऱ्या कारकुनांवर यावयाची; शंभर दे नशें कारकून कमी करून त्यांच्या बदल एखादा दुसरा लठ्ठ पगाराचा आफिसर वाढवावयाचा अशी बहुधा रीत आहे. तसाच प्रकार लष्करी खर्चाच्या काटकसरीच्या संबंधांत होईल कीं काय अशी भीती वाटते. वस्तुतः हिंदुस्थानाच्या मानानें देशी फौज नमून गोरी फौजच प्रमाणाबाहेर आहे आणि शिवाय गोऱ्या फौजेचा खर्च देशी फौजेच्या खर्चापेक्षां कित्येक पट अधिक असतो. असें असतां काटकसर धाड देशी फौजेवर येऊं पाहत आयर्लंड देशांत जितकी गोरी फौज आहे तितकी हिंदुस्थानांत आहे. देशी फौज कमी करणें झालें तर ती कमी करणें झालें तर ती कमी करणें झालें तर ती

या तोंडून शद्ब निघाला कीं तीं काट्यानें पाळतात. तिचा डोळा कीं मुलें लागलींच तशीं वागतात. कांहीं ह्मणाली कीं तिचे चाकर नें तें काम करितात. ती बोटानें आणि तें काम लगेंच होऊन तिचा दयाळूपणा गडीमाणसाच्या हृद- जागृत असतो. आणि तिच्या गोड तीं माणसें त्वरेनें कामें करितात. या आमदानींत ति । गर्व नसतो गरिबीच्या कालांत ती सहनशील- आपली गरिबी झांकून टाकते. या पतीवर संकटें आलीं तर ती आपल्या नें त्यांची तीव्रता कमी करिते आणि प्रमळ वृत्तींनीं त्यास सुखविते. तो मन तिच्या पाशीं मोकळें करितो शा पासून त्याला सौख्य मिळतें. नर तर धन्य कीं ज्याची ही आणि तें अपत्य धन्य कीं ज्याची ता !

मुक्तेश्वराचें वनपर्व.

या मे महिन्यांत पुणें येथें वसंत- नमालेंत अनेक विषयांवर विद्वानांचीं नें झालीं. त्यापैकीं कित्येक फार होतीं. या मालेंतलें रा. ब. वैद्य व्याख्यान सुश्राव्य ह्मणण्याच्या ऐवजीं किंवा वाचनीय होतें असें आतां पाहिजे. कारण कीं तें व्याख्यान ोंडानें न होतां विविधज्ञान विस्ता- लखरूपानें प्रसिद्ध झालें आहे. व्या- वा विषय ' मुक्तेश्वराचें वनपर्व, हा रा. ब. च्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें खांत बहुश्रुतपणा, परिश्रम, विद्या- , रसिकता वगैरे गुण चांगले दृग्गो- ोतात. पण त्या बरोबरच काव्यवा- यींची अलीकडील विद्वानांची अना- ो दृष्टीस पडते. एरव्हीं ' बोल बो- सर्वत्र सूर्यें दिधलें स्थालीपात्र परि सांचें वक्तृत्व वदलें नाहीं भारतीं ॥' ध्या ओवींतले दुष्ट पाठ रा. ब.- दिसण्याचें व या ओवीचा अर्थ स लागत नाहीं असें ह्मणण्याची येण्याचें वस्तुतः कांहीं कारण नाहीं. ओवींत ' वक्तृत्व ' या बद्दल ' वक्त्र' ाठ पाहिजे होता हें ' सर्वत्र , ' इ० शद्बांच्या अंत्य अक्षरावरून प्रा- नियमानें सहज कळण्यासारखें आहे. द्रौपदीला स्थाली दिली अशी सर्व दंतकथा सांगत आले आहेत, पण स्वतः ही गोष्ट आपल्या भारतांत । सांगितलेली नाहीं हा त्या ओ- सरळ व स्पष्ट अर्थ असतां राव- नीं ' वक्तृत्व ' या शद्बानें व्यासावर आक्षेप दिसतो अशी कुशंका काढून ाचे पदरीं धाष्टर्याचें माप बांधावें श्चर्य आहे. एका ज्ञानेश्वराचे दोन , एका कपिलाचे दोन किंवा तीन आणि एका वामनाचे चार वामन वें धाष्टर्य अलीकडल्या विद्वानांमध्यें दिसतें. पण मुक्तेश्वराची कविता ज्यांनीं वाचल ना मुक्तेश्वर व्या- सांना किती व ते तें निराळें सांगण्याचें कारण कारण नाहीं. इतिहासरस नांवाचा काढण्याच्या सूचनेच्या विरुद्ध रा. ब. ओवका केली ती ही निरर्थक आहे. ' सन ' या शब्दानें कथा असा अर्थ तें विवक्षित नसून ' वस्तुस्थिति ' असा गवि इति- हास शब्दाचा घेतला हेत. ह्मणजे वस्तुस्थितिनिदर्शक वर्णन वाचून किंवा ऐकून मनुष्याच्या वृत्ति कशा तृप्त हो व तेंच विपरीत वर्णन वाचून मनाची कशी ल- बिच होते हें दाखविणारा रस खं तार अलंकारशास्त्रानें बालावयास पाहिजे होत्या, कळतें. इतिहासरस हें नांव अन्वर्थ नसले जु तर दुसरें एकादें नांव द्या; पण चित्तवृत्तीस तृप्ति देणारा असा तो एक स्वतंत्र रसीस आहे याबद्दल कोणी ही सहृदय वाचक शंका घेईल असें आह्मांस वाटत नाहीं.

शास्त्रीय शोधः— निकोला टेस्ला नांवाचा एक विद्वान शास्त्रज्ञ अमेरिकेंत अ- सून त्यानें आजपर्यंत विद्युच्छास्त्रांतील कित्येक शोध लावले आहेत. अमेरिकेंत उत्पन्न केलेल्या विद्युतशक्तीनें आयर्लंदांत तो विजेच्या गाड्या चालविणार आहे ह्मणजे तात्पर्य काय पृथ्वीवरील अंतर ह्मणून त्यानें नाहींसें केलें आहे. तो ह्मणतो '' हेवेच्या सहायानें मी पाहिजे तेथील विद्युत् शक्ति पृथ्वीच्या पाठीवर कोणत्याही ठिकाणीं अनायासानें पाठवूं शकेल व या शक्तीनें मी पाहिजे तेथें विद्युत्संदेश पाठवीन. पृथ्वीवर कोठें तरी विद्युत्जननीचे एकच मध्यवर्ती स्टेशन ठेवून तेथून पृथ्वी वरील कोणत्याही भागांत मी टेलीफोन पाठवूं शकेन, प्रत्येक शद्बामागें दहा लाख हार्स पावर एवढा जोर राहील, ह्या टेली- फोनला तार नको फक्त हवेनें ते चालूं राहील. हजारों लोकांस पाहिजे तेथें व पाहीजे तेथून एकाच वेळीं एकमेकांशीं बोलतां येईल '' ह्मणजे युरोपांतून अमेरीकेंत हिंदुस्थानांत वाटेल तेव्हां वाटेल त्याशीं बोलतां येईल. हें सर्व एकाच यंत्रावर होणार आहे.

शान्तम् पापम्

टिनीवेल्लीचे कलेक्टर रा० रा० ऑश- साहेब यांस एका दुष्ट चांडालानें रिव्हाल्व्हरच्या गोळ्यांनी मिनाक्षी स्टेशनावर पहिल्या वर्गाच्या डब्यांत ठार मारलें! ही अमानुष हत्या करणारा एक स्मार्त ब्राह्मण पूर्वी फारेस्ट गार्ड होता आणि त्याला लांच लुच- पतीबद्दल सदर्हू रा. रा. ऑश यांनीं दोन वर्षांची सक्त कैद दिली होती. ही शिक्षा भोगून हा हताशनर दोनतीन आठवड्या- पूर्वीच सुटला होता. त्यानें पाळद ठेवून खून गेल्या १७ व तारखेला केला आणि लघवीच्या छोट्या खोलींत कोंडून घेऊन त्यानें स्वतांची हत्या त्याच रिव्हाल्व्हारनें क- रून घेतली.

ही गोष्ट किळसवाणी व हृदयभेदक होय! अर्थात् सर्व देश खडबडला पण हा खून राजकीय कारणासाठीं नाहीं हें दुःखांत समाधान होय. प्रथम तर आमची नागरिक मंडळी अगदीं भेदरून गेली. पहिली तार सांगत होती कीं हा खुनी कोणी वकील होता आणि त्याच संधींत बंगालचा पोलिस खात्यांतील इन- स्पेक्टर रा० रा० राय यांचा खून झाल्याची बातमी धडकली तेव्हां ताबडतोब आमच्या नागरिकांनीं निषेधप्रदर्शक जाहिरसभा गेल्या बुधवारीं भरविली आणि स्वतांस ऋणमुक्त करून घेतलें.

ऋणानुबंध चमत्कारिक असतो. तो अशानें सुटत नाहीं. आमचें राष्ट्रीय कर्म आह्मांस मागें ओढीलच ओढील. आणि श्रीरामचंद्र तर एक मूल अकालीं मृत झालें ही गोष्ट देखील राष्ट्रीय पाप समजत असत तेव्हां अशा खूनांनीं कोणत्या मानव सृष्टीची किंवा राष्ट्राची प्रगती होईल बरें! निषेधाची सभा हा लौकिकी मार्ग झाला पण आह्माला असल्या पापा बद्दलचें भोक्तृत्व चुकावयाचें नाहीं. तो इंडियन होता तेव्हां तो दोष या राष्ट्रावर येतो आणि हिंदुस्थानचा एक अवयव या नात्यानें आमच्या प्रांताला मद्रासेकडील पापाचें क्षालन करण्याचा जो वाईट प्रसंग आला आहे तोच प्रसंग जगद्व्यापी ब्रिटिश राष्ट्रपुरुषावरही आहे. पापक्षालन पापकृत्यांचें स्मरण ठेविल्यानें होत नसतें. क्षमेच्या अंतर्दृष्टीनें त्यांची विस्मृती करून पुण्य, प्रेम, सुहृद्भाव इत्यादि ईश्वरी गुणांच्या एकीकरणानेंच आपण या दैवी ब्रिटिशसाम्राज्याची अभिवृद्धी करणारीं वैभवशालीं अशीं सत्कार्यें करण्यास शिकलें पाहिजे.

वऱ्हाडवृत्त.

हवामान— आद्रा नक्षत्राचा प्रथम चरण कोरडा गेला तथापि इतर शुभ लक्षणाकडे दृष्टी देऊन लोक पर्जन्याची उत्कंठेनें मार्गप्रतीक्षा करीत आहेत. वारा सोसाट्याचा सुटतो, ढग वारंवार जमतात व इतरही गोष्टी पर्जन्याला फार अनुकूल आहेत. रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं.

येथील विद्यार्थिमंडळींस आम्रफलें व सम्यगृहस्थांस पानसुपारी देण्याचा राज्याभि- षेकानिमित्त काल सायंकाळीं हायस्कुलांत चांगला समारंभ झाला.

कामरगांव तालुका मूर्तिजापूर येथील हेडमास्तर व इतर सद्गृहस्थ यांनीं राज्या- भिषेकाचा समारंभ विद्यार्थिसमुदाया मध्यें साजरा केला. या राज्याभिषेकासंबंधानें गांवोगांव नव्याजुन्या पिढ्यांनीं एकदिलानें महोत्सव केल्या विषयीं बातम्या आहेत. शिक्षकवर्गापैकीं वाशिमचे रा० रा० नारायण महादेव जोशी हे अल्हाबाद युनि- व्हरसिटीच्या बी० ए० परीक्षेंत पसार झाले.

रा० रा० हाटिनूजर सुपरवायजर सब-डिव्ही- जन उमरावती यांची बदली वर्धेला झाली.

जाहिर नोटीस

सर्व शेट सावकार लोकांस खालीं सही करणार याज कडून या जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं बलदेव वल्लद नागो पाटील राहणार मडाखड बा॥ तालुके जळगांव हा अज्ञान असून याची स्थावरजंगम एकंदर इस्टेट सरासरी सात हजार किंमतीची आहे. तिची वहिवाट बलदेव याचा आजा खुशाल वल्लद भगवान पाटील वस्ती मडाखेड बु॥ तालुके जळगांव हा करीत आहे. अज्ञान बलदेव व त्याचा आजा खुशाल हे सर्व एके ठिकाणींच राहातात. अज्ञानाचा आजा खुशाल हा फार व्यसनी असल्यामुळें त्यानें वाटेल तसें लोकापासून कर्ज काढून अज्ञानाचे जिंदगीचा खराबा करण्याचा विचार चालविला आहे. वास्तविक त्याला कर्ज काढण्याची मुळींच जरूरी नाहीं. परंतु त्यास दारूच्या व्यसना मुळें शुद्ध न राहतां तो सावकार लोकां जवळून कर्ज काढून अज्ञानाच्या जिंनगीवर कर्ज वाढावित आहे. यासाठीं कळविण्यांत येतें कीं सदर्हु अज्ञान बलदेव याचा आजा खुशाल भगवान यास कोणीही कर्ज वगैरे देऊं नये. त्यास कर्ज दिल्यास तो दारूच्या व्यसनांत सर्व पैसे उधळून टाकणार. कदाचित् अज्ञानाचे कामाकरितां त्यास कर्ज काढणें जरूरच पडेल तर अज्ञानाची आजी अमृता- बाई व अज्ञानाचा आप्तसंबंधी रूपचंद पाटील टाकळीकर यांचे संमती शिवाय कोणी कर्ज देऊन दस्ताऐवज करून घेऊं नये. घेतल्यास तो सर्व व्यवहार रद्द समजला जाऊन त्या बद्दल अज्ञान बलदेव व त्याची वडिलोपार्जित जिन्नगी याजवर त्या कर्जाचा बोजा चालणार नाहीं. याक- रितां कोणीहि सावकार लोकांनीं अज्ञानाचा आजा खुशाल भगवान यास कर्ज देऊं नये. व कोणताहि रोखा, गहाणखत वगैरे करून घेउं नये, घेतल्यास तें सर्व रद्द असे. कळावें तारीख १९।६।११ इसवी

सही

बलदेव वल्लद नागो पाटील वस्ती मडाखेड बु॥ हा अज्ञान पालन करणार आजी अमृताबाई जवजे खुशाल पाटील नि० खुद आंगठा

नो० नं० २६१

---

* इकडे लक्ष ! *

नाग, नरसे व पिठोरी

आह्मी येथें विक्रीकरितां नाग, नरसे, जिवत्या, पिठोरी, पाठोडा, गणपती बुध, बृहस्पती व तुळशीचें लग्न वगैरे चित्रांचे कागद फारच सुरेख छापले आहेत. चित्रें दर शेंकडा १ रुपया. चित्रें पांचशें घेतल्यास दर कशेंकडा ८।१२ आणे प्रमाणें देऊं.

बाळकृष्ण अनोबा दलाल,
कंपॉझीटर वऱ्हाडसमाचार
अकोला.

(पत्रें विठ्ठलमंदीराच्या पत्त्यावर पाठवावीं.)

सुधासिन्धु

सुख संचारक कंपनी मथुरा यांचीं तयार केलेलीं व सरकारांतून रजिष्टर झालेलीं औषधें, जीं वीस वर्षांपासून लोकात अनुभविलीं आहेत.

सुधासिन्धु

हें कफ, खोकला, दमा, थंडीचा ताप, पटकी, शूळ, संग्रहणी, अतिसार, पोटांत दुखणें, वांत्या, मळमळणें, हात पाय व कंबर दुखणें, मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, डांग्या खोकला, दूध ओकून टाकणें इत्यादीवर स्वादिष्ट व सुवासिक औषध आहे. किमत प्रत्येक बाटलीस ८ आणे.

दृङ्नाग केसरी

गजकरणास समूळ नाहींसें करणारें हेंच फक्त एक पवित्र औषध आहे. कांहीं सुद्धां जळण अथवा आग होत नाहीं. यासच जर दारू अथवा लिंबाचे अर्कांत मिळविलें तर २ बाटल्या अर्क तयार होतो. किंमत प्रत्येक बाटलीस ८४ आण. १२ बाटल्या एकदम मागविल्यानें त्यांस एजंट समजून नोटिशी, हँडबिलें वगैरे फुकट पाठविलीं जातात, व कमिशनही दिलें जातें. चालू सालचें पंचांगही फुकट मिळतें.

मागविण्याचा पत्ताः—
पंडित क्षेत्रपाल शर्मा मालक,
न. १९९ सुख संचारक कंपनी, मथुरा.

अशी संधी पुन्हां येणार नाहीं.

सहा घड्याळें घेणारांस एक घड्याळ फ्री.

पोष्टखर्च माफ दर एकाची किंमत ३।.

जटलमन् इमेटेशन रास्कोप सिस्टिम.

नांवचें खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा ह्मणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान, पेटी, गोफ, इतकें सामान फुकट मिळेल. अशी अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. नें मागवा.

मिळण्याचा पत्ताः—**खोजा वल्लीभाई इस्माल**
मुक्काम वर्धा. [मध्यप्रांत] WARDA.
नो. नं. ४

चिरकालचा खरा लाभ कोणता ?
पैसा व ज्ञान ज्या योगानें मिळेल तो !
महाराज ! ह्या दोन्ही गोष्टी

वार्षिक वर्गणी ट. ख. म ह रु. १॥ **कलाशिक्षण** नमुना अंकास ८ आ.

नांवाच्या विविध हुन्नर, शास्त्रीयज्ञान, व्यापार, शेतकी, व इतर शेंकडो विषयांची माहिती शिकविणाऱ्यास वर्गणीदार व्हा. मराठी भाषेंत हें असें एकच पुस्तक आहे. वर्गणी रु. १॥ खरी पण चालू मासचे अखेर आश्रय देणारास रु. १। पडेल. कारागिरांस, विद्यार्थ्यांस तर हें पुस्तक अवश्य हवें शिवाय ग्राहकांस हिप्नॉटिझम [Hypnotism] ऊर्फ अमेरिकन वशीकरणविद्या—जिनें दुसऱ्यास निद्रामोहन, आरोगहरण व धनप्राप्ति करतां येते; ती रु २५ फीची तूर्त रु. ११ त शिकवूं. पैकीं १ रु. प्रथम सही बरोबर पाठवावा. बाकीची व्ही. पी. येईल.

ह्याशिवाय नानाप्रकारच्या पोट भरण्याच्या युक्त्या. औषधी. मंत्रतंत्रक्रिया, जडीबुटी, गुप्त प्रयोगाची माहिती वाजवी फी घेऊन शिकवूं. सर्व पत्रव्यवहार गुप्त राखला जातो,

व्यवस्थापक— कलाशिक्षण, कार्यालय
ना. नं. ५ बडोदें.

नोटीस

विहार आनन्दका सागर रंगीन तसवीरे सहित चारो भाग तथा पांचो अंग सचित्र कोख शास्त्र.

असली हमसे मंगावो धोकेसे बचो स्त्री पुरुशोके जात, भेद, लक्षण अनेक देशस्थ स्त्रीनायका, कुमारी प्रकृती, सत्व दुती कुलटा, पातिव्रता, व्यभिचारणी आदिकी पहेचान, रजोधर्म लक्षण, ऋतुविहार समय सहवास स्थान क्रया, शैय्यातिथ, कामस्थान सोलासगारें, बतीसोआभूशण, वस्त्रतअर्दिवमधान पुत्रश्टीकर्म, नपुंसकविद्या, उपदंश प्रमेह आदि अनेक रोगोकी चिकित्सा औषधि, पशुभाषा जाननेकी रीति, मंत्रतंत्र, यंत्र, वशीकरण मुद्रां विद्या आदि अमुल्य विषयका भंडार किंमत रु० १

पं० गंगाप्रसाद इंजीनियर शहापडा
नो० नं० ७७ **अलीगड सिटी.**

विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार– **खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल** इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशाविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणांनीं डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल. आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग.

जाहिरात

वर्षफल—प्रत्येक महिन्याचे फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ८= जन्मकाल, जन्म अथवा चालू नांव कळवावें.

पत्ता— भा० गो० पंडित,
ग- व पो० लोणखेड प. खानदेश.

जाहिरात.

टेक्स्ट बुक कमिटींत पसंत होऊन मे. **डेरेक्टर** सा. व. **मध्यप्रांत** व **व्हाड** यांनीं व्ह. आणि अ. व्ह. शाळांतील बक्षिस व लायब्ररीच्या साठीं मंजूर केलेलें प्रसिद्ध धनुर्धारी कृत;-

१ **व्यापारी वाचनपाठ**. किं० ॥. याच प्रमाणें २ **शिवाजी पाटील** किं०. ॥ ३ **उपाशी महाराष्ट्रास उद्योग** कि०. ।= ४ धर्मावरील मार्मिक निबंध अक १ ते १४; १०० बुकांस ।=रु० (पुर्वी १॥ कि० होती) १००० अगर ज्यास्त एकदम घेतल्यास .।– व त्याहून ज्यास्त घेतल्यास वरील प्रमाणें देऊं. निदान १०० तरी घेतलीं पाहिजेत.

नंबर १, २ व ३ यांच्या प्रती एकदम १० घेतल्यास अनुक्रमें ॥= व । व ज्यास्त घेतल्यास ॥– व .।. किंमतीस देऊं.

टपाल खर्चे निराळा—व्ही. पी. नें मागविल्यास निदान एक त्रितीयांश तरी कि० आगाऊ आली पाहिजे.

ल. वें. मांजरेकर आणि कंपनी
बेळगांव

नोटीस

राजश्री चांदशा वल्लद बापुसा पाटील राहणार वाशीम यांस ता० जळगांव खालीं सही करणा यांसः— देण्यांत येतें कीं तुमचे वल्लद राघोजी ही माझे चिरंजिवास दि० फा० अकोट पूर्वीच झालें हल्लीं चार गांवीं दिसुमारास माझा मुलगा मैत पाचे बायकोस नंतर सदर्हू आजीमबी इजबी गावेळेस म्यां गेलात. आजीमबी हिजला तुबेलें नाहीं जाते वेळेस तिचे आंगावर चांदी मी घरीं १०० रुपयांचे सुमारें होते. चिजाब- हिजला घेऊन येण्या करितां मी १।२ तीन वेळां मूळ पाठाविलें असता ऊ तुह्मी वाटी लाविली नाहीं. तिचा परामर्ष घ्याझी ण्यास मी तयार अमून ती माझे घरून राहावी अशी माझी इच्छा आहे तरी आपली मुलगी ह्मणजे माझी सून इजला माझे घरीं पंधरा दिवसांत पाठवून द्यावें. इतक्यावर आपण न पाठविले व उलट तिचे खांवटीचे खर्चांत तिच्या आंगावरील दागीने मोडून खर्च कराल किंवा कर्ज काढून तिचे अन्नवस्त्रास खर्च केलें असा तुह्मी बाहाणा दाखवाल तर तो तुमचा बनावटी बहाणा बिलकूल कबूल करणार नाहीं. व तिच्या आंगावरील डांगडाग्गिन्याची जबाबदारी तुमचकडे अमून तुह्मांस जबाबदार धरलें जाईल कळावें. तारीख १२ माहे जून सन १९११ इसवी

सही
माशुमबी जवजे सरदारशा फकीर
राहणार शिरपूर तालुका वाशीम
इचे हातची निशाणी बांगडी,
नो. नं. २४८

नोटीस

नोटीस बेशमी बाकीदास कणीराम मारवाडी, अंबादास गंगाराम ब्राह्मण बदनापूरकर व शंकर गोविंद बघनापूरकर त्रिवर्ग राहणार खामगांव तालुके मजकूर जिल्हा बुलडाणा यांनाः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, पेठ खामगांव येथें माझे मालकीचें दुकान जसराज श्रीराम या नांवाचें आहे. त्या दुकानीं व इतर दुकानांकरितां तुह्मी नौकर असल्यामुळें तुह्मास मी कुलमुखत्यारपत्र तारीख २६-११।१९०९ इसवी रोजीं दिलें होतें. हल्लीं तुह्मी त्रीवर्ग नौकरी करून दूर झाले. शंकर गोविंद तारीख ४।९।१० इसवी रोजीं अंबादास गंगाराम तारीख १४।३-११ व बाकीदास कणीराम तारीख २९-३।११ इसवी रोजीं दूर झाले. या कारणास्तव तुह्मांस असलेलें कुलमुखत्यारपत्र, नौकरी बंद झाले तारीखे पासून रद्द केलें आहे. त्यापुढें आमचे कोणतेही कामांत तुह्मांस दिलेले कुलमुखत्यारपत्राचा उपभोग केल्याचें दिसून आल्यास त्याचे जबाबदार तुह्मास धरिलें जाईल. करितां या नोटिसीनें मुद्दाम कळविलें आहे. कळावें. तारीख १६।६।१९११ इसवी.

सही (मारवाडींत)
इंदरसिंग जसराज मारवाडी द० खु०
नो० नं० २४९

आर्यवनौषधालय मुर्डी.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल याजकडील आनररी असिस्टंट सर्जन
. विश्राम रामजी घोले यांनीं आमचीं औषधे बारीक हल्लीं
या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्याहून
त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास
अवश्य लक्ष ठेवावें.

अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास
आला नहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखाद
द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं
अशी प्रतिज्ञा आहे.

मदनामृत संजीविनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, हृदयतंबक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातु ती शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरूपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षी पाहिजे या दिवसांत एकदां तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नपडन्य इतर धातुपात उन्हाळे इंद्रियाशिथिलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकोप मुत्रसंकोच, धातुचा पातळपाणा, स्त्रियाची धुपणी, छातींतिल रोग, सठ पाय त्रमांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडूरोग मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी. वातरोग, निद्रानाश पित्तावर. बाळंतरोग, मधुमेह जूनाट परमा, मुष्ठीमैथूननें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सत्तेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्ध वृद्धी, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचूं लागते त्यांत उपयुक्त वनस्पतीचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनुपानखर्ड सोबत दिला व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील.

दरः—एकदम ३९ गो० १ रु०, ७१ गो० २ रु० ११९ गो० ३ रु० १२९ गो० ४ रु० २७९ गो० ६ रु० ९९० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः—यानें वदस. साहर, फुल, खुपऱ्या. बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. २॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिसत नाहीं. बा० किं० १ १। मात्र बाटलीस रु० २

३ दंतबलवर्धक पूडः—दंत संबंधी सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें मुल्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्णः—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः—औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः—आजपर्यंत आमचे औषधानें हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनी संग्रहीं तापावर गोळ्या, गाठीस मलम, वात चढू नये म्हणून पोटावर मात्रा ठेवून याच। एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक कि० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा कयाटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म खाक, गुटीका, आसवे, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं रुपयांचें मान कळविल्यास रोगाचा निदान चिकीत्सा कळवूं.

अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहिराती सुरूं असुन प्रत्येक जाहिरात सुशोभित करून जो तो पुढें येऊं पाहात आहे.

आपला समाज निरुद्योगी आळशी बनल्याभुळें एकदा जो धंदा सुरूं केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नकल करून वाटेल त्यानें करावें आमचे जाहितीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आजिले वगैरे गावांतून तो पुणेवस्थेत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याची तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस मुचविणें हच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १९।२० वर्षें अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कोट्यावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न वाचतां व कोणाचीही निंदा न करत अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व वहिवाटीच्या परीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटपटीस यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्यबंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरावीं, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागणें तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावीं म्हणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

नो. नं. २४

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

Oriental Government security
LIFE ASSURANCE COMPANY
Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Berar manager,

HEAD OFFICE—BOMBAY

HEAD —QUARTERS— NAGPUR.

FUNDS Exceed $3\frac{3}{4}$ crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowmenp policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application—

M. DESOUZA,

CHIEF AGENT, Nagpr.

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.